# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# शैक्षणिक मानसशास्त्र

**सत्र-३ पेपर-३**

# अध्यापनशास्त्र

**सत्र-४ पेपर-५**

बी. ए. भाग–२

## शिक्षणशास्त्र

(शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२१
बी. ए. भाग-२ शिक्षणशास्त्र पेपर ३ व ५ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-89-5

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : शिक्षणशास्त्र

अध्यक्ष – **डॉ. श्रीमती एस. व्ही. काळेबाग**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती पी. एस. पाटणकर**
  शिक्षणशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती जी. एस. पाटील**
  शिक्षणशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्या डॉ. श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
  कॉलेज ऑफ एज्युकेशन विटा,
  ता. खानापूर, जि. सांगली
- **डॉ. श्रीमती प्रज्ञा भिमराव पाटील**
  श्री संत कृपा कॉलेज ऑफ एज्युकेशन, घोगाव,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. अशोक मारूती पाटील**
  वसंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. प्रमोद कलाप्पा लंबे**
  श्री आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ
  एज्युकेशन, आष्टा
- **डॉ. संभाजी मारुती भोसले**
  इचलकरंजी बी.एड. कॉलेज, इचलकरंजी, जि.
  कोल्हापूर
- **डॉ. बजरंग सिधू घाटगे**
  तात्यासाहेब कोरे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
- **डॉ. विकास गजानन परांजपे**
  इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. सहदेव यशवंत पुजारी**
  कै. रामराव निकम शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इंदोली, ता. कराड, जि. सांगली
- **डॉ. भुषण त्र्यंबक पाटील**
  ३५, आनंदमाई, जयदेवनगर, सिंहगड रोड,
  पुणे ४११०३०
- **डॉ. संभाजी एम. भोसले**
  इचलकरंजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. बी. पी. मरजे**
  पुतळाबेन शहा कॉलेज ऑफ एज्युकेशन,
  सांगली
- **डॉ. सी. जी. खांडके**
  बी. जी. खराडे कॉलेज ऑफ एज्युकेशन,
  शिवाजी पेठ, कोल्हापूर
- **डॉ. एम. ए. पाटील**
  शिवाजीराव देशमुख शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
  शिराळा, ता. शिराळा, जि. सांगली.

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी दूर शिक्षण कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने बी. ए. भाग-२ वर्गामध्ये बहि:स्थ अध्ययनार्थी म्हणून प्रवेश घेतलेल्यासाठी ''शैक्षणिक मानसशास्त्र आणि अध्यापनशास्त्र'' ह्या विषयाचे स्वयं:अध्ययन साहित्य तयार केलेले आहे. या विषयातील तज्ज्ञांनी या स्वयंअध्ययन साहित्यात वेगवेगळी प्रकरणे लिहून सदर विषय विद्यार्थीभिमुख करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या स्वयं:अध्ययन साहित्यात आपणासाठी शैक्षणिक मानसशास्त्राची भूमिका सखोल, सोप्या व सुटसुटीत भाषेत केलेली आहे. मानवाशी निगडीत प्रत्येक क्षेत्रात मानसशास्त्राच्या अभ्यासाची गरज आहे. शिक्षणाशी निगडीत प्रश्न सोडविण्यासाठी व शिक्षणाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मानसशास्त्राची मदत होते. मानसशास्त्र व शिक्षण यांचा संबंध परस्परपूरक व परस्परांना पोषक असा आहे. या दृष्टीने लेखन करण्याचा प्रयत्न लेखकांनी तुमच्यासाठी केलेला आहे. वाचकांना विषयाचे ज्ञान व्हावे तसेच आशयाचे आकलन व्हावे, म्हणून आवश्यक त्या ठिकाणी तक्ते, आकृत्या, आलेख काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

मानसशास्त्रांच्या दृष्टिकोनातून शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्याची आवडनिवड, आशा-आकांक्षा, त्याची क्षमता यांना मानसशास्त्राने शिक्षणात महत्त्व प्राप्त करून दिले आहे. अभिरूची,ऊ अभिवृत्ती, अभिक्षमता, व्यक्तिमत्त्व इ. पैलूंच्या आधारे विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन शैक्षणिक मानसशास्त्राने शिक्षकाला दिला आहे. अशा शैक्षणिक मानसशास्त्राची सविस्तर चर्चा केलेली आहे.

बहि:स्थ अध्ययनार्थींना विषयाचे त्वरित आकलन व्हावे म्हणून, विषयाची प्रस्तावना, उद्दिष्टे, मांडणी, विषयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न, सरावासाठी प्रश्न व उत्तरे अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तकांची नावे प्रकाशनासह दिलेली आहेत. अशारितीने अध्ययनार्थींना विषयाचे चांगले आकलन होईल, अशी अपेक्षा आहे.

**– संपादक**

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र ३ पेपर ३ : शैक्षणिक मानसशास्त्र**
**सत्र–४ पेपर ५ : अध्यापनशास्त्र**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३ घटक क्रमांक | सत्र–४ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. श्रीमती मंजिरी डी. शेटके**<br>महावीर महाविद्यालय, कोल्हापूर | १ | ४ |
| **प्रा. राहुल चित्रकार**<br>कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स ॲण्ड एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. सिमा मरजे**<br>बळवंत कॉलेज विटा खानापूर रोड, विटा, ता. खानापूर जि. सांगली | ३ | – |
| **डॉ. केशव आर. मोरे**<br>आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा | ४ | १ |
| **डॉ. आर. बी. व्हनबट्टे**<br>सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, विद्यानगर, कराड, ता. कराड, जि. सातारा | – | २ |
| **प्रा. जमीर इलाही मोमीन**<br>आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज शुक्रवार पेठ, सातारा, जि. सातारा | – | ३ |

**■ संपादन समिती ■**

**डॉ. के. बी. पाटील**
दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. शोभा व्ही. काळेबाग**
महावीर महाविद्यालय,
भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–३ पेपर–३** | |
| | **शैक्षणिक मानसशास्त्र** | |
| घटक १ | मानसशास्त्र आणि शिक्षण | १ |
| घटक २ | अध्ययनार्थींची वाढ व विकास | १४ |
| घटक ३ | व्यक्तिमत्त्व | ३० |
| घटक ४ | अध्ययन | ४४ |
| | **सेमिस्टर–४ पेपर–५** | |
| | **अध्यापनशास्त्र** | |
| घटक १ | अध्यापनाचे शास्त्र | ६५ |
| घटक २ | अध्यापन पद्धती | ७७ |
| घटक ३ | शिक्षक | ९९ |
| घटक ४ | अवबोध, अवधान आणि अभिवृत्ती | ११८ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १

# मानसशास्त्र आणि शिक्षण

## (Psychology and Education)


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ अभ्यासविषयाची मांडणी

१.२.१ मानसशास्त्र अर्थ, स्वरूप, व्याप्ती

१.२.२ मानसशास्त्र आणि शिक्षण यांच्यातील संबध

१.२.३ शैक्षणिक मानसशास्त्र : अर्थ, स्वरूप, व्याप्ती आणि मर्यादा

१.२.४ शैक्षणिक मानसशास्त्राची शिक्षकाला गरज

१.३ सारांश

१.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न-उत्तरे

१.५ सरावासाठी प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

i) मानसशास्त्राचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती समजून घेता येईल.

ii) मानसशास्त्र व शिक्षण यांच्यातील संबंध स्पष्ट करता येईल.

iii) शैक्षणिक मानसशास्त्राचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती व मर्यादा स्पष्ट करता येतील.

iv) शिक्षकाला शैक्षणिक मानसशास्त्राची गरज सांगता येईल.

## १.१ प्रस्तावना :

समाजातील प्रत्येक व्यक्ती काही ना काही कार्य करीत असते. त्यामागे त्याचा काहीतरी उद्देश असतो. जिज्ञासा असते. यातून व्यक्तीला वेगवेगळे अनुभव येत असतात. काही समस्या, प्रश्न निर्माण होतात. ते सोडविण्याचा प्रयत्न व्यक्ती करते. यांवर नियंत्रण करणारी एक अदृश्य शक्ती असते आणि ते म्हणजे 'मन' या मनाचा अभ्यास मानसशास्त्रात केला जातो.

एखाद्या प्रसंगी व्यक्ती कशी वागते? का वागते? कशासाठी तसे वागते या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न मानसशास्त्र करते. मानवी वर्तनात बरीच विसंगती, विविधता आढळते याला कोणते घटक, कोणती परिस्थिती जबाबदार आहे. याचा अभ्यास मानसशास्त्र करते.

शिक्षणाशी निगडीत प्रश्न सोडविण्यासाठी व शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मानसशास्त्राची मदत होते. मानवाशी निगडीत प्रत्येक क्षेत्रात मानसशास्त्रांच्या अभ्यासाची गरज आहे. म्हणून मानसशास्त्राचे ज्ञान प्रत्येक व्यक्तीला असणे आवश्यक आहे. मानसशास्त्र हे वास्तववादी उपयोजित शास्त्र आहे.

या प्रकरणात मानसशास्त्र म्हणजे काय? त्याचे स्वरूप, व्याप्ती समजावून घेऊन मानसशास्त्र व शिक्षण यांचा संबंध पहाणार आहोत. तसेच शैक्षणिक मानसशास्त्राचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती व मर्यादा याचा अभ्यास करून शैक्षणिक मानसशास्त्राची शिक्षकाला कशी गरज आहे याचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ अभ्यासविषयाची मांडणी :

या घटकाची विभागणी चार विभागात केली आहे. पहिल्या विभागात आपण मानसशास्त्राचा अर्थ, स्वरूप, दुसऱ्या विभागात मानसशास्त्र याचा संबंध अभ्यासणार आहोत. तिसऱ्या भागात शैक्षणिक मानसशास्त्राचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती व मर्यादा याचा अभ्यास करणार आहोत तर चौथ्या भागात शैक्षणिक मानसशास्त्राची शिक्षकाला कशासाठी आवश्यकता आहे हे पाहणार आहोत.

## १.२.१ मानसशास्त्राचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती

**मानसशास्त्राचा अर्थ :**

मानसशास्त्राला इंग्रजीमध्ये Psychology म्हणतात. Psychology हा शब्द दोन ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. 'Psyche' म्हणजे आत्मा आणि 'Logas' म्हणजे चर्चा किंवा विचार यावरून आत्म्याविषयी विचार किंवा चर्चा करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र ही व्याख्या केली गेली परंतू आत्मा म्हणजे काय? त्याचे स्वरूप कसे आहे इ. प्रश्नाचे उत्तर शास्त्राच्या आधारे देता येत नाही.

ग्रीक तत्त्वतेत्ता ॲरिस्टॉटल यांनी आत्म्यावर आधारित 'De Anima' नावाचा मानसशास्त्रावरील ग्रंथ लिहिला या ग्रंथातही आत्म्याविषयी समाधानकारक उत्तर सापडत नाही. यानंतर मॅकडयुगल यांनी मानसशास्त्र म्हणजे मानवी मनाचा अभ्यास करणारे शास्त्र अशी व्याख्या केली, या व्याख्येत देखील मन म्हणजे काय? त्याचा आकार, स्वरूप कसे असते याची शास्त्रीय उत्तरे मिळाली नाहीत त्यामुळे ही व्याख्यादेखीत मागे पडली.

मानसशास्त्र हे शास्त्र असल्यामुळे यामध्ये प्रयोगपद्धतीचा वापर व्हावा हा विचार पुढे आला. १८७९ साली विल्यम वुंट या मानसशास्त्राने जर्मनीतील लाईपझिंग या विद्यापीठात मानसशास्त्राची पहिली प्रयोगशाळा सुरू केली विल्यम वुंटला प्रायोगिक मानसशास्त्राचा जनक म्हणून ओळखला जातो. प्रयोगशाळेत संवेदना, भावना, विचार इ. आंतरिक अनुभवाचा अभ्यास प्रयोगपद्धतीने केला अशा आंतरिक अनुभवाची जाणीव प्रत्येकाला कमी अधिक प्रमाणात होत असते. म्हणून अशी जाणीव किंवा बोधावस्था हाच मानसशास्त्राचा अभ्यासविषय आहे असे विल्यम वुंटने म्हंटले आहे. यावरून 'मानसशास्त्र म्हणजे बोधावस्थेचे शास्त्र होय.' 'Psychology is the science of Consciousness' फ्रॉईडच्या मते सुप्तावस्थेत दडलेल्या भावना, इच्छा इत्यादींचा वर्तनावर परिणाम होतो म्हणून मानसशास्त्रात अबोधावस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

वर्तनवादी मानसशास्त्रज्ञ वॉटसन याच्या मते 'मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र' मानवी वर्तन आपण पाहू शकतो. त्याचा अनुभव घेऊ शकतो. वर्तनासंबंधी आपण प्रयोग करू शकतो या सर्व दृष्टीने मानवी वर्तन हा मानसशास्त्राच्या अभ्यासाचा विषय आहे.

आर. एस्. वुडवर्थच्या मते वातावरणाच्या अनुषंगाने व्यक्तीच्या ज्या क्रिया घडतात त्या क्रियांचे शास्त्र म्हणजे मानसशास्त्र होय. या सर्व व्याख्यावरून असे लक्षात येते की, मानसशास्त्र हे आचरणाचे शास्त्र आहे. मानवी वर्तनाचा अभ्यास हा मानसशास्त्राचा केंद्रबिंदू आहे. वर्तनाला प्रेरक असलेल्या विचार, भावनांचे परीक्षण व अभ्यास करावयाचा हाच याचा मूळ हेतू आहे. व्यक्तीच्या वर्तनातून मूर्त-अमूर्त विचार, आंतरीक विचार व विकार प्रकट होत असतात यातून घडणारे वर्तन हे आपल्या मनातील विचारांचे प्रातिनिधीक स्वरूप असते.

मानवी वर्तन आंतरिक प्रेरणेतून घडत असते. एखाद्या गोष्टीत व्यक्तीला जर आवड, रस असेल, व्यक्तीकडे क्षमता असेल तर व्यक्तीकडून घडणारे वर्तन अयांत्रिक स्वरूपाचे असते त्यावर कोणाचा निर्बंध नसतो. तसेच बाह्यघटकांचाही त्यावर परिणाम होत नाही. उदा. व्यक्तीला जर संगिताची, गायनाची आवड असेल तर वेळ, श्रम याचा विचार न करता व्यक्ती तासनतास गात बसते.

व्यक्तीचे वर्तन हे व्यक्तिसापेक्ष व परिस्थितीसापेक्ष असते. वर्तनात विविधता आढळून येते, व्यक्तीचे वर्तन तीला मिळणाऱ्या अनुभवावर आधारित असते. अनुभवामुळे व्यक्तीच्या वर्तनात सुधारणा, बदल होण्यास मदत

होते. उदा. विद्यार्थ्याने शाळेची शिस्त पाळली नाही आणि जर त्याला शिक्षा केली तर परत तो गैरवर्तन करणार नाही. वर्तन हे हेतूपुरस्कर असते त्यामागे काहीतरी उद्देश असतो. शिक्षणाने, संस्काराने वर्तनात अपेक्षित बदल घडून आणता येतात म्हणून मानसशास्त्राच्या अभ्यासात वर्तनाचा अभ्यास आवश्यक ठरतो.

### मानसशास्त्राचे स्वरुप (Nature of Psychology) :

मानसशास्त्र हे वर्तन आणि मानसिक प्रक्रियांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. मानवी वर्तन हा मानसशास्त्राचा अभ्यास विषय असला तरी बाह्यवर्तनाबरोबर आंतरिक वर्तनाचाही यात समावेश असतो. एखादी व्यक्ती चालणे, बोलणे, पळणे या कृती करत असते तेव्हा विचार तर्क, कल्पना, आनंद, दुःख या भावनांशी निगडीत असणाऱ्या प्रक्रियांचा मानसशास्त्रांच्या अभ्यासात समावेश होतो. व्यक्तीच्या दृश्य स्वरूपाच्या वर्तनाबरोबरच अबोधावस्थेत घडणारे वर्तन हे देखील मानसशास्त्राचा अभ्यासविषय आहे.

जन्मलेल्या बालकांपासून अगदी वयोवृद्ध व्यक्तीपर्यंत सर्व विकासाच्या अवस्थेत मानवी वर्तन घडत असते. कधी ते सामान्य तर कधी असामान्य स्वरूपाचे वर्तन असते.

मानसशास्त्राची सुरवात निरीक्षणापासून होते हे निरीक्षण नैसर्गिक परिस्थितीत तर कधी नियंत्रित परिस्थितीत केले जाते. निरीक्षणासाठी विविध साधनांचा वापर केला जातो. यात कोणत्याही प्रकारे पूर्वग्रहदूषितता असणारा नाही याची दखल घेतली जाते. अधिकाधिक काटेकोर, वस्तूनिष्ठ निरीक्षण करण्याचा प्रयत्न केला जातो व त्या आधारे निष्कर्ष काढले जातात. त्याचा पडताळा घेतला जातो आवश्यक तेथे बदल सुधारणा करून निष्कर्षाचे रूपांतर नियमात केले जाते.

मानसशास्त्र हे वास्तववादी शास्त्र असले तरी व्यक्तीकडून घडणारे वर्तन चांगले किंवा वाईट हे ठरविणे किंवा त्याबद्दल आपले मत मांडणे हे मानसशास्त्राच्या कक्षेत येत नाही.

मानसशास्त्राच्या विविध शाखांचा अभ्यास प्रयोगपद्धतीने केला जातो. त्या परिस्थतीचे नियंत्रण करण्यात येते. नियंत्रित परिस्थितीत वर्तनाचे निरीक्षण केले जाते. त्याचे सामान्यीकरण केले जाते. हेच मानसशास्त्राचे नियम होय. प्रयोगपद्धती प्रमाणेच आत्मपरिक्षण, वस्तुनिष्ठ निरीक्षण यापद्धती मानसशास्त्राच्या अभ्यासात वापरल्या जातात.

मानसशास्त्राचा संबंध, अध्ययन, स्मरण, विचार, भावना यांच्याशी येतो या सर्वांचा समावेश ज्ञान, भावना व इच्छा या घटकांशी येतो.

### मानसशास्त्राची व्याप्ती :

मानसशास्त्र हे मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे प्रगत असे शास्त्र आहे. मानवाचे वर्तन हा मानसशास्त्राच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. मानवी वर्तनात आंतरिक व बाह्य वर्तनाचा समावेश होतो व्यक्तीला आलेले अनुभव व प्राप्त परिस्थिती यानुसार व्यक्तीचे वर्तन होत असते विविध अवस्थेत व्यक्तीचे वर्तन विकसित होत असते. कुटुंबात समाजात वावरत असताना व्यक्तीला वेगवेगळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. तसेच अर्थाजनासाठी विविध व्यवसाय करावे लागतात त्यामुळे समाजातील वेगवेगळ्या व्यक्तींशी संबंध येतो. अनेक प्रश्नांना समस्यांना सामोरे जावे लागते यातून मानसिक संघर्ष निर्माण होतात. या संघर्षातून बाहेर पडण्यासाठी मानसशास्त्राचा उपयोग होतो.

समाजात व्यक्तिभिन्नता आढळते. व्यक्ती तितक्या प्रकृती असे आपण म्हणतो. काही व्यक्ती बुद्धीमान असतात तर काही कमी बुद्धीमान असतात. काही व्यक्ती मानसिकदृष्ट्या विकृत असतात, तर काही दिव्यांग असतात. या सर्व वर्तनाचा शोध मानसशास्त्र घेत असतो.

व्यक्ती जीवनाची जी विविध क्षेत्र आहे. तेवढी मानसशास्त्राची व्याप्ती आहे. ज्ञानात्मक, मानसिक व भावनात्मक अशा तीन क्षेत्रातील वर्तनाचा अभ्यास मानसशास्त्रात केला जातो. पशूपक्ष्यावर प्रयोग करून त्यांच्या वर्तनासंबंधी निष्कर्ष काढले जातात. मानसशास्त्र मानव व इतर प्राणी यांच्यात विकासाच्या दृष्टिने कोणता फरक आहे याचा अभ्यास करते. विकसित प्राण्यांच्या वर्तनाचा तुलनात्मक अभ्यास हा मानसशास्त्राचा अभ्यासविषय आहे. मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे मानसशास्त्राच्या विविध शाखा निर्माण झाल्या आहेत.

**मानसशास्त्राच्या शाखा :**

**१) शैक्षणिक मानसशस्त्र :** शैक्षणिक मानसशास्त्रात शिक्षण प्रक्रियेच्या परिणामकारकतेचा विचार केला जातो. शिक्षणाची उद्दिष्टे कोणती असावीत? क्षमताधिष्टीत अभ्यासक्रम कसे तयार करावेत? मूल्यशिक्षण कसे द्यावे? अशा अनेक गोष्टींचा विचार शैक्षणिक मानसशास्त्रात केला जातो. अवधान, अध्ययन, प्रेरणा इ. तत्त्वांचा विचार करून शिक्षणप्रक्रिया यशस्वी करता येईल अशी शैक्षणिक मानसशास्त्राची धारणा असते. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचा उपयोग करून विद्यार्थ्यांला शिक्षणाकडे प्रवृत्त करता येईल हा शैक्षणिक मानसशास्त्राचा उद्देश असतो. अध्यापन कसे करावे? अभ्यासविषयी गोडी कशी निर्माण करावी? मूल्यमापन कसे करावे? मानसिक आरोग्य कसे राखावे? यासारख्या प्रश्नांचा अभ्यास शैक्षणिक मानसशास्त्रात केला जातो. अध्यापन विषयक समस्या सोडविण्यास या शास्त्राची मदत होते.

**२) बालमानसशास्त्र :** बालकाच्या वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे बालमानसशास्त्र, बालकाच्या शारीरिक विकासानुसार होणारा बौद्धिक, भावनिक क्रियात्मक विकास त्याच्या क्रिया-प्रतिक्रियांचे स्वरूप, व्यक्तीमत्त्वाचा विकास इत्यादीचा अभ्यास करणारी ही शाखा आहे.

**३) औद्योगिक मानसशास्त्र :** विविध क्षेत्रातील कामगारांचे मानसशास्त्र यासंबंधी विस्ताराने विचार करणारी ही शाखा आहे. कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना कामाचे तास, विश्रांती, सोयी इत्यादीचा यात विचार करण्यात आला. कामगारांकडून अधिकाधिक दर्जेदार काम कसे करून घेता येईल? संप कसे टाळता येतील? कामगाराचे प्रशिक्षण, पगारवाढ, बोनस याचा त्यांच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम होईल का? याचा अभ्यास या शाखेत केला जातो.

**४) सामाजिक मानसशास्त्र :** मानव हा सामाजप्रिय प्राणी आहे. समाजात त्याचा मानसिक सामाजिक, भावनिक विकास होत असतो. कुटुंबापासून समाजिकरणास सुरूवात होते. कुटुंब, शाळा, समाज याद्वारे व्यक्ती भाषा, चालीरिती, परंपरा, प्रथा शिकत असते. समाजात वावरताना त्याची वृत्ती, मते याचा समाजावर प्रभाव पडत असतो. व्यक्तीचा सामाजिक व सांस्कृतिक जडणघडणीचा अभ्यास सामासिक मानसशास्त्रात केला जातो. सामाजिक आंतरक्रिया, सामाजिक प्रेरणा, विविध समूह इ. चा अभ्यास या शाखेत केला जातो.

**५) शरीरशास्त्रीय मानसशास्त्र :** व्यक्तीचे शरीर व मनोव्यापार यांचा जवळचा संबंध आहे. शारीरिक अवस्थेचा परिणाम व्यक्तीच्या मनःस्थितीवर व व्यक्तीच्या वर्तनावर होतो. शरीरातील विविध ग्रंथीतून पसरणारे

स्त्राव व शारीरिक व बौद्धिक विकास इत्यादीचा अभ्यास शरीरशास्त्रीय मानसशास्त्रात केला जातो.

**६) मनोविकृत मानसशास्त्र :** मानसिकदृष्ट्या विकृत असणाऱ्या व्यक्तीचे मानसशास्त्र म्हणजे मनोविकृत मानसशास्त्र होय. मनोविकृत म्हणजे काय? त्याचे विविध प्रकार, त्यावर उपाय, प्रतिबंधक योजना इ. चा विचार या शास्त्रात केला जातो. गतीमान जीवनशैलीमुळे मानवी जीवनात गुंतागुंत वाढली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मानसिक ताणतणाव निर्माण होऊन मानसिक आरोग्य धोक्यात येते. मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञ उपाय करतात. यासर्व गोष्टींचा विचार या शाखेत केला जातो.

**७) तुलनात्मक मानसशास्त्र :** मानव व मानवेत्तर प्राणी यांचा तुलनात्मक अभ्यास करणारे मानसशास्त्र म्हणजे तुलनात्मक मानसशास्त्र होय. डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताच्या आधारे प्राण्यापासून मानवाची निर्मिती झाली असल्यामुळे वर्तनाचा व मनोव्यापाराचा अभ्यास काही प्रमाणात मानवाच्या वर्तन आणि मनोव्यापाराच्या अभ्यासात उपकारक ठरेल असे शास्त्रज्ञांना वाटले यातून प्राणी मानसशास्त्र उदयाला आले.

**८) व्यक्तीभेदाचे मानसशास्त्र :** व्यक्ती तितक्या प्रकृती या उक्तीप्रमाणे व्यक्ती व्यक्तीमध्ये भेद आढळून येतात. याला अनुवंश व परिस्थिती कारणीभूत असते याचा अभ्यास व्यक्तीभेद मानसशास्त्रात केला जातो. यासंबंधीचा अभ्यास कॅटेल, गोडार्ड इ. नी केला.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** – १

१) Psychology हा शब्द कोणत्या दोन ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे.

२) 'De Anima' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

३) मानसशास्त्राचा जनक म्हणून कोणाला ओळखले जाते?

४) जर्मनीतील कोणत्या विद्यापीठात मानसशास्त्राची पहिली प्रयोग शाळा सुरू करण्यात आली?

५) वॉटसनच्या मते मानसशास्त्र म्हणजे काय?

६) कोणत्या तीन क्षेत्रातील वर्तनाचा अभ्यास मानसशास्त्रात केला जातो?

७) मानवी वर्तनाचा अभ्यास मानसशास्त्राच्या कोणत्या शाखेत केला जातो.

८) जीवन व शिक्षण यांचा अतूट संबंध कोणी जोडला?

## १.२.२ मानसशास्त्र आणि शिक्षण यांच्यातील संबंध :

मानसशास्त्र व शिक्षण यांच्यासंबंध परस्परपूरक व परस्परांना पोषक असा आहे. शिक्षणाद्वारे अध्ययन. अध्यापनाचे कार्य सुकर, प्रभावी, परिणामकारक होण्यासाठी केवळ शालेय वातावरण सर्व सोईंनी परिणामकारक असून चालणार नाही तर त्याबरोबर कुटुंब, शाळा आणि समाज यांतील वातावरण परस्परांना पूरक व पोषक असणे हे शिक्षणाचे खरे ध्येय आहे.

अध्ययन, अध्यापन या दोन्ही प्रक्रिया परस्परांशी निगडीत व परस्परपूरक अशा आहे. अध्ययनात ज्ञानार्जन करणे, हस्तकौशल्य प्राप्त करणे, चांगल्या सवयी, व्यक्तीचा मानसिक कल, आदर्श इत्यादी गोष्टी संपादन केल्या

जातात. तर या गोष्टी साध्य करण्यासाठी व्यक्तीला प्रेरणा, मार्गदर्शन आवश्यक असते हे अध्यापनातून सांगितले जाते; अध्यापनात अध्ययन कसे सुकर, उपयुक्त परिणामकारक होईल हे पाहिले जाते; यासाठी शिक्षणात मानसशास्त्राची गरज असते.

अध्ययन प्रक्रियेवर परिणाम करणारे घटक अवधान, अभिरूची, प्रेरणा इ. चे स्वरूप समजावून घेऊन त्यावर नियंत्रण ठेवण्याची तंत्रे मानसशास्त्र विकसित करते. अमेरिकन शिक्षणतज्ञ जॉन ड्युई याने जीवन व शिक्षण यांचा अतूट संबंध जोडला आहे. शिक्षण म्हणजे भावी जीवनाची तयारी, शिक्षण म्हणजे चारित्र्याबांधणी. ज्ञान, कौशल्ये आणि अभिवृत्ती यांचे संवर्धन म्हणजे शिक्षण. शिक्षणातून बालकाच्या नैसर्गिक विकासाला एक विशिष्ट वळण दिले जाते.

अभ्यासक्रमाची रूपरेषा ठरविणे हे मानसशास्त्राच्या कक्षेत येत नाही पण एखाद्या विषयाचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना झेपेल की नाही, विद्यार्थ्यांना त्याचे आकलन कसे होईल, तो कोणत्या पद्धतीने शिकवावा इत्यादीचा विचार मानसशास्त्र करते. विद्यार्थी अध्यापन करीत असतो त्याच्याजवळ ज्ञान घेण्याची जिज्ञासा असते. त्यासाठी पोषक वातावरण शिक्षण निर्माण करीत असते.

मानसशास्त्राने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत विविध पद्धतीचा विचार केला आहे. त्यासाठी विविध प्रयोग करून विविध तत्त्वे आणि नियम शोधून काढले आहे त्याचा उपयोग शिक्षक आपल्या अध्यापनात करीत असतो. शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर शिक्षकाला मानसशास्त्राचा उपयोग होतो. अध्यापनाच्या परिणामकारक पद्धतीची माहिती शिक्षकांना देऊन मानसशास्त्र आपली महत्त्वाची भूमिका पार पाडत असते.

शिक्षकांच्या मनात विद्यार्थ्यांच्या विकासासंबंधी, अध्ययन प्रक्रियेसंबंधी, व्यक्तिमत्वासंबंधी अनेक प्रश्न निर्माण होतात. विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी गरजा, आशा-अकांक्षा यासारख्या प्रश्नांची उत्तरे मिळविण्यास मानसशास्त्र शिक्षकाला मदत करते.

विद्यार्थ्यांना विस्मरण का होते? वाचनाची गती कशी वाढवावी? विद्यार्थ्यांना शिक्षा का द्यावी? पारितोषिक, शाबासकीचे महत्त्व काय? अध्यापनाची पद्धत कशी असावी? याचे मार्गदर्शन मानसशास्त्र शिक्षकांना करते.

अध्ययनार्थीच्या प्रगतीचे मूल्यमापन कसे करायचे? बुद्धीमापन कसोट्याचा वापर कसा करायचा, विद्यार्थ्यांच्या प्रगतीची तुलना कशी करायची? यासंबंधीचे मार्गदर्शन मानसशास्त्र शिक्षकांना करते.

मानसशास्त्रांच्या दृष्टिकोनातून शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. विद्यार्थ्यांची आवडनिवड, आशा-आकांक्षा, त्यांची अभिरूची, अभिवृत्ती यांना मानसशास्त्राने शिक्षणात महत्त्व प्राप्त करून दिले आहे. विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन मानसशास्त्राने शिक्षकाला दिला आहे.

अशाप्रकारे अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापन पद्धती, वर्गातील वातावरण, मानसिक आरोग्य, व्यक्तीमत्त्व, सृजनशीलता यांचा अध्ययन अध्यापनाच्या संदर्भात मानसशास्त्राने सर्वांगीण विचार करत शिक्षणक्षेत्राला एक उत्तम बैठक प्राप्त करून दिली आहे.

▸ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) --- व ----- या दोन्ही प्रक्रिया परस्परांशी निगडीत आहे.

२) मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून शिक्षणव्यस्थेत---- हा केंद्रबिंदू आहे.

३) शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर शिक्षकाला ----- चा उपयोग होतो.

४) विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा ----- दृष्टिकोन मानसशास्त्राने शिक्षकाला दिला.

५) शिक्षणातून बालकाच्या ----- विकासाला एक विशिष्ट वळण दिले जाते.

## १.२.३ शैक्षणिक मानसशास्त्र अर्थ, स्वरूप, व्याप्ती आणि मर्यादा :

### शैक्षणिक मानसशास्त्र अर्थ :

मानसशास्त्र मानव व मानवेत्तर वर्तनाचा अभ्यास करणारे व्यापक असे शास्त्र आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तनातील विकासात्मक बदलला शिक्षण म्हणतात. शिक्षणामुळे व्यक्ती आपले ज्ञान, कौशल्य, वृत्ती यांचे संवर्धन करते. बुद्धी, इच्छाशक्ती, अध्ययन प्रक्रिया, व्यक्तीभेद, सवयी, परिस्थिती, समायोजन, शिक्षकांचे आरोग्य इत्यादी बाबींविषयी शिक्षकांना ज्ञान देऊन त्यांचा वापर त्यांच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेत कसा उपयोगात आणू शकतील या सर्वांचा अभ्यास शैक्षणिक मानसशास्त्रात केला जातो.

**व्याख्या :**

**गुथ्री व पॉवर्स** : जे शास्त्र मान्यता पावलेल्या मानसशास्त्रीय तत्त्वांचा उपयोग शैक्षणिक समस्यांचा उलगडा करण्यासाठी करते ते शास्त्र म्हणजे शैक्षणिक मानसशास्त्र होय.

**स्किनर** : ज्या शाखेत अध्यापन आणि अध्ययनाचा अभ्यास केला जातो ते शास्त्र म्हणजे शैक्षणिक मानसशास्त्र होय. ही व्याख्या संकुचित दिसून येते. शैक्षणिक मानसशास्त्रात केवळ अध्यापन आणि अध्ययनाचा अभ्यास अपेक्षित नाही.

**क्रो आणि क्रो** : व्यक्तीला जन्मापासून ते वृद्धावस्थेपर्यंत मिळणाऱ्या अध्ययन अनुभूतीचे वर्णन व स्पष्टीकरण ज्या शास्त्रात केले जाते ते शास्त्र म्हणजे शैक्षणिक मानसशास्त्र.

**मॅकफरलंड** : शैक्षणिक क्षेत्रातील कोणत्याही प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी मानसशास्त्रीय तत्त्वांचा वापर करण्यावर भर दिला आहे. हा भर ज्या शास्त्रात दिला जातो. ते शास्त्र म्हणजे शैक्षणिक मानसशास्त्र होय.

शैक्षणिक मानसशास्त्र अध्ययनार्थी आणि अध्ययनप्रक्रिया याबद्दल माहिती देणारी मानसशास्त्राची एक शाखा आहे. अध्ययनार्थी कसा शिकतो. त्यावर कोणकोणत्या घटकांचा परिणाम होतो. अध्ययनार्थीकडे कोणत्या क्षमता असतात. त्याचा विकास कसा होतो याचे मार्गदर्शन शैक्षणिक मानसशास्त्र करीत असते. शिक्षकाला आपले अध्यापन कार्य परिणामकारक पार पाडण्यासाठी शैक्षणिक मानसशास्त्राचा उपयोग होतो. अध्ययनार्थीला शिकवत असताना योग्य वातावरण निर्मिती करणे आवश्यक असते. अध्यापन पद्धतीचा योग्य वापर करून

यशस्वीता प्राप्त होण्यास मदत होते. याचा विचार शैक्षणिक मानसशास्त्रात केला जातो.

शैक्षणिक मानसशास्त्र उपयुक्त असे शास्त्र आहे. आधुनिक मानसाशास्त्रज्ञांनी शैक्षणिक मानसशास्त्रात अध्ययन कार्याची वाढ व विकास, अध्यापक आणि अध्ययन-अध्यापन, बुद्धीमत्ता, अभिरूची वृत्ती, व्यक्तिमत्त्व, व्यक्तीभेद, स्मरण-विस्मरण, शारीरिक-मानसिक आरोग्य, शैक्षणिक मूल्यमापन यासारख्या अनेक गोष्टींचा समावेश केला आहे.

## शैक्षणिक मानसशास्त्र-स्वरूप आणि व्याप्ती :

शैक्षणिक मानसशास्त्रात अध्ययनकर्त्याच्या वर्तनाचा व वर्तनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास केला जातो. शैक्षणिक मानसशास्त्र मानसशास्त्राची उपयोजनात्मक शाखा आहे. अध्ययन कर्त्याची वाढ विकास, विकासाची टप्पे, त्याची वैशिष्ट्ये तसेच प्रत्येक टप्प्यात असलेल्या अध्ययनार्थीच्या शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक वैशिष्ट्ये हे शैक्षणिक मानसशास्त्रात अभ्यासले जातात. विकासावर परिणाम करणाऱ्या अनुवंश व परिस्थिती याचा अभ्यास शैक्षणिक मानसशास्त्रात केला जातो.

व्यक्तिमत्त्वार प्रभाव पाडणारे घटक, व्यक्तीमत्त्वाचे संघटन, सुसंघटित व्यक्तिमत्त्व, व्यक्तिमत्त्व विकासात येणारे अडथळे, त्यात राहणाऱ्या उणिवा हे शैक्षणिक मानसशास्त्राच्या कक्षेतील विषय आहेत. शैक्षणिक मानसशास्त्र हे वास्तववादी शास्त्र आहे.

अध्ययन हा शैक्षणिक मानसशास्त्राचा प्रमुख विषय असल्याने अध्ययन प्रक्रियेचा अभ्यास शैक्षणिक मानसशास्त्रात केला जातो. तसेच अध्ययनावर परिणाम करणारे घटक उदा. अभिरूची, थकवा, कंटाळा, प्रेरणा, अवधान इत्यादीचे स्वरूप जाणून घेवून विचार, अवबोध, तर्क, अनुमान या मानसिक प्रक्रियांचे स्वरूप व त्यांचा विकास या गोष्टी शैक्षणिक मानसशास्त्रात समाविष्ट होतात.

अध्ययनार्थीकडून अपेक्षित वर्तन घडणे, अध्ययनार्थीला स्वयंअध्ययनाकडे प्रवृत्त करणे, अध्यापनाची नविन तंत्रे विकसित करणे तसेच अध्यापन अधिक प्रभावी व परिणामकारक करणे हे शैक्षणिक मानसशास्त्राच्या कक्षेत येते.

शैक्षणिक मानसशास्त्राच्या आधारे शालेय वातावरण अधिक आल्हाददायक, आनंदित बनवून अधिकाधिक चांगले अध्ययन-अनुभव विद्यार्थ्यांना देता येतील. अध्ययनार्थीच्या वर्तनाशी ज्या ज्या गोष्टींचा संबंध आहे, त्याचा समावेश शैक्षणिक मानसशास्त्रात होतो. शैक्षणिक मानसशास्त्रात व्यक्तीभिन्नतेचा अभ्यास केला जातो. अध्ययनार्थीमध्ये विविध क्षमता असतात. व्यक्तिमत्त्व, बुद्धीमत्ता, सर्जनशीलता अभिरूची यांचे मापन करण्यासाठी चाचण्या तयार केल्या जातात. त्यामुळे अध्ययनार्थीच्या ठिकाणी असलेल्या क्षमतांचा शोध घेतला जातो. संपूर्ण शिक्षणक्षेत्राला व्यापून टाकणारी मानसशास्त्राची ही प्रभावी व परिणामकारक शाखा आहे. याच्या अभ्यासामुळे अध्ययनार्थीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जाते. थोडक्यात शैक्षणिक मानसशास्त्रामुळे शिक्षकाला शैक्षणिक समस्यांचे ज्ञान होते, विद्यार्थ्यांमध्ये समायोजनक्षमता कशी आणता येईल याचे ज्ञान होते. विद्यार्थ्यांच्या विकासासाठी उत्तम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास शैक्षणिक मानसशास्त्र मदत करते.

## शैक्षणिक मानसशास्त्राच्या मर्यादा :

शैक्षणिक मानसशास्त्र उपयोजनात्मक वास्तववादी शास्त्र असले तरी त्याला काही मर्यादा आहेत. त्या

पुढीलप्रमाणे

१) मानवी वर्तन व मानसिक प्रक्रिया या गुंतागुंतीच्या गतिमान असतात. त्यामुळे प्रायोगिक पद्धतीने संशोधन करायचे झाले तर अध्ययन कर्त्यावर नियंत्रण ठेवणे शक्य नसते. तसेच अध्ययन कर्त्याचे सहकार्य मिळविणे देखील कठीण जाते.

२) शैक्षणिक मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे अध्यापकाला विद्यार्थी, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, अध्ययनावर परिणाम करणारे घटक यांचे आकलन होते. परंतु तरीही शैक्षणिक मानसशास्त्राच्या अभ्यासाने प्रभावी अध्यापन करता येईल असे नाही.

३) शैक्षणिक मानसशास्त्रात अध्ययनसंबंधी अनेक प्रयोग तसेच संशोधन केले गेले. परंतु अध्ययनप्रक्रियेच्या नेमक्या स्वरूपाबद्दल विविध तज्ञामध्ये एकमत नाही.

४) अध्ययनार्थीला प्रेरणा कधी मिळते? व्यक्तिभिन्नतेचे नेमके परिणाम कोणते? समायोजनात अडथळे का निर्माण होतात? याबाबत सर्वसमावेशक मर्यादित तत्त्वे मिळाली नाही. त्यामुळे शैक्षणिक मानसशास्त्राच्या अभ्यासकाला शैक्षणिक परिस्थितीत सुधारणा घडवताना नेमके कोणते प्रयत्न करावेत याची उत्तरे मिळाली नाहीत.

५) मानसशास्त्रात आत्मनिरीक्षण पद्धतीचा वापर करणे अपरिहार्य असते. स्वतः अंतर्मुख होऊन एखाद्या भावनात्मक अनुभवाचे निरीक्षण करावे लागते. या भावनात्मक अनुभवाचे मोजमाप करणे कठीण आहे. उदा. एखाद्या गोष्टीची आपल्याला भीती वाटते पण किती भीती वाटते हे ठरविणे कठिण आहे.

६) एखादी गोष्ट करू नये हे मानसशास्त्र सांगते पण काय करावे हे सांगणे टाळते. एखादा विद्यार्थी शिक्षा केल्याने सुधारेल पण त्याच उपायाने दुसरा विद्यार्थी सुधारेल असे सांगता येत नाही. व्यक्तीभिन्नतेमुळे असे घडते.

७) मानसशास्त्र विशिष्ट वर्तमानामागील कारणे देऊ शकते पण वर्तनामागील नेमके कारण सांगू शकत नाही. उदा. परीक्षेत एखाद्या विद्यार्थ्याला कमी गुण मिळाले कारण त्याचा अभ्यास झाला नसेल. परीक्षेची भिती त्याच्या मनात असेल इ. कारणे मानसशास्त्र सांगू शकेल पण नेमके कारण कोणते हे सांगू शकत नाही.

८) शिक्षणातील गुणवत्ता वाढीसाठी नेमके काय केले पाहिजे हे शैक्षणिक मानसशास्त्र निश्चितपणे सांगू शकत नाही. गुणवत्ता वाढीसाठी अध्यापनाची तंत्रे, मूल्यमापन साधने व अभ्यासक्रम यापैकी कोणत्या घटकात बदल करावा हे सांगता येत नाही.

### ▸ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ३

रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१) विद्यार्थ्यांच्या वर्तनातील विकासात्मक बदलाला-----म्हणतात.

२) ज्या शाखेत अध्यापन व अध्ययनाचा अभ्यास केला जातो ते शास्त्र म्हणजे ----होय.

३) शिक्षकाला आपले----- परिणामकारक पार पाडण्यासाठी शैक्षणिक मानसशास्त्राचा उपयोग होतो.

४) शैक्षणिक मानसशास्त्र ही मानसशास्त्राची ---- शाखा आहे.

५) हा शैक्षणिक मानसशास्त्राचा प्रमुख विषय ---- हा आहे.

## १.२.४ शैक्षणिक मानसशास्त्राची शिक्षकाला गरज –

शिक्षणाशी संबंधित काही समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी व शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षकाला शैक्षणिक मानसशास्त्राची मदत होते. विद्यार्थ्यांची बुद्धी, इच्छाशक्ती, अध्ययनप्रक्रिया, व्यक्तीभेद, सवयी, समायोजन, शिक्षकांचे आरोग्य इ. बाबींचे शिक्षकांना ज्ञान देऊन त्याचा वापर अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत कशा प्रकारे करता येईल हे शिक्षकांला शैक्षणिक मानसशास्त्राच्या अभ्यासामुळे समजण्यास मदत होते.

शिक्षण ही द्वि–ध्रुवात्मक प्रक्रिया आहे. विद्यार्थी आणि शिक्षक ही शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाची दोन केंद्र आहेत. अध्यापनाशिवाय अध्ययन संभवत नाही. अध्ययन–अध्यापन या परस्परावर अवलंबून असणाऱ्या प्रक्रिया आहेत अध्यापन म्हणजे विद्यार्थ्याला शिकण्यास प्रवृत्त करणे, विद्यार्थ्यांना समजावून घेणे, विद्यार्थ्यांना विचार करावयास लावणे, विद्यार्थ्यांच्या वर्तनात अपेक्षित वर्तन बदल घडून आणणे. अध्यापन केल्यामुळे अध्यपन होणे गरजेचे आहे हे शैक्षणिक मानसशास्त्राचा अभ्यास केल्यामुळे समजते.

अध्यापनाविषयीचा नवा दृष्टिकोन आत्मसात करण्यासाठी शिक्षकाने शैक्षणिक मानसशास्त्राचा अभ्यास करणे गरजेचे आहे. शिक्षण हे शिक्षक केंद्रीत नसून विद्यार्थी केंद्रीत असल्याने शिक्षणाने विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य द्यावे, कडक शिस्त त्यांच्यावर लादू नये. विद्यार्थ्यांना समजावून घेऊन त्यांच्या क्षमतेनुसार, आवडीनुसार, व्यक्तीभिन्नतेनुसार शिक्षण द्यावे हा दृष्टिकोन शिक्षकांत विकसित होण्यासाठी शैक्षणिक मानसशास्त्राची गरज शिक्षकाला आहे.

अध्ययन ही मानसिक प्रक्रिया आहे. अध्ययनासाठी अभिरूची व अवधान याची गरज असते. विद्यार्थ्यांच्या प्रभावी अध्ययनासाठी शिक्षकाने त्यांच्या अभिरूचीकडे लक्ष दिले पाहिजे. शिक्षकाच्या अध्यापनाकडे विद्यार्थ्यांचे अवधान टिकून राहण्यासाठी शिक्षकांनी कोणते उपाय करावेत याचे मार्गदर्शन शैक्षणिक मानसशास्त्र करते. यासाठी शिक्षकाला शैक्षणिक मानसशास्त्राचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

शिक्षक– विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया जितकी चांगली तितके अध्यापन आनंदी, उत्साही होते. विद्यार्थ्यांना कृतीशील बनवून त्यांचा उत्साह वाढविण्यासाठी सचेतन अध्यापन कसे करावे याविषयी शैक्षणिक मानसशास्त्र शिक्षकास मदत करते.

विद्यार्थ्यांच्या विकासाची शारीरिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक व नैतिक विकास ही अंग आहेत. वेगवेगळ्या विकासाच्या अवस्थेत विकासाची विशिष्ट लक्षणे दिसतात. ही विकासाची लक्षणे शिक्षकांना परिचित असली पाहिजेत. त्यासाठी शैक्षणिक मानसशास्त्राच्या अभ्यासाची शिक्षकाला गरज आहे.

### ▸ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ४

१) शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाची दोन केंद्रे कोणती?

२) शिक्षणाला मानसशास्त्राची कशी मदत होते?

३) अध्ययनासाठी कशाची गरज असते?

४) विद्यार्थ्यांच्या विकासाची अंगे कोणती?

## १.३. सारांश

मानसशास्त्र आणि शिक्षण या प्रकरणात आपण मानसशास्त्र म्हणजे काय? त्याचे स्वरूप त्याची व्याप्ती तसेच शिक्षण आणि मानसशास्त्र याचा अभ्यास केला. शैक्षणिक मानसशास्त्र अध्ययनार्थी आणि अध्ययनप्रक्रिया याबद्दल माहिती देणारी शाखा आहे. शैक्षणिक मानसशास्त्राचा अर्थ स्वरूप, व्यापी व मर्यादा तसेच शैक्षणिक मानसशास्त्राची शिक्षकाला कशी आवश्यकता आहे याचा अभ्यास केला.

## १.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – उत्तरे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

१) Psyche म्हणजे आत्मा Logas म्हणजे विचार.

२) ॲरिस्टॉटल

३) विल्यम वुंट

४) लाईपझिंग

५) मानवी वर्तनाचा अभ्यास करणारे शास्त्र

६) ज्ञानात्मक, मानसिक व भावनात्मक

७) सामाजिक मानसशास्त्र

८) जॉन ड्युई

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

**उत्तरे –** १) अध्ययन– अध्यापन

२) विद्यार्थी

३) मानसशास्त्र

४) उपयोजनात्मक

५) अध्ययन

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३**

**उत्तरे –** १) शिक्षण

२) शैक्षणिक मानसशास्त्र

३) अध्यापन कार्य

४) उपयोजनात्मक

५) अध्ययन

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ४**

**उत्तरे –** १) विद्यार्थी आणि शिक्षक

२) शिक्षणाशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी व शिक्षणाची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी शिक्षणाला शैक्षणिक मानसशास्त्राची मदत होते.

३) अभिरूची व अवधान

४) शारीरिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक व नैतिक विकास

## १.५ सरावासाठी प्रश्न

१) मानसशास्त्राचा अर्थ सांगून मानसशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.

२) मानसशास्त्र व शिक्षण यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

३) शैक्षणिक मानसशास्त्राच्या मर्यादा स्पष्ट करा.

४) शैक्षणिक मानसशास्त्राची शिक्षकाला काय आवश्यकता आहे.

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

करंदीकर, सु. (जून २००९). शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

देशमुख, एल. जी. (जुलै २००४). शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापनशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

जगताप, ह. ना. (ऑगस्ट २००७). शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे : नरेंद्र प्रकाशन.

नागतोडे, कि. (नोव्हेंबर २००६). अध्ययन कर्त्याचा विकास व अध्यापन, नागपूर : विद्या प्रकाशन.

❖❖❖

## घटक – २

# अध्ययनार्थीची वाढ व विकास

## (Growth and Development of Learner)


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

- २.२.१ वाढ व विकासाची संकल्पना
- २.२.२ वाढीवर परिणाम करणारे घटक
- २.२.३ विकासावर परिणाम करणारे घटक
- २.२.४ विकासाची क्षेत्रे
- २.२.५ विकासाच्या अवस्था
- २.२.६ कुमारावस्था / पौगंडावस्था

२.३ पारिभाषिक शब्द

२.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्टे :

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

i) वाढ व विकासाची संकल्पना स्पष्ट होईल.

ii) विकासाचा अर्थ स्पष्ट होईल.

iii) वाढ व विकासातील भेद स्पष्ट होईल.

iv) वाढीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट होतील.

v) विकासाची क्षेत्रे समजतील.

vi) वाढ व विकासाच्या अवस्था स्पष्ट होतील.

vii) कुमारावस्थेची लक्षणे समस्या स्पष्ट होतील.

viii) कुमारवस्थेतील शिक्षणाची भूमिका स्पष्ट होईल.

## २.१ प्रस्तावना :

Change is the soul of Life. बदल हा जीवनाचा आत्मा आहे असे आपण शिक्षणशास्त्रातील तत्त्वज्ञानात मांडतो. हा बदल मानवी जीवनात त्यांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत घडत असतो. मानवी शरीर, विचार सतत बदलत असतात. वेगवेगळ्या कारणामुळे घडणारे बदल त्याच्या शरीरातील, मनातील बदलासाठी कारणीभूत असतात. शारीरिक वाढीची जाणीव स्पष्टपणे होत असली तरी त्याच्या व्यक्तिमत्त्वातील बदल सहजपणे स्पष्ट दिसत नाहीत. त्याचा होणारा विविधांगी विकास ही अत्यंत जटिल प्रक्रिया आहे. शिक्षणशास्त्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होणारे बदल, त्यांचा एकमेकावर होणारा परिणाम याचा अभ्यास उपयुक्त ठरतो. त्यानुसार इष्ट दिशेने होणारा वर्तनातील बदल म्हणजे शिक्षण प्रक्रिया राबविणे सोपे व उपयुक्त ठरते.

यासाठी वाढ व विकासाचा अभ्यास या प्रकरणातून करणे उपयुक्त ठरेल.

## २.२ विषय विवेचन :

व्यक्तीचे जीवन जन्मापासून मृत्यूपर्यंत अनेक क्रियांनी भरलेले असते. या क्रिया अथवा कृतींचा परिणाम स्वरूप प्रतिक्रिया घडत असतात. या क्रिया प्रतिक्रियांचा परिपाक म्हणून जीवनात अनेक बदल घडतात. काही वेळा शारीरिकदृष्ट्या घडणारे बदल स्पष्टपणे दिसतात. उदाहरणार्थ व्यायाम करणाऱ्या व्यक्तीच्या स्नायूचा पिळदारपणा स्पष्ट दिसतो. परंतु अनेक गोष्टी स्पष्टपणे दिसत नसल्या तरी त्या घडताना समजतात नैराश्य, आनंद अशा भावना जाणवतात. साधारणपणे वाढ व विकास हे शब्द दैनंदिन व्यवहारात एकमेकांना समानार्थी म्हणून वापरलेले दिसत असले तरी ते वेगवेगळे अर्थ प्रतिबिंबीत करतात. वजन, उंची सारखे दिसणारे बदल वाढीसाठी वापरले जातात, तर मनाची परिपक्वतेसाठी विकास हा शब्द वापरला जातो. वाढ व विकासाची संकल्पना पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### २.२.१ वाढ व विकासाची संकल्पना

**वाढ**

वाढ म्हणजे साधारणपणे शरीराच्या आकारातील व रचनेतील मोजता येणारा (मापनशिल) व धनात्मक बदल असे सांगता येईल.

वजन, उंची, वय, शरीरातील अवयव उदा. कान, नाक, हात, पाय, डोके, हृदय इत्यादी मधील बद्दल आपणास मोजता येतो. त्यासाठी विविध एकके वापरली जातात. शरीराच्या रचनेतील फरक आपणास मोजता येतो. वाढ ही विकासापेक्षा मर्यादित संकल्पना आहे. वाढ ही कालांतराने थांबते याउलट विकास ही प्रक्रिया निरंतर सुरू असते.

**विकास**

'निश्चित दिशेने क्रमशः सुसंगतपणे व प्रागतिक स्वरूपात बदल होण्याची प्रक्रिया म्हणजे विकास प्रक्रिया होय'

विकास प्रक्रिया ही क्रमशः व सुसंगतपणे होत असते. विकासप्रक्रियेची लक्षणे पुढील प्रमाणे आहेत.

**विकास प्रक्रियेची लक्षणे :**

१. व्यक्ती व परिस्थिती यांच्या आंतरक्रियेवर विकास प्रक्रिया अवलंबून असते.

व्यक्तीला जीवन जगताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. तर्क-वितर्क करावे लागतात. अनुमान काढावे लागते त्यातून व्यक्तीचा विकास होत असतो.

२. व्यक्तीचा विकास क्रमशः व सतत घडणारी प्रक्रिया आहे.

विद्यार्थ्यांची उंची, वजन, वैचारिक पक्वता एका दिवसात वाढत नाही. तर ती क्रमबद्ध व सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे.

३. बऱ्याच वेळा विकासाची गती प्राथमिक अवस्थेत जास्त असते परंतु विकासाचा वेग वेगवेगळ्या अवस्थामध्ये कमी अधिक आढळतो.

मुलांच्या मेंदूची व शरीराची वाढ साधारणपणे लहानपणी जास्त आढळते.

४. गेसेलच्या मताप्रमाणे विकासाचे स्वरूप व गती यांच्यामध्ये असणारा अनुक्रम (Sequence) अनुवांशिक घटकांवर अवलंबून असतो.

५. विकासप्रक्रिया संश्लेषणात्मक आणि विश्लेषणात्मक असते.

६. विकास प्रक्रियेमध्ये योग्य वेळी प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळाल्यास विकासाचा वेग वाढतो.

७. विकासावर व्यक्तीभेदाचा परिणाम होतो.

विकासाचा दर हा व्यक्ती व्यक्तीगणिक भिन्न असतो.

८. विकास व स्थूलाकडन सुक्ष्माकडे होतो.

विकासाच्या मुख्य दिशा ह्या व्यक्तीचा सर्वकष विकास, प्रथम रचना व त्यानंतर कार्य, संश्लेषण, मुर्ताकडून अमूर्ताकडे, बाह्य नियंमाकाडून आंतर नियंत्रणाकडे, समायोजन, परावलंबन अनुवंश व पर्यावरण, स्वयंकेद्रितता असतात.

शारीरिक वाढ व विकासाचा परीणाम व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वावर होत असतो. यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

## २.२.२ वाढीवर परिणाम करणारे घटक

शारीरिक वाढीवर परिणाम करणारे महत्त्वाचे घटक

**अ) अन्न :**

बालकाच्या सुरूवातीच्या काळात वाढीचा वेग जलद असतो. याकाळात त्याला योग्य पोषण मिळणे महत्त्वाचे असते. मुलाला सकस व चौरस आहार मिळाला तर त्याची वाढ योग्य प्रमाणात होते. विकसित देशामध्ये योग्य आहार सरासरी मुलांना मिळतो परंतु विकसनशील देशामध्ये अपुरा आहार मिळाल्यामुळे कुपोषणासारख्या गोष्टींना अनेक बालक बळी पडतात. प्राथमिक गरज अन्न ही आहे व ती गरज पूर्ण होणे. महत्त्वाचे ठरते; याचा परिणाम वजन, उंची, आकारमान यासारख्या घटकावर अपरिहार्यपणे होतो.

**ब) व्यायाम :**

नियमित व पुरेसा व्यायाम व्यक्तीची कार्यक्षमता वाढवतो. त्याला उत्साही व आनंदी ठेवतो त्याची शारीरिक वाढ योग्य प्रमाणात व योग्य प्रकारे होण्यास उपयुक्त ठरतो. व्यायामाच्या अभावामुळे व कधी कधी अतिरेकामुळे शारीरिक वाढीवर प्रतिकूल परिणाम होताना दिसतो. व्यायामामध्ये योगासने, मैदानी खेळ, व्यायामशाळा इ. सारख्या प्रकारामुळे भूक वाढते, शांत झोप येते, ताणतणाव निवळतो व शारीरिक व मानसिक स्वस्थता मिळते.

**क) अनुवंश :**

अनुवंश हा घटक व्यक्तीच्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावत असतो. अगदी त्वचा, रंग, उंची, प्रमाण, लिंग इ. वर अनुवंश परिणाम करत असतो. अनुवंशामुळेच माता-पिता, पूर्वज यांचे गुणधर्म मुलांच्यामध्ये संक्रमित होतात. शरीररचना, कार्यिक प्रवृत्ती यावर अनुवंश परीणाम करतो.

**ड) अंतःस्त्राव :**

अंतःस्त्राव ग्रंथीची शरीरामध्ये महत्वाची भूमिका असते. यांच्या स्त्रावाच्या कमीजास्त स्त्रवण्यामुळे व्यक्तीची शारीरिक वाढ व वर्तन यावर परिणाम होत असतो.

उदा. मस्तकग्रंथीतून स्त्रवणारा अंतःस्त्राव वृक्कस्थग्रंथीला उद्दिपित करतो. तो अधिक स्त्रवला तर वाढ अभूतपूर्व होते व कमी स्त्रवला तर वाढ खुंटते व व्यक्ती ठेंगू राहते.

कंठस्थग्रंथीतून स्त्रवणाऱ्या अंतःस्त्रावामुळे शारीरिक वाढ वेगाने होते. उंची वाढून वजन कमी होते. याउलट स्त्राव कमी झाल्यास जीवनात शैथिल्य निर्माण होते. स्मरणशक्ती कमी होते व बौद्धीक विकास खुंटतो.

छातीच्या हाडापाठीमागे असणारी थायमस ग्रंथी योग्य स्त्रवत असेल तर पक्वावस्था योग्यवेळी प्राप्त होते.

वृक्कस्थ ग्रंथी कमी स्त्रवत असेल तर निर्बलता व अधिक स्त्रवत असेल तर लैंगिक पक्वता लवकर येते.

लिंग ग्रंथी स्त्री व पुरूषामध्ये भिन्न असतात. त्यांचा परिणाम शारीरिक वाढ व व्यक्तीमत्त्व यावर होत असतो.

## २.२.३ विकासावर परिणाम करणारे घटक :

**अनुवंश :**

माता व पिता जर उंच व गौरवर्णिय असतील. तर त्यांची मुले गोरी व उंच निपजतात. जर त्यांचे डोळे घारे असतील तर अपत्यांचे डोळे ही तसेच होतात. फक्त शारीरिकच नव्हे तर बौद्धिकदृष्ट्या मुलांच्यात माता-पित्याचे व त्यांचे पूर्वजाचे गुण उतरतात. अनुवंशिकता ही गुण पुढील पिढीत संक्रमित करताना दिसते. उपजत वैशिष्ट्ये ही माता-पित्याकडून बालकाकडे संक्रमित झालेली असतात. अनुवंश हा शब्दप्रयोग जीवशास्त्रीय अनुवंशाला उद्देशून वापरला जातो. अनुवंशामुळे वजन, उंची, वर्ण, बुद्धीमत्ता अशा गुणांचे संक्रमण आपत्याकडे होत असते. अनेक वेळा वैद्यकिय इतिहासाप्रमाणे आजार, शारीरिक व्यंगाचेही संक्रमण होते. एकंदरीत पाहता. विकासामध्ये अनुवंशाचा वाटासुद्धा खूप मोठा असतो. विकासासाठी उत्तम अनुवंश गरजेचा असतो. काही समाजामध्ये अनुवांशिकरित्याच बुद्धांक कमी आढळतो. तर काही ठिकाणी जास्त आढळतो. अनुवंशाचे तीन नियम मनुष्यात येतात.

१) सामान्यपणे मुले आपल्या माता-पित्याप्रमाणे असतात.

२) एकाच माता-पित्यांची मुले निरनिराळ्या गुणधर्मांची असतात. जीवधारणेच्यावेळी निरनिराळ्या रंगमण्याचा संयोग होऊन जीवांचे गुणधर्म ठरतात.

३) प्रत्येक गुणधर्मामध्ये परागामी प्रवृत्ती आढळते (Regressive Tendency) अपत्याच्या प्रत्येक गुणधर्मामध्ये सरासरीकडे झुकण्याचा कल असतो.

उदा. अलौकिक बुद्धमत्तेच्या माता-पित्यांची मुले थोड्या कमी बुद्धीमत्तेची जन्मास येतात.

वरील नियमानुसार अनुवंशिकरित्या गुणधर्म अपत्यामध्ये येतात त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर अपत्याच्या विकासावर होताना दिसतो.

**परिस्थिती :**

परिस्थितीमध्ये व्यक्तीची जीवधारणा झालेपासून मृत्यूपर्यंत प्रभावित करणाऱ्या सर्व आंतरिक व बाह्य गोष्टिंचा समावेश होतो. उदा. भौगोलिक परिस्थिती कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, राजकीय परिस्थिती, आर्थिक परिस्थिती इत्यादी.

मानसशास्त्रीयदृष्ट्या आंतरिक परिस्थिती व बाह्य परिस्थिती असे दोन प्रकार पडतात.

**१) आंतरिक परिस्थिती :**

आंतरिक परिस्थिती या घटकासंबंधी पेशीअंतर्गत परिस्थिती, आंतरपेशीय परिस्थिती व अंतःस्त्राव या तीन घटकांचा विचार करावा लागेल.

**अ) पेशीअंतर्गत परिस्थिती :**

पेशीतील रंगमण्यावर केंद्राभोवती असणाऱ्या पेशीद्रवाचा परिणाम होतो हा द्रव बदलला तर विकसित प्राण्यामध्ये बदल होतो.

**ब) आंतरपेशीय परिस्थिती :**

पेशीची संख्या वाढत असताना त्यांचा शेजारच्या पेशीवर परिणाम होत असतो. ह्या परस्परसबंधावरून पेशीची वैशिष्ट्ये ठरतात.

**क) अंतःस्त्राव :**

यापूर्वीच अंतःस्त्रावाचे परिणाम आपण पाहिले आहेत. अंतःस्त्रावाचा मोठा परिणाम वाढ व विकासावर होताना दिसून येतो.

**२) बाह्य परिस्थिती :**

बाह्य परिस्थितीचे विभाजन दोन भागात केले जाते.

**अ) जन्मपूर्व परिस्थिती :**

सध्या गर्भसंस्कार महत्त्वाचे मानले जाऊ लागलेत कारण गर्भात असताना मातेचा अयोग्य आहार, त्रासदायक मानसिक स्थिती, आजार, अपघात, मादक पदार्थांचे सेवन, प्रावायूचा पुरवठा अशा अनेक गोष्टीचा विपरीत परिणाम भ्रुणावर होतो. याउलट योग्य आहार, व्यायाम, मनस्थिती यांचेमुळे भ्रुणावर सकारात्मक परिणाम होताना दिसतो.

**ब) जन्मोत्तर परिस्थिती :**

जन्मानंतर परिस्थितीचा प्रभाव व्यक्तीचे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीत क्रिया प्रतिक्रियांची जटीलता यावर अवलंबून असतो. सामाजिक चालीरिती, रूढी, समज, गैरसमज, शैक्षणिक प्रगती, शहरी वा ग्रामीण विभाग, माध्यमे, विकसित अथवा विकसनशील देश, धर्म, जाती, समाज, भौगालिकता, आर्थिक परिस्थिती अशा अनेक बाबींचा परिणाम विकासावर होताना दिसतो. कधी प्रतिकूल तर कधी अनुकूल असा परिणाम व्यक्तीवर जन्मानंतर घडून त्याचे व्यक्तिमत्त्व आकारास येताना दिसते.

जन्मपूर्व व जन्मोत्तर परिस्थितीचा परिणाम अशाप्रकारे व्यक्तीच्या विकासावर वेगवेगळ्या प्रकारे होताना दिसतो.

◆ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) वाढ म्हणजे काय?

२) विकासाची व्याख्या थोडक्यात लिहा.

३) परिस्थितीचे प्रकार कोणते?

### २.२.४ : विकासाची क्षेत्रे :

व्यक्तीचा विकास हा वेगवेगळ्या अंगानी होत असतो. व्यक्ती विकासावर अनुवंश व परिस्थितीनुरूप परीणाम होऊन अनेक क्रिया प्रतिक्रियांनी त्याचा सामाजिक, मानसिक, भावनिक, शारीरिक विकास होत असतो. या विभिन्न क्षेत्रामध्ये होणाऱ्या विकासाचे पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देता येईल.

**अ) शारीरिक व कारक विकास :**

**१) शारीरिक विकास :**

भ्रुणावस्थेपासून मृत्यूपर्यंत विकास होत असतो. हे जसे खरे असले तरी शारीरिक विकास हा वयाच्या वेगवेगळ्या टप्प्याप्रमाणे होत असतो. जसे लहान मुलाला लिहिण्यासाठी पेन दिला तर त्याला लेखन कौशल्य आत्मसात होणारा नाही. विशिष्ट वयातच इयत्ता १ लीत (६ वर्षे प्रवेश दिला जातो कारण त्यापूर्वी त्याचा शारीरिक व मानसिक विकास झालेला नसतो.) प्रत्येक वयोगटानुसार विकासाच्या अवस्था ठरलेल्या असतात.

शैशवावस्थेत, जन्मापासून ३ वर्षात श्वासोच्छ्वास पचन, रक्ताभिसरण, तापमान, याबाबत मूल स्वतंत्र असते. प्रकाश, ध्वनी, तापमान, क्लेश या गोष्टींना मूल प्रतिसाद देते. त्याला ध्वनी उच्चारण करता येते. भाषा समजू लागते. भाषा वापरायला शिकते. नवे शब्द ग्रहण करायला शिकते. वापरायला शिकते.

पूर्व बालपणात (४ ते ६ वर्षे) आकाराची रचना, सायकल चालवण्यासारखे कौशल्य ते शिकते. दुधाचे दात पडू लागतात. रेखाचित्रे काढू शकते. पश्चात बालपणात ६-१२ वर्षे या काळात, वाचन, लेखन, गणन करू शिकते. वेगवेगळ्या कृती करू लागते. शारीरिक वाढीचा वेग ९ ते १२ वर्षात मुलीचा तर ११ ते १४ वर्षात मुलांचा जास्त असतो. दुधाचे दात जाऊन कायमस्वरूपी दात येतात. छाती रूंद व सपाट बनते. वजन ३ ते ५ पौंडाने वाढते तर उंची २ इंच प्रतिवर्षी वाढते. स्नायूवर ताबा येतो, रक्ताभिसरण पचन यासारख्या संस्था मजबूत होतात.

कुमारावस्थेत मुलांच्या मस्तक ग्रंथी, लैंगिक ग्रंथी, वृक्कस्थ या ग्रंथीत बदल होतात. मुलांचे खांदे रूंदावतात, आवाज घोगरा होतो, लैंगिक ग्रंथीची वाढ होते. मुलींचे स्तन व नितंब आकार घेऊ लागतात. शरीर प्रमाणबद्ध होते. कटी रूंदावते, शारीरिक पक्वता प्राप्त होते. मुलांचे हाडे बळकट होतात.

**२) कारक विकास :**

चालणे, धावणे, पकडणे, फेकणे, चढणे, उतरणे वस्तु हाताळणे, आकृती काढणे, नमुने तयार करणे, यंत्र चालवणे, खेळणे या शरीरातील स्नायूच्या व अवयवांच्या हालचाली कारक क्रिया म्हणून ओळखल्या जातात. या क्रियांचा विकास गर्भावस्थेच्या तिसऱ्या महिन्यापासून सुरू होतो. गर्भावस्थेत हात पाय हालवणे, मुठी उघडझाप करणे. यासारख्या क्रिया मुल करते.

मुल जन्मोत्तर अवस्थेत रांगणे, बसणे, उभे राहणे, चालणे अशा क्रिया करत असते. कारक विकास हा विशिष्ट क्रमाने होत असतो. कारक विकासाचा वेग सरावाने वाढवता येतो. विशिष्ट कौशल्ये विशिष्ट अवस्थेत चांगली संपादित केली जाऊ शकतात. त्यामुळे कारक विकासाचा अभ्यास शिक्षणशास्त्रात महत्त्वाचा मानला जातो.

**ब) मानसिक विकास :**

व्यक्तीच्या विकासाच्या क्षेत्रामध्ये मानसिक विकासाला खूप महत्त्व आहे. यामध्ये साधारणपणे खालील अंगाचा समावेश करतात.

(i) बुद्धीचा विकास (ii) भाषेचा विकास

(iii) संबोधाचा विकास (iv) समस्या निराकरण क्षमतेचा विकास

**i) बुद्धीचा विकास :**

अभिक्रमशीलता (Initiative) निर्णयक्षमता (Judgement) आणि समायोजन (Adaptibility) म्हणजे बुद्धी होय असे 'बीने' याने म्हंटले आहे.

बुद्धीचा विकास मुलाच्या विकासाचा घाट, वातावरण, वातावरणातील सामाजिक व मानसशास्त्रीय घटक व बुद्धीमापणातील वापरलेल्या कसोटीचे स्वरूप यावर अवलंबून असतो. बौद्धिक विकास वयाच्या १६ ते २१ व्या वर्षापर्यंत चालू राहतो.

**ii) भाषेचा विकास :**

इतरांना समजू शकतील असे शब्दोच्चार मुल दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी करू लागते. पाच वर्षापर्यंत त्याला साधारण गोष्टी समजण्याइतपत भाषा समजते. हा विकास त्याच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतो. सुशिक्षित व सुसंस्कृत पालकाकडून मुलाचा भाषाविकास चांगला होतो. प्रौढांच्या सानिध्यात राहणाऱ्या बालकांचा भाषाविकास चांगला होतो.

सीशोअरने (Seashore) आपल्या अभ्यासावरून पुढीलप्रमाणे अंदाज व्यक्त केला आहे.

| वय | शब्दसंपत्ती |
|---|---|
| ४ वर्षे | ५६०० मूळ शब्द |
| ५ वर्षे | ९६०० मूळ शब्द |
| ६ वर्षे | १४,७०० मूळ शब्द |
| ७ वर्षे | २१,२०० मूळ शब्द |
| ८ वर्षे | २६,३०० मूळ शब्द |
| १० वर्षे | ३४,३०० मूळ शब्द |

६ व्या वर्षात व्याख्या करणे तर अर्थाविष्कार व स्पष्टीकरण क्षमता बारा वर्षापर्यंत प्राप्त होते.

१३ व्या वर्षी शब्दरूप देणे, विरूद्ध अर्थी, समानार्थी शब्द वापरणे अशा क्षमता प्राप्त होतात.

**iii) संबोधाचा विकास :**

अनेक अनुभवांचे संकलन करून काढलेले सार म्हणजे संबोध असे म्हणता येईल. यासाठी वस्तूचे निरीक्षण, वैशिष्ट्ये शोधणे, समान्यीकरक करणे आवश्यक असते. मुलांच्या मनात संबोध स्थूलरूपाने तयार होतात. संबोध साधारणपणे पुढीलप्रमाणे असतात.

१) अंतर व जागा याविषयीचे संबोध

२) वेळेचे संबोध

३) संख्याविषययक संबोध

४) परस्परसंबंध व कारण विषयक संबोध

वरील संबोध हे क्रमशः विकसित होत असतात. यासाठी विद्यार्थी/ बालकाला विविध प्रकारचे अनुभव मिळणे गरजेचे असते.

**iv) समस्या निराकरण क्षमतेचा विकास :**

साधारणपणे बौद्धीक वा व्यावहारिक समस्या असतात. त्यांचे निराकरण करणेच्या क्षमतांचा विकास गरजेचा असतो.

अडीच ते तीन वर्षापासून तर्कशक्तीचा विकास होऊ लागतो. परंतु हा तर्क अवतीभोवतीच्या मुर्त वस्तुशीच असतो. वयानुसार हे क्षेत्र विकसित होत असते.

बालकाला समस्येचे नीट आकलन होत नाही. ५-६ वर्षाच्या मुलाला समस्या वर्णन करता येत नाही तरी ८-१० वर्षाच्या मुलाला ती व्यक्त करता येते. समस्येनुसार प्रयत्न प्रमाद, अनुकरण, सुचनापालन, अनुमान, मर्मदृष्टिमुलक विचार विकसित होत जातात. याबरोबर समस्या निराकरणाचा वेग व अचुकता वयाबरोबर वाढत जातात. यासंदर्भात पालक, शिक्षक, समाज यांचे मार्गदर्शन व्यक्तीला मोलाचे ठरते.

शैशवावस्थेमध्ये (० ते ५ वर्ष) प्रामुख्याने संवेदना, अवबोध, स्मरण, कल्पना, तर्क विचार यामधील कल्पनाविश्वात मुले रमतात. त्यांना बडबडगीते, परिकथा यांची आवड निर्माण होते.

बाल्यावस्था (६ ते १२ वर्ष) किंवा किशोरावस्थेमध्ये स्मरणशक्ती विकसित होते. कूटप्रश्न, कोडी सोडवण्याकडे कल असतो. वेळेची संकल्पना विकसित होत असते. निरीक्षण व अवधान कक्षा विस्तारत असते. कल्पनेने चित्र काढणे, रंगवणे याबरोबर अनेक सृजनशील व कल्पनेने निर्मित खेळ मुले खेळतात.

कुमारावस्था किंवा पौगंडावस्थेत (१३ ते १८ वर्ष) मुलांची अमुर्त विचार करण्याची शक्ती विकसित होते. गणित, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान समजू लागते. अभिरूची विस्तारते. अवधान कक्षेत वाढ होते. अमूर्त प्रश्नही सोडवू लागतात. मुले चिकित्सक बनतात. तर्क करतात व वादविवादात भाग घेता. स्वतःच्या जीवनाचे तत्त्वज्ञान मांडायला सुरवात करतात.

**क) भावनिक विकास :**

व्यक्तीचा विकास हा भावनिक विकासावरही अवलंबून असतो. दैनंदिन जीवनामध्ये त्याला क्रिया प्रतिक्रिया यांच्या जटीलतेमुळे वेगवेगळ्या भावनांचे व्यवस्थापन करावे लागते. भावनांचे व्यवस्थापन जमले नाही तर शारीरिक, कारक व मानसिक क्षमतेवर परिणाम होतात. उदा. रागाचे व्यवस्थापन जमले नाही व राग अनावर झाला तर हिंसेचे प्रसंग उद्‌भवतात. अगदी सुरूवातीपासून श्वासांची लय बिघडते. शरीराचे तापमान वाढते, घसा कोरडा पडतो, हृदयाची स्पंदने वाढतात. शरीराला घाम फुटतो, चेहरा व डोळे लाल होतात. रागामुळे हिंसा घडून दुसऱ्याला इजा पोहचण्याचा संभव असतो व आपले सामाजिक, आर्थिक नुकसान घडते.

भावनांच्या व्यवस्थापनसाठी योग्य बौद्धीक विकास, समवयस्क व्यक्तीचे अनुसरण, वडीलधारी मंडळीचा उपदेश व मार्गदर्शन, संस्कार वा नीतीमुल्यांची रूजवणूक व अनुभवांची समृद्धता यांचा सिंहाचा वाटा असतो.

प्रामुख्याने राग, भीती, चिंता, सहानुभूती इ. भावना प्राबल्याने आढळतात. यांचे व्यवस्थापन हे वय, परिस्थिती व अनुभव यानुसार बदलताना आढळते.

शैशवावस्थेत (० ते ५ वर्ष) प्रामुख्याने भीती, राग, आनंद, प्रेम इ. भावनांचा अविष्कार दिसतो. या वयोगटातील मुले संवदेनशील असतात. या वयात भावनावर नियंत्रण कमी प्रमाणात असते.

किशोरावस्था/ बाल्यावस्थेत (६ ते १२ वर्षे) या वयोगटामध्ये पालकांनी, शिक्षकांनी आपले कौतुक करावे प्रोत्साहन द्यावे ही भावना बालकाची असते. त्यांच्या मनात, भूत, प्रेत, अंधार, ढगांचा गडगडाट इ. बद्दल भीती असते. त्याच्यावर दोषारोपन केले तर त्याला राग येतो. स्वतःच्या भावनांचे शब्दांकन तो करू शकतो. नावडणाऱ्या गोष्टीबद्दल नापसंती दर्शवणे अशा प्रकारचा भावनिक विकासाचा हा कालखंड असतो.

कुमारावस्था किंवा पौंगडावस्थेमध्ये (१३-१८ वर्ष) कुमारामध्ये भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाढते. त्यामुळे भिन्नलिंगी व्यक्तीशी वर्तन करताना तो/ती गोंधळते. बंडखोर वृत्ती वाढीस लागते. अविष्काराच्या पद्धती बदलतात. मानसिक संघर्ष निर्माण होतो. मुले संवेदनशील बनतात. राग आला तर अबोला धरतात, बोलणे टाळतात. अहंकाराला धक्का लागला तर उलट बोलणे, हात उगारणे असे वर्तन करतात. या वयामध्ये भावनिक आंदोलने सतत चालू असतात. मनामध्ये विचारांचे वादळ घोंघावत असते. याच काळात ते आपले आदर्श निवडतात व अनुकरण करतात. या वयामध्ये प्रचंड ताण त्यांच्या मनावर असतो. त्यामुळे या वयाला ''वादळी अशांततेचा काळ'' असे म्हंटले जाते.

**ड) सामाजिक विकास**

शारीरिक व मानसिक विकासात अनुवंशाचा वाटा बराचसा असतो. परंतु साामजिक विकासात मात्र व्यक्तीने संपादित केलेला भाग प्रचंड मोठा असतो. मुलाच्या आईपासून कुटूंब व कुटूंबापुढे जाऊन समाज आंतरक्रियेचा भाग त्याचा सामाजिक विकास घडवतो. असे म्हंटले तर ते वावगे ठरणार नाही. मुलाला मिळणारे विशिष्ट वयातील सामाजिक वातावरण त्याच्या सामाजिक विकासात महत्त्वाचे आहे.

मुलाचे सामाजिक वर्तनातील विशिष्ट वर्तनप्रकार पुढीलप्रमाणे

अ) भांडणतंटे

ब) मैत्री

क) लोकप्रियता व नेतृत्त्व


ड) स्पर्धा व सहकार्य

भाडणतंटे हे आंतरक्रिया होताना अन्याय झाल्यासारखे वाटणे यामुळे होतात तर मैत्री आपल्याला समवयस्कर, मदत करणारा, हुशार, समविचारी वा प्रभावी व्यक्तीशी होत असते. स्वतःच्या बुद्धीमत्तेने, व्यक्तीमत्त्वाने स्नेहपूर्ण कृतीने, नेतृत्त्व क्षमतेने आपण नेतृत्त्व करावे व लोकप्रिय व्हावे असे सर्वांनाच वाटत असते. तर इतरांना योग्य तेथे

सहकार्य करणे व आवश्यक असेल तर स्पर्धा व्यक्ती करत असते. हे सर्व प्रकार प्रामुख्याने सामाजिक वर्तनामध्ये मोडतात. बालकाच्या वेगवेगळ्या वाढीच्या अवस्थेत ते आपल्याला पुढीलप्रमाणे आढळतात.

### २.२.५ विकासाच्या अवस्था :

वेगवेगळ्या विकासाच्या क्षेत्रामध्ये आपल्याला ह्या अवस्थांचे ज्ञान झाले असेलच साधारणपणे पुढील तक्त्याद्वत्तरे त्या अवस्था मांडता येतील.




वरील अवस्था या मानसशास्त्रज्ञांनी अभ्यासाच्या सोयीसाठी बनवल्या आहेत या अवस्था सामान्यपणे मांडलेल्या आहेत. एक अवस्था कधी संपते आणि दुसरी कधी सुरू होते हे अचूकपणे सांगता येत नाही. या अवस्थेमध्ये संक्रमणाची अवस्था कुमारवस्थेला मानले जाते. यानंतर व्यक्ती प्रौढ बनते. शिक्षणशास्त्रात या अवस्थेचा अभ्यास केला जातो. त्यातील लक्षणे, समस्या व उपाय आपल्याला याप्रकरणात पुढे अभ्यासाचे आहेत.

शैशवावस्थेपासून बालकाचा सामाजिक विकास सुरू होतो. पहिल्या दोन वर्षापर्यंत घरातील व्यक्तीपर्यंत तो मर्यादित असतो. शिशुभवनामध्ये समवस्यकांच्या बरोबर मिळून मिसळून खेळणे, गाणी म्हणणे, सहकार्य करून खेळणे इथपर्यंत तो मर्यादित असतो.

बाल्यावस्थेत तो गटाचे नियम पाळणे, शिस्त पाळणे, सांकेतिक भाषा वापरणे, गोपनियता ठेवणे मित्रांची निवड, स्वभाव, खेळ कौशल्ये, वृत्ती यानुसार करतो. मित्रांशी जमवून घेणे नेतृत्त्व व सहकार्य या गुणांचा विकास

या काळात होतो.

कुमारावस्थेत मात्र तो स्वतःचा गट निर्माण करतो. आदर्श शोधतो. आदर्श निवडल्यावर त्याचे अनुकरण करतो. बऱ्याचवेळा तो व्यक्तीपूजक बनतो. समविचारी, समान मुल्ये, समान सवयी असणाऱ्यांशी मैत्री जमवतो व गट करून राहतो. विचारांची देवाणघेवाण करतो. समाजातील विषमतेमुळे चिडखोर बनतो, कधी बंड करतो. अन्यायाविरूद्ध लढा देण्याची तयारी करतो. जबाबदारी घेतो व पार पाडतो. परलिंगी व्यक्तीच्या आकर्षणापोटी नीटनेटका राहतो. सौंदर्यप्रसाधने वापरतो. सामाजिक विकास या काळात वेगाने होत असतो कारण तो प्रौढावस्थेकडे वाटचाल करताना दिसतो.

◆ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

१) विकासाची प्रमुख क्षेत्रे कोणती?

२) बीनेच्या मते बुद्धी म्हणजे काय?

३) संबोधाचे चार प्रकार कोणते?

४) मानसिक विकासाची प्रमुख अंगे कोणती?

## २.२.६ कुमारावस्था/ पौंगडावस्था (१३ ते १८ वर्ष) :

'वादळी अशांततेचा काळ' म्हणून ओळखला जाणारा व्यक्तीच्या आयुष्यातील महत्त्वाचा काळ कुमारावस्थेचा असतो. या काळातील लक्षणे पुढीलप्रमाणे

**कुमारावस्थेची लक्षणे :**

या कालावधीत मुला-मुलीमध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक स्थितंतरे घडत असतात. अनेक विचार व भावना उचंबळत असतात. मुले-मुली या शारीरिक परिवर्तनामुळे गोंधळलेल्या अवस्थेत असतात. त्यांच्या वर्तनात बदल होतो. भावनांची वादळे घोंघावतात व समायोजन कठीण होत असते.

१) कुमारावस्थेमध्ये शरीररचनेत बदल होत असतात. मुलांचे खांदे रूंदावतात, वजन व उंचीत वाढ होते. आवाज घोगरा होतो. मिसरूड फूटते, लैंगिक इंद्रिये कार्यक्षम होतात. तर मुलींच्या नितंब व स्तनांना गोलाई प्राप्त होते. मासिक पाळी सुरू होते. लैंगिक ग्रंथींचा विकास होतो, उंची, वजन वाढते.

२) या वयातील शारीरिक बदलामुळे मुले गोंधळून जातात. त्यांच्यामध्ये अस्थिरता निर्माण होते.

३) काही मुले, मुली निराश होतात. शारीरिक व्यांधीना बळी पडतात. विकृत सवयींना बळी पडतात.

४) मुला मुलींची तर्कशक्ती विकसनामुळे विचारशक्ती विकास पावते, त्यामुळे ते वाद-विचाद, चर्चा विचारांची अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न करतात. प्रसंगी बंडखोर बनतात.

५) समविचारी मुलांबरोबर गटाने राहतात. अहंकारी बनतात. भावनिक ताण-ताणावाच्या अवस्थेत असतात.

६) या वयात भावनिक आंदोलने सतत चालू असतात, त्यामुळे मनात विचारांचे काहूर माजते.

७) भावी जीवनाविषयी सुखस्वप्ने रंगवत कल्पनाविलासात रममाण असल्यामुळे वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करतात.

८) या वयात ती आदर्शाच्या शोधात असतात. कधी कधी चुकीचे आदर्श निवडतात.

९) चुकीच्या संगतीने फॅशन म्हणून व्यसनाधीन होतात.

१०) सामाजिक रूढी, परंपरा, झुगारून देण्यासाठी प्रसंगी बंड करतात.

११) व्यक्तीपूजक बनतात. वास्तववादी जीवनाकडे झुकू लागतात.

१२) अभिरूची क्षेत्र विस्तारते, अवधान वाढते, तर्कशक्तीचा विकास होतो. मुर्ताबरोबर अमूर्त संकल्पना समजू लागतात.

**कुमारावस्थेतील समस्या :**

स्टॅन्ले हालच्या म्हणण्याप्रमाणे प्रक्षुब्धतेचा ताण-तणाव, संघर्षाचा हा काळ असतो. या काळात प्रचंड ताण-तणाव, संघर्ष यांची निर्मीती होत परिणामी हा अत्यंत नाजूक व कठीण काळ मानला जातो.

लेकॉक याने कुमारावस्थेतील समस्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

१) शारीरिक वाढ व व्यावहारीक जीवनातील बदलाशी समायोजनासंदर्भात समस्या.

२) भावनात्मक अवलंबित्वापासून मुक्तता.

३) स्वतःची वैशिष्टयूपर्ण लैंगिक भूमिका लक्षात घेऊन परलिंगी व्यक्तीशी समायोजन.

४) योग्य करीअर (नोकरी वा व्यवसाय) निवडणे व त्याला प्रवेश घेणे.

५) जीवनाचे तत्त्वज्ञान हेतू निश्चित करून ठरविणे.

कुमारावस्थेचा काळ १३- १४ वर्षापासून सुरू होतो. लैंगिक शिक्षणाच्या अभावामुळे व नैसर्गिक उर्मींचे शमन न झाल्यामुळे त्यांचा गोंधळ उडत असतो. पालकांची अस्पष्ट उत्तरे विचार व आचार लादण्याची मनोवृत्ती यामुळे निर्माण होणारे संघर्ष, दोन पिढ्यातील अंतर यामुळे समस्या निर्माण होतात. आदर्शाचे अनुकरण व वास्तव यामधील दुरीमुळेही समस्या निर्मिती होते.

**शिक्षणाची समस्या निराकरणातील भूमिका :**

जॉन डयुई यांच्या मताप्रमाणे कुमारावस्थेतील मुलांच्या समस्येवर मात करण्यासाठी शाळेतील वातावरण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षक, पालक व मित्र-मैत्रिणी या घटकांचा प्रभाव कुमारावस्थेतील मुलांच्यावर होत असतो. या वयामध्ये मुले गुन्हेगारी, व्यसने, हिंसा, अनाचार या मार्गाकडे वळण्याची शक्यता दाट असते. यासाठी शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्वाची ठरते.

१) शिक्षणाने मुलांना त्यांच्या शारीरिक व मानसिक वाढीविषयी कल्पना द्यावी. समुपदेशनाने त्यांना त्यांच्यातील शारीरिक बदल, अंतस्त्रावी ग्रंथीचे कार्य याविषयी माहिती द्यावी. यासाठी माध्यमांची मदत घ्यावी.

२) कुमारावस्थेत भिन्नलिंगी व्यक्तीविषयी वाटणारे आकर्षण लैंगिग प्रवृत्तीचे उदात्तीकरण यासाठी खेळ, कवायती, नाटय, चित्रकला, संगीत, गिर्यारोहन असे कार्यक्रमांचे आयोजन करावे.

३) पालकांसाठी मार्गदर्शन व समुपदेशन आयोजित करून त्यांना मुलांशी मित्रत्वाचे संबंध निर्माण करण्यास प्रोत्साहन द्यावे. योग्य ते कुटूंबातील स्वातंत्र्ययुक्त वातावरण निर्मितीस चालना द्यावी.

४) वाद विवाद, चर्चा, छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, अशा कार्यक्रमातून त्यांच्यापुढे योग्य आदर्श व संस्कार निर्माण करावेत.

५) मुला मुलींना लैंगिक जीवनाविषयी योग्य माहिती देण्यासाठी डॉक्टर, समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते यांची व्याख्याने व कार्यक्रम आयोजित करावीत.

६) व्यसने, गुन्हेगारी याविषयी पोलिस, डॉक्टर मानसशास्त्रज्ञ यांचे मार्गदर्शन ठेवावे.

७) विविध छंदवर्ग, व्यायामप्रकार, वाद-विवाद, उत्तम व्यक्तीमत्त्वे यांचा परिचय अशा प्रकारचे अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर उपक्रम राबवावेत.

८) भावनिक अशांततेमुळे निर्माण होणाऱ्या ताण-तणावासाठी योग, ध्यान अशा शिबीरांची माहिती व शक्य झाल्यास आयोजन करावे.

९) शाळेमध्ये लोकशाहीयुक्त वातावरण असावे; ज्यामुळे कुमारांचा अनादर, अपमान होणार नाही. वर्गामध्ये निर्भत्सना, अपमान, कमी लेखणे अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत.

१०) राष्ट्रप्रेम, त्याग, सहकार्य, बंधूभाव, समानता प्रेम अशी मुल्ये संस्करीत करण्यासाठी शाळेने प्रयत्न करावेत.

## २.३ परिभाषिक शब्द

समायोजन : सर्व गोष्टींचा योग्य मेळ घालून, सफाईदारपणे कृती करणे.

अवधान : एखाद्या गोष्टीकडे वळवलेला मनाचा ओघ.

पक्वत : विशिष्ट क्षमता प्राप्त करण्यासाठी आवश्यक कौशल्यांचे संपादन, विशिष्ट वयानंतरच विशिष्ठ कृती करता येते.

व्यक्तीमत्त्व : व्यक्तीच्या गुणांचा शारीरिक, मानसिक बौद्धीक, भावनिक समुच्चय.

अवबोध : विशिष्ट संवेदना होताच मन त्याचा अर्थ लावते व त्याच्या अर्थाचा आपणास जो बोध होतो त्यालाच अवबोध म्हणतात.

अभिवृत्ती : वृत्ती, वस्तू, व्यक्ति आणि प्रक्रिया यांच्या विषयीचा व्यक्तीच्या मनाचा कल किंवा मनस्थिती.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

१) वाढ म्हणजे साधारणपणे शरीराच्या आकारातील व रचनेतील मोजता येणारा (मापनशील) धनात्मक बदल होय.

२) विकास म्हणजे निश्चित दिशेने क्रमशः सुसंगतपणे व प्रागतिक स्वरूपात बदल होण्याची प्रक्रिया.

३) आंतरिक परिस्थिती व बाह्य परिस्थिती हे परिस्थितीचे प्रमुख प्रकार आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

१) विकासाची प्रमुख क्षेत्रे पुढीलप्रमाणे

अ) शारीरिक व कारक विकास

ब) मानसिक विकास

क) भावनिक विकास

ड) सामाजिक विकास

२) बीनेच्या मते बुद्धी म्हणजे अभिक्रमशीलता, निर्णयक्षमता आणि समायोजन होय.

३) संबोधनाचे चार प्रकार पुढीलप्रमाणे

१) अंतर व जागा याविषयीचे संबोध

२) वेळेचे संबोध

३) संख्याविषयक संबोध

४) परस्परसंबंध व कारणविषयक संबोध.

४) (अ) बुद्धीचा विकास (ब) भाषेचा विकास

(क) संबोधाचा विकास (ड) समस्या निराकरण

क्षमतेचा विकास ही मानसिक विकासाची प्रमुख अंगे आहेत.

## २.५ सारांश

या घटकांत आपण व्यक्तीचा बाल्यावस्थेपासून कुमारावस्थेपर्यंतचा सखोल अभ्यास केला. वाढ व विकासातील फरकासहीत संकल्पना समजून घेतली वाढ व विकासाचा अर्थ, विकासप्रक्रियेची लक्षणे अभ्यासली. वाढीवर व विकासावर परीणाम करणारे घटक यांचे अध्ययन केले. विकासाची शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक क्षेत्रे त्यांचे बाल्यावस्थेपासून कुमारावस्थेपर्यंतचे विकासाचे टप्पे अभ्यासले.

वाढ व विकासाच्या अवस्था थोडक्यात पाहिल्या; यामध्ये महत्त्वाची असणारी कुमारावस्था व तिच्यातील समस्या, समस्यानिराकरणीत शिक्षणाची भूमिका यांचा अभ्यास केला.

## २.६ सरावासाठी प्रश्न

१. अनुवंश व परिस्थिती या संकल्पना स्पष्ट करून त्यांचे वाढ व विकासातील महत्त्व स्पष्ट करा.

२. वाढ व विकासातील फरक स्पष्ट करा.

३. कुमारावस्थेची लक्षणे स्पष्ट करा.

४. कुमारावस्थेतील समस्या निराकरणातील शिक्षणाची भूमिका स्पष्ट करा.

५. कुमारावस्था ही 'वादळी अशांततेचा काळ' म्हणून का ओळखली जाते ते स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ :

करंदीकर सुरेश (२००१). अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र. कोल्हापूरः फडके प्रकाशन.

कुलकर्णी के. व्ही. (१९७७). शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे: श्री विद्या प्रकाशन.

खरात आ. पां. (१९७४). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे: श्री विद्या प्रकाशन.

पारसनीस न. रा. (१९८२). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे: नूतन प्रकाशन.

Bhatia, B. D. Safaya R. N. (1967) : Educational psychology and Guidance Dhanwant Rai & Sons, Delhi.

Mathur S. S. (1971). Educational Psychology Vinod, Pustak Mandir. Agra.

❖❖❖

## घटक ३

# व्यक्तिमत्त्व

## (Personality)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ व्यक्तिमत्त्वाचा अर्थ

  ३.२.२ व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप

  ३.२.३ व्यक्तिमत्वाच्या व्याख्या

  ३.२.४ व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे घटक

  ३.२.५ सुसंघटिक व्यक्तिमत्त्व

  ३.२.६ सुसंघटित व्यक्तिमत्त्व निर्मितीसाठी शैक्षणिक उपक्रम

  ३.२.७ व्यक्तिमत्त्वाच्या उपपत्ती

३.३ पारिभाषिक शब्द

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे :

या घटकांच्या अभ्यासानंतर आपणास पुढील गोष्टी सांगता येतील.

१) व्यक्तिमत्त्वाचा अर्थ सांगता येईल.

२) व्यक्तिमत्त्वाचे स्वरुप स्पष्ट करता येईल.

३) विविध मानसशास्त्रज्ञांच्या व्याख्या सांगता येतील

४) व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे घटक सांगता येतील.

५) सुसंघटीत व्यक्तिमत्त्वाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

६) व्यक्तिमत्त्वाच्या विविध उपपत्ती व त्यांचे वर्गीकरण स्पष्ट करता येईल.

७) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व निर्मितीसाठी शैक्षणिक उपक्रम सुचविता येतील.

## ३.१ प्रास्ताविक :

व्यवहारात आपण आपल्या आजूबाजूच्या व्यक्तींचे वर्णन करण्यासाठी व्यक्तिमत्त्व हा शब्दप्रयोग करतो. अथवा पर्सनॅलीटी हा शब्द वारंवार वापरतो. प्रत्येक व्यक्ती त्याच्या ठिकाणी असणाऱ्या वैशिष्ट्यामुळे इतराहून भिन्न असते आणि या भिन्नतेची सामान्य जाणीव आपणास असते. व्यवहारात व्यक्तिमत्त्व हा शब्द अगदी संकुचित अर्थाने वापरला जातो. हे आपणास दैनंदिन जीवनातील अनेक अनुभवांवरून पटेल. आमक्याला व्यक्तिमत्त्व आहे, तमक्याला व्यक्तिमत्त्व नाही. व्यक्तिमत्त्व ही दैवी देणगी आहे. या विधानावरून व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप स्पष्ट न होता सामान्य लोक तो एक निरर्थक शब्द म्हणून त्याचा वापर करतात की काय अशी शंका येते. व्यवहारात व्यक्तिमत्त्व हा शब्द आजूबाजूच्या व्यक्तींचे वर्णन करण्यासाठी वापरला जातो. एखादी गोरीपान, रूबाबदार व्यक्ती पाहिली की, काय देखणे व्यक्तिमत्त्व आहे! असे म्हणतो. तर अगदी उंच, किडकिडीत, रंगाने सावळी किंवा बुटकी व्यक्ती असेल तर त्या व्यक्तिस व्यक्तिमत्त्वच नाही असे म्हटले जाते. एखादी सुंदर दिसणारी स्त्री पाहूण काय देखणे व्यक्तिमत्त्व आहे अस अभिप्राय दिला जातो.

हे सर्व आपण वरवरच्या, प्रथमदर्शनी दिसणाऱ्या रूपावरून ठरवित असतो. व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना व्यक्तीच्या अंगी असणाऱ्या गुणदोषाचा आपण थोडाही विचार करीत नाही. आपल्या मनांवर उमटणारा व्यक्तिमत्त्वाचा ठसा हा केवळ वरवर दिसणारे रंग, रुप, उंची, चेहरा, शारीरिक ठेवण फार तर बोलण्याची पद्धत या घटकांवर आधारित असतो. त्यामुळे व्यक्त केलेला अभिप्राय काही वेळेस चुकीचा असू शकतो. व्यक्तीमत्त्वाचे अनेक पैलू असतात. त्यापैकी अगदी थोड्या व कमी महत्त्वाच्या पैंलूवर आधारित असलेला आपला अभिप्राय चुकीचा ठरवण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यक्तिमत्त्वाचा नेमका अर्थ समजून घेणे गरजेचे आहे. फक्त मनुष्य प्राण्यालाच

व्यक्तिमत्त्व असते. व्यक्तिमत्त्वामध्ये अनेक घटकांचा अंतर्भाव होतो. शैक्षणिक मानसशास्त्रात व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासाला अतिशय महत्त्व आहे.

यासाठी आपण प्रथम व्यक्तिमत्त्वाचा अर्थ समजून घेऊ.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ व्यक्तिमत्त्वाचा अर्थ :

मराठीतील व्यक्तिमत्त्व या शब्दाला इंग्रजीत Personality हा शब्द वापरला जाते. इंग्रजीतील Personality हा शब्द मूळ लॅटीन भाषेतील Persona या शब्दापासून बनलेला आहे. Persona म्हणजे मुखवटा असा त्याचा अर्थ आहे. रोमन काळात नाटकातील पात्रे मुखवटे वापरत असत व त्यांनी वापरलेल्या मुखवट्यावरून त्या पात्रांची वैशिष्ट्ये समजत असत. म्हणजेच मूळ अर्थाप्रमाणे व्यक्तिमत्व हे व्यक्तीच्या बाह्यदर्शनापुरतेच मर्यादित होते. जगाच्या रंगभूमीवर वावरताना आपणही असेच पण न दिसणारे मुखवटे धारण करीत असतो. या मुखवट्यावरुन लोक आपल्याविषयीचे मत तयार करतात.

परंतु प्रत्येक व्यक्तीची खास अशी वैशिष्टये असतात. वेगळेपण असते. व्यक्तिमत्त्व ही व्यक्तीचे वेगळेपण दाखविणारी आणि इतरांवर प्रभाव पाडणारी बाब आहे. ती व्यक्तीची स्थिर स्थिती नसून सतत बदलणारी अशी स्थिती आहे. व्यक्तींच्या सभोवतालच्या परिस्थितीनुसार व्यक्तिमत्व सतत बदलत असते व्यक्ती आपल्या सभोवतालच्या परिस्थितीला कसा प्रतिसाद देते त्यास व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व म्हणतात. ‘छन्नी हातोडीचा घाव करी दगडाचा देव’ यातून व्यक्तिमत्त्वाचा नेमका अर्थ लक्षात येतो.

### ३.२.२. व्यक्तिमत्त्वाचे स्वरुप :

व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व केवळ बाह्यरूपावर अवलंबून नसते. तर तिची शरीररचना, चेहरेपट्टी, वर्ण, भाव, कौशल्ये, बुद्धी, अभिरूची, अभिवृत्ती, समायोजन क्षमता, अभियोग्यता या सर्वांचा त्यामध्ये समावेश होतो. त्याचबरोबर व्यक्तीचे आदर्श, रुढी, परंपरा, मूल्ये यांचा परिणामही दिसून येतो.

प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्र्यरित्या विकसित होत असते. व्यक्तिंचा शारीरिक, भावनिक, बौद्धिक व नैतिक विकास कशा पद्धतीने होतो यावर व्यक्तीचे समायोजन अवलंबून असते. व्यक्ती सकारात्मक अथवा नकारात्मक समायोजन साधते त्यावर तिचे व्यक्तिमत्त्व अवलंबून असते. धाडसी व्यक्ती आत्मविश्वासाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करतात. मात्र डळमळीत विचाराच्या व्यक्ती पळवाट शोधतात अथवा पाठ फिरवतात. दूष्ट प्रवृत्तीची माणसे तिरस्करणीय वाटतात तर नितीवान विश्वासू माणसे समाजात आदरणीय ठरतात. मानवी वर्तनात विविध गुणांचे एकत्रिकरण आढळते. व्यक्तीचे आचार विचार आणि मनोवृत्ती यांना वळण लावून विकसित व्यक्तिमत्त्व घडविता येते.

### ३.२.३ व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्या :

व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्यामध्ये विविधता आढळते. तसेच बहुसंख्य व्याख्या विश्लेषणात्मक स्वरूपाच्या आहेत. विविध व्याख्यांमध्ये व्यक्तिमत्त्वाच्या महत्वाच्या घटकांची यादी पहावयास मिळते.

**१) नॉर्मल एल.मन.** : व्यक्तीची शरीररचना, वर्तनपद्धती, बुद्धीमत्ता, अभिरूची, अभियोग्यता, अभिवृत्ती, कौशल्ये आणि विविध क्षमता यांच्या वैशिष्ट्येपूर्ण संघटनाला व्यक्तिमत्त्व म्हणतात.

या व्याख्येत व्यक्तिमत्त्वाच्या विविध लक्षणांचा उल्लेख आला आहे. या वैशिष्ट्यांची गुंफण म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.

**२) जी. डब्ल्यु ऑलपोर्ट** : व्यक्ती आणि तिचा परिसर यांच्याशी वैशिष्टयपूर्ण समायोजन साधणारे आणि तिच्या वर्तनाला चालना देणारे शारीरिक आणि मानसिक संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय. (Personality is the dynamic organisation within the individual of those psycho-physical systems that determines his unique adustment to his environment.)

या व्याख्येत व्यक्तिमत्त्वामध्ये समाविष्ट शारीरिक आणि मानसिक घटकाचा आणि एकात्मिक स्वरूपात परिस्थितीशी होणाऱ्या समायोजनाचा विचार केला आहे.

**३) जी. ए. किंबल** : व्यक्तीचे इतराहून वेगळेपण दाखविणारे आणि त्याच वेळी इतर लोक तिच्याशी कसे वर्तन करतात हे निश्चित करणारे, व्यक्तीच्या स्थायी स्वरूपाच्या वैशिष्ट्यांचे महत्त्वपूर्ण संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय.

या व्याख्येवरून हे स्पष्ट होते की हे व्यक्तीचे अनन्य साधारण वैशिष्टये आहे. या वैशिष्टयांमुळे व्यक्तिचा सामाजिक दर्जा निश्चित होतो. तेच व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व होय.

**४) ए. ई. टॅक्सलर** : व्यक्तिमत्त्व म्हणजे सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाची गोळाबेरीज.

टॅक्सलर आणि किंबल यांनी व्यक्तीचा समाजातील अन्य घटकांशी जो निकटचा संबध येतो त्यास महत्त्व दिले आहे.

वरील सर्व व्याख्येमध्ये जी. डब्ल्यु, ऑलपोर्ट यांनी केलेली व्याख्या सर्वसमावेशक आहे. व्यक्तिमत्त्व म्हणजे सर्व विविध घटकांची बेरीज नव्हे तर त्याचा एकमेकांवर होणारा परिणाम असून त्यातून व्यक्तिमत्त्व साकारते. व्यक्ती व्यक्तीमध्ये घडून येणाऱ्या आंतरक्रियांतून व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होते.

▸ **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** - १

खालील विधाने चूक की बरोबर ते ठरवा.

१) व्यक्तीचे व्यक्तिमत्व बाह्यरुपावर अवलंबून असते. चूक/बरोबर

२) व्यक्तिमत्त्व म्हणजे विविध घटकांची बेरीज चूक/बरोबर

३) Personality हा शब्द लॅटीन शब्दापासून तयार झाला. चूक/बरोबर

४) व्यक्तिमत्त्व ही इतरांवर प्रभाव पाडणारी बाब आहे. चूक/बरोबर

५) व्यक्तिमत्त्वामुळे व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरतो. चूक/बरोबर

६) शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वामध्ये कोणताही बदल होत नाही. चूक/बरोबर

७) व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व कधीच बदलत नाही. चूक/बरोबर

८) व्यक्तिमत्त्वाची जडणघडण अनुवंशामुळे होते. चूक/बरोबर

### ३.२.४ व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे घटक :

व्यक्तिमत्त्व विकासावर अनेक घटक परिणाम करीत असतात. त्यातूनच व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. व्यक्तिमत्त्व विकासात अनुवंश (Heredity) आणि परिसर (Environment) यांचे महत्त्व अधिक आहे. अनुवंश आणि परिसर यांच्या आंतरक्रियेमुळेच व्यक्तिमत्त्व घडते. सूत्र रुपात व्यक्तिमत्त्व आपणास असे मांडता येईल.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| व्यक्तिमत्त्व | = अनुवंश | x | परिसर |
| Personality | = Heredity | x | Environment |

व्यक्तिमत्त्व विकासात दोन प्रकारचे घटक महत्त्वाचे असतात.

अ) जैविक घटक : व्यक्तीजवळ उपजत असलेल्या बाबींना जैविक घटक म्हणतात.

ब) बाह्य घटक : व्यक्तीच्या जीवनातील सामाजिक परिसराशी संबंधीत असणारे घटक

व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे घटक



व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणाऱ्या या घटकांची आपण माहिती घेऊ.

जैविक घटकांचा आपण सुरुवातीस विचार करू.

## अ) जैविक घटक :

१) शरीररचना :

व्यक्तींच्या शरीररचनेचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर चांगला अगर वाईट परिणाम होतो. व्यक्तीचे बाह्यरुप म्हणजेच उंची, वर्ण, वजन, जाडी, शरीराचा बांधा आणि चेहऱ्यांची ठेवण या बाबींचा व्यक्तिमत्त्वावर परिणाम होत असतो. उंच रुबाबदार, गोऱ्या व्यक्तींची छाप पडते. याउलट बुटक्या, सावळ्या, काळ्या, बोजड अथवा अतिशय सडपातळ व्यक्ती इतरांवर प्रभाव टाकू शकत नाहीत. अशा व्यक्ती इतरांच्या टीकेच्या शिकार होतात. अशा व्यक्तींमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ शकतो. शारीरिक व्यंग ही व्यक्तिविकासात अडथळे निर्माण करतात. बहिरेपणा, मुकेपणा, अपंगत्त्व असणाऱ्या व्यक्ती समाजात सहजपणे मिसळू शकत नाहीत. त्यामुळे त्यांचा भावनिक व सामाजिक विकास नीटपणाने होऊ शकत नाहीत. उत्तम शरीरयष्टी व देखणा चेहरा यामुळे व्यक्तिमत्त्व खुलून दिसते. अशा व्यक्ती समाजात नेता म्हणून स्विकारल्या जातात.

२) जैव रसायने/ ग्रंथीस्त्राव :

शरीरात अंतःस्त्रावी ग्रंथी कार्यरत असतात. या ग्रंथीतून स्त्रवणाऱ्या स्तावाचा व्यक्तींच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर परिणाम होतो. या स्त्रावांचे प्रमाण कमी-जास्त झाल्यास व्यक्तींच्या विकासावर होणारा परिणाम खालील तक्त्यावर पहा.

| अं.न. | ग्रंथी प्रकार | जास्त प्रमाणामुळे होणारे परिणाम | कमी प्रमाणामुळे होणारे परिणाम |
|---|---|---|---|
| १) | मस्तक ग्रंथी (Pitutary Gland) | अतिशय जास्त उंची वाढते. | वाढ खुंटते, बुटकेपणा येतो |
| २) | कंठस्थ ग्रंथी (Thyroid Gland) | भावनिक अस्थिरता, चिंता, चंचलता येते. | अशक्तपणा, सुस्तपणा, कमी झोप |
| ३) | स्वादुपिंड (Pancrease) | शर्करेचे प्रमाण कमी होणे, मुर्च्छा येणे. | स्वभाव भित्रा व चिडचिडा बनणे. |
| ४) | वृक्कस्थ ग्रंथी (Adrend Gland) | भावनिक उद्रेक, रक्तदाब वाढतो, आक्रमकता | अशक्तपणा, उष्णता व थंडीची प्रतिकार क्षमता कमी, चिडखोरपणा |
| ५) | जनन ग्रंथी (Gonads) | कामवासना अधिक | कमी कामवासना, वंध्यत्त्व |

३) विविध क्षमता :

विविध क्षमतांचा व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम होत असतो. व्यक्तींची बौद्धिक क्षमता, शारीरिक क्षमता व मानसिक क्षमतांचा विकासावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होतो. कमी बुद्धिमत्तेच्या व्यक्ती समाजात समायोजन साधू शकत नाहीत तर बुद्धिमान व्यक्ती सहजपणे समायोजन साधू शकतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावही पडतो. कमी बुद्धिमत्तेच्या व्यक्ती समाजाकडून उठून दिसत नाहीत. अभिनय, गायन, नृत्य, नेतृत्त्व, क्रीडाक्षमता अशा विविध क्षमता असणाऱ्या व्यक्तींना समाजात मान सन्मान प्राप्त होतो.

४) अभिरूची :

व्यक्तीचा दर्जा तिच्या अभिरूचीवरून ठरतो. साहित्य, संगीत, कला व क्रीडा क्षेत्रात अभिरूची असणाऱ्या व्यक्ती लोकप्रिय होतात. तर हीन दर्जाच्या अभिरूची असणाऱ्या व्यक्ती समाजाकडून अव्हेरल्या जातात. उच्च दर्जाच्या अभिरूचीमुळे माणसाचे व्यक्तिमत्व उन्नत बनते.

## ब) बाह्य घटक :

१) कुटुंब :

कुटुंब हा बालकाचा पहिला सामाजिक परिसर होय. लहान मूल कुटूंबातील वातावरणात मोठे होते. कौटुंबिक वातावरण बालकाच्या व्यक्तिमत्वाला जबाबदार असते. कुटुंबातील वातावरण, व्यक्तींचा सहवास, याचा बालकाच्या मनावर खोलवर परिणाम होतो. आई-वडिल, काका-काकू, आजी-आजोबा, बहिण -भाऊ यांच्याशी होणाऱ्या आंतरक्रियामधून व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू विकसित होतात. सुशिक्षीत, सुसंस्कृत पालक बालकाच्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे लक्ष पुरवितात. या उलट काबाडकष्ट करणारे पालक आपल्या पाल्याच्या विकासाकडे लक्ष पुरवू शकत नाहीत. ज्या कुटुंबात वातावरण संघर्षमय असते तसेच माता-पित्यांचे वात्सल्य लाभत नसेल तर अशा कुटुंबातील मुले भावनिक दृष्टया असुरक्षित, चिंताग्रस्त, दुर्मुखलेली असतात. कुटुंबात जास्त लाड केले गेल्यास  मुले हेकट, दुराग्रही, लहरी बनतात. या बरोबरच शिस्तीचाही विपरीत परिणाम होतो.

२) शाळा :

कुटुंबाच्या खालोखाल शाळेलाही व्यक्तिमत्व विकासात अनन्यसाधारण महत्व आहे. शाळेमध्ये बालक सामाजिक समायोजन करावयास शिकते. शालेय वातावरणाचा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर खूप परिणाम होतो. शाळेत मुलांवर चांगले संस्कार होतात. ज्या मुलांना घरी चांगल्या वातावरणाची उणीव असते ती शालेय परिसरात भरून निघते. अभ्यासपूरक उपक्रम, क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलन, स्काऊट गाईड, समाजसेवा शिबीरे, सहली आणि विविध स्पर्धा यांचा व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयोग होतो. आदर्श शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे वर्तनाला चांगले वळण लागते.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी शालेय वातावरण उत्तम असले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव दिला पाहिजे. शांत, संयमी, आशावादी शिक्षक लाभले तर विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास उत्तम होतो. या उलट हुकुमशाही, निराशावादी, पक्षपाती शिक्षक लाभल्यास विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर विपरीत परिणाम होतो.

३) शेजारी आणि मित्रपरिवार :

कुटुंबानंतर बालकाचा संपर्क येतो तो शेजारी व मित्रपरिवाराशी. मित्रांच्या वर्तनाचा आणि सहवासाचा व्यक्तिमत्त्व विकासावर खूप परिणाम होतो. चांगल्या मित्रांच्या सहवासात व्यक्तिमत्त्व चांगले घडते. 'सुसंगती सदा घडो.' असे म्हंटले जाते. मित्रांच्या संगतीतच परस्पर सहकार्य, संघभावना, अनुकरण या प्रवृत्ती विकसित होतात.

व्यसनी, चैनी, वात्रट, बेशिस्त, स्वार्थी मित्रांच्या संगतीत व्यक्तिमत्त्व बिघडण्याची दाट शक्यता असते. चांगले मित्र व शेजारी यांच्या सहवासाचा परिणाम व्यक्तिच्या चारित्र्यसंपन्नतेवर होतो. भांडखोर, व्यसनी, उपद्रवी शेजारी व्यक्तिमत्त्व विकासावर विपरीत परिणाम करतात.

४) समाज व संस्कृती :

समाजातील रूढी, परंपरा, रीतिरीवाज, अंधश्रद्धा यांचा पगडा व्यक्तिमत्वाला विशिष्ट आकार देतो. चांगल्या सांस्कृतिक वातावरणात मुलाचे व्यक्तिमत्व चांगले घडते. सामाजिक बंधने, जातीव्यवस्था, आर्थिक स्तर यांचा परिणामही व्यक्तिमत्व विकासावर होतो. मागासलेल्या दुर्बल समाजात आजही स्त्रिया शिक्षणापासून वंचित आहेत.

सांस्कृतिक वातावरणाचा परिणाम व्यक्तिमत्वावर होतो. त्याग, सेवा, सहिष्णुता, दया, क्षमा, माणुसकी इत्यादी मूल्ये सहजपणे विकसित होतात.

५) भौगोलिक परिस्थिती :

विशिष्ट प्रकारच्या भौगोलिक परिस्थितीत विशिष्ट प्रकारचे व्यक्तिमत्व विकसित होते. नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाणारे लोक धाडसी, आत्मविश्वासू बनतात. सुपिक प्रदेशात लोक चैनी, विलासी असतात. उष्ण हवामानातील लोक कृष्णवर्णीय, सडपातळ असतात. तर समशितोष्ण हवामानातील लोक गौरवर्णीय आणि धष्टपुष्ट असतात. या प्रमाणेच त्या परिसरातील व्यवसाय, व्यापार, दळणवळण, वनस्पती, प्राणी, सागर किनारे या सर्व भौगोलिक घटकांचा व्यक्तिमत्व विकासावर परिणाम होत असतो.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) व्यक्तिमत्व विकासावर परिणाम करणारे जैविक घटक कोणते?

२) व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे बाह्य घटक कोणते?

३) मस्तक ग्रंथीतील स्त्रावाचा जास्त प्रमाणामुळे कोणता परिणाम होतो?

४) स्वादुपिंड ग्रंथीतील स्त्रावाचे प्रमाण कमी झाल्यास कोणता परिणाम होतो?

५) वृक्कस्थ ग्रंथीच्या स्त्रावाचे प्रमाण जास्त झाल्यास कोणता परिणाम होतो.

### ३.२.५ सुसंघटीत व्यक्तिमत्त्व :

सुसंघटीत व्यक्तिमत्त्वाला इंग्रजीत Integrated Personality हा शब्द वापरला जातो. मराठीत एकात्म व्यक्तिमत्त्व, सुसंघटीत व्यक्तिमत्त्व असे म्हणतात. व्यक्तिमत्त्वाला एकजिनसीपणा प्राप्त होणे असा त्याचा अर्थ आहे. विविध गुणांचे संघटन झाले की व्यक्ती न घाबरता जीवन संघर्षाला तोंड देते. एखाद्या वेळी अपयश आले तरी ते स्विकारण्याची सुसंघटीत व्यक्तिमत्त्व लाभलेल्याची तयारी असते.

सुसंघटीत व्यक्तिमत्व म्हणजे समतोल साधणारे व्यक्तिमत्त्व. अशा व्यक्तीचे आरोग्य, शरीर, मन उत्तम असते. अशा व्यक्ती शारीरिक व बौद्धिक कार्यात उत्साहाने सहभागी होतात. या व्यक्ती मोहाच्या क्षणी विचलीत होत नाहीत. त्यांचा चिरंतन मुल्यांवर विश्वास असतो. त्यांच्यात सहकार्य वृत्ती असते. यश-अपयश, मान-अपमान व सुख-दुख या प्रसंगी तटस्थ राहू शकतात.

याउलट सुसंघटीतपणा नसला तरी व्यक्ती साध्या-साध्या प्रलोभनांना बळी पडते. शुल्लक कारणासाठी खोटे बोलणे, लाच घेणे, पक्षांतर करणे असे वर्तन करतात. त्यांचे वर्तन अनियंत्रित असते, असंतुलित असते.

### ३.२.६ सुसंघटीत व्यक्तिमत्त्व निमिर्तीसाठी शैक्षणिक उपक्रम :

विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्त्वे आकाराला येतात ती शाळा व महाविद्यालयात. त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यात अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके, सहशालेय कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध कार्यक्रम इत्यादींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठी खाली दिलेले काही उपक्रम पहा.

१) वक्तृत्त्व, निबंध, चित्रकला, गायन, रांगोळी, क्रीडा स्पर्धा.

२) विविध मंडळे स्थापून त्या मार्फत उपक्रम : उदा. विज्ञान मंडळ, वाङ्मय मंडळ, कला मंडळ, पर्यावरण मंडळ, वादविवाद मंडळ इ.

३) राष्ट्रीय सेवा योजना, छात्रसेना, स्काऊट, गाईड इ.

४) स्नेहसंमेलन विविध गुणदर्शन, जयंत्या, पुण्यतिथी इ.

५) बालवीर पथक, वीरबाला पथक, वाद्यवृंद, राष्ट्रीय सण-उत्सव.

६) व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, समुदपदेशन केंद्र.

७) दत्तक पालक योजना, पोषक आहार योजना.

८) पालक सभा, विद्यार्थी सभा, माजी विद्यार्थी मेळावा.

९) प्रथमोपचार केंद्र, विद्यार्थी भांडार, संघ, दल.

१०) शैक्षणिक सहली, शिबीरे, संस्थांना भेटी.

११) थोरामोठ्यांच्या भेटी, व्याख्याने.

अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, कारक अशा सर्व अंगांनी विकास साधला जावून सुसंघटीत, एकात्म व्यक्तिमत्त्व विकसित करता येते.

### स्वंय अध्ययनासाठी प्रश्न – ३

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व म्हणजे काय?

२) सुसंघटीत व्यक्तिमत्त्वास इंग्रजीत कोणता शब्द आहे?

३) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व नसणाऱ्या व्यक्तींचे वर्तन कसे असते?

## ३.२.७ व्यक्तिमत्त्वाच्या उपपत्ती :

निसर्गाने प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र व्यक्तिमत्त्व दिले आहे. एक व्यक्ती तंतोतंत दुसऱ्या व्यक्तीसारखी असत नाही. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी मानसशास्त्रज्ञांनी विविध उपपत्या मांडल्या आहेत. व्यक्तिमत्त्वाचे वर्गीकरण प्रामुख्याने गुणतत्त्वानुसार (Trait theory) आणि वर्गतत्त्वानुसार (Type theory) केलेले दिसून येते.

वर्गतत्त्व उपपत्ती आणि गुणतत्त्व उपपत्तींची आपण माहिती पाहू.

### अ) वर्गतत्त्व उपपत्ती : (Type theory)

### १) शेल्डनचे वर्गीकरण :

मानवी शरीरामध्ये मूलभूत घटकांचे प्रमाण कमी जास्त असते. चरबी व आंतरावयव, स्नायू व हाडे आणि त्वचा व केंद्रीय मज्जापेशी यांचे सापेक्ष प्रमाण पाहून व्यक्तिमत्त्वाचे वर्गीकरण शेल्डनने खालील तीन प्रकारात केले. शेल्डन यांच्या मते व्यक्ती शरीररचना व स्वभावधर्म यांच्यात उच्च सहसंबंध असतो.

**१) स्थूल प्रकृती (Endomorph)** : या प्रकृतीच्या व्यक्ती स्थूल, जास्त चरबी असलेल्या अशा असतात. अशा व्यक्ती सुखासीन, भोजनप्रिय, मनमिळावू असतात.

**२) बांधेसुद पिळदार (Mesomorph)** : या प्रकारच्या व्यक्तींचे स्नायू पिळदार, हाडे बळकट आणि शरीर घटीव असते. अशा व्यक्ती उत्साही, धाडसी असतात.

**३) किडमिडीत उंच (Ectomoph)** : या व्यक्ती सडपातळ, शेलाटी प्रकृती, उंच आणि कृश असतात. या व्यक्तींच्यात मज्जापेशी अधिक विकसित असतात. या व्यक्ती तुलनेने अधिक संवेदनशील, एकलकोंड्या, अंतर्मुखी असतात.

### २) कार्लयुंगचे वर्गीकरण :

कार्लयुंग हा मानसोपचार तज्ञ होता त्याने मानसशास्त्रीय वर्गीकरण केले आहे. हे वर्गीकरण करताना त्याने भावना, स्वभाव, समाजशीलता अशा मानसिक घटकांचा विचार करून प्रमुख दोन गटात वर्गीकरण केले. त्यांची लक्षणे पुढील प्रमाणे

**१) अंतर्मुखी** : या प्रकारात येणाऱ्या व्यक्ती स्वयंकेंद्री, स्वतःच्या भावना विश्वात मग्न असतात. भावनाप्रधान, मितभाषी, आदर्शवादी, हळवी, संघर्ष व ताणतणाव यापासून अलिप्त राहणाऱ्या अशा असतात. उदा. तत्त्वज्ञ, कवी, शास्त्रज्ञ इ.

२) **बहिर्मुखी** : या प्रकारच्या व्यक्तीमध्ये अंतर्मुखी व्यक्तींच्या विरूद्ध लक्षणे असतात. समाजप्रिय, चिंतामुक्त, कार्यप्रवण, व्यवहारी, धाडसी अशी व्यक्ती. उदा. राजकीय नेता, व्यापारी, प्रशासक इ.

## ब) गुणतत्त्व उपपत्ती : (Trait Theory)

व्यक्तीच्या गुणविशेषणांवरून ती व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपेक्षा वेगळी आहे हे स्पष्ट होते. परिस्थितीशी वैशिष्ट्यपूर्ण रितीने प्रतिक्रिया करणारे व्यक्तीचे गुणधर्म म्हणजे गुणविशेष. दैनंदिन व्यवहारात आपण यानुसार व्यक्तीचे वर्णन करत असतो. अमुक एखादी व्यक्ती अतिशय प्रामाणिक आहे किंवा एखादी व्यक्ती अविचारी आहे. मानसशास्त्रज्ञांनी या गुणांच्या आधारे उच्च सहसंबंध असणाऱ्या लक्षणांची गटवारी केली व त्यावर व्यक्तीमत्त्वाचे वर्गीकरण केले आहे.

१) **कॅटेलचे वर्गीकरण** : कॅटेलने बारा पायाभूत लक्षणांची गटवारी केली. बारा विशेष लक्षणांचे गट व विशेष लक्षणांबरोबर विरूद्ध लक्षणांचे गट तयार केले. ते गट खाली दिले आहेत.

या बारा गुणसमुच्चयात उच्च सहसंबंध आढळतो.

### कॅटेलची गुणसमुच्चय यादी

| | विशेष लक्षणे | | विरूद्ध लक्षणे |
|---|---|---|---|
| १) | बहिर्मुखी, सुस्वभावी, लवचीक | १) | अंतर्मुखी, चिडखोर, ताठर |
| २) | बुद्धिमान, कर्तव्यदक्ष, विचारी | २) | मंदबुद्धी, कर्तव्यचुकार, अविचारी |
| ३) | वास्तववादी, स्थिर, सहिष्णु | ३) | आत्मकेंद्री, अस्थिर, असहिष्णु |
| ४) | गर्विष्ठ, बढाईखोर, कडक | ४) | विनयशील, विन्मुख, हळवा |
| ५) | आनंदी, आशावादी, समाजशील | ५) | दुःखी, निराशावादी, एकांतप्रिय |
| ६) | ध्येयवादी, अंतःस्फूर्तीवादी, प्रेमळ | ६) | ध्येयशून्य, तर्कनिष्ठ, निर्दय |
| ७) | विचारी, शिक्षणप्रेमी, सौदर्यप्रेमी | ७) | अविचारी, साधा, ओबडधोबड |
| ८) | स्वतंत्र, चिकाटीचा, व्यवहारी | ८) | परतंत्र, धरसोड वृत्तीचा, अव्यवहारी |
| ९) | दयाळू, सहकारी, मनमोकळा | ९) | निर्दयी, असहकारी, कुठ्यावृत्तींचा |
| १०) | विकल, पालायनवादी, विसंगत | १०) | तरतरीत, कामसू, सुसंगत |
| ११) | बालिश, चंचल, असहिष्णू | ११) | समायोजक, शांत, सहिष्णु |
| १२) | उत्साही, प्रेमळ, विश्वासू | १२) | निरूत्साही, निष्ठूर, अविश्वासू |

## स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ४

एका वाक्यात उत्तरे दया.

१) व्यक्तिमत्त्वाच्या उपपत्तीचे प्रमुख दोन गट कोणते?

२) शेल्डनचे वर्गीकरण कशावर अधारले आहे?

३) कार्लयुंगने व्यक्तीमत्त्वाचे कोणते दोन गट मांडले आहेत?

४) गुणतत्त्व उपपत्ती म्हणजे काय?

५) कॅटेलचे वर्गीकरण कशावर आधारले आहे?

## ३.३ : पारिभाषिक शब्द :

१) जैविक घटक (Biological Factors) : व्यक्तीजवळ उपजत असलेल्या बाबींना जैविक घटक म्हणतात.

२) बाह्य घटक/परिसरीय घटक : घरापासून ते समाजापर्यंतच्या सर्व घटकांचा यात समावेश होतो.

३) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व (Integated Personality) : एकजिनसीपणा किंवा एकात्म, समतोल असा याचा अर्थ आहे.

४) गुणवत्त्व उपपत्ती (Trait theory) : व्यक्तीची विशेष गुणांचा विचार करून केलेले व्यक्तिमत्त्वाचे वर्गीकरण.

५) वर्गतत्त्व उपपत्ती (Type theory) : व्यक्तीची शरीरयष्टी, भावना इ. घटकांच्या आधारे व्यक्तिमत्त्वाचे वर्गीकरण.

६) गुणसमुच्चय (Trait Claster) : व्यक्तिमत्त्वाचे पैलू अथवा लक्षणे.

## ३.४ : स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १ ची उत्तरे**

  १) चूक

  २) चूक

  ३) बरोबर

  ४) बरोबर

  ५) बरोबर

  ६) चूक

  ७) चूक

  ८) चूक

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –२ ची उत्तरे**

१) व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे जैविक घटक शरीररचना, ग्रंथीस्त्राव, विविध क्षमता व अभिरूची हे होत.

२) व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे बाह्य घटक कुटुंब, शाळा, समाज व संस्कृती, शेजारी व मित्रपरिवार आणि भौगोलिक परिसर हे होत.

३) मस्तक ग्रंथीतील स्त्रावाच्या जास्त प्रमाणामुळे उंची जास्त वाढते.

४) स्वादुपिंड ग्रंथीतील स्त्रावाचे प्रमाण कमी झाल्यास स्वभाव भित्रा व चिडचिडा होतो.

५) वृक्कस्थ ग्रंथीच्या स्त्रावाचे प्रमाण जास्त झाल्यास रक्तदाब वाढतो, भावनिक उद्रेक होऊन आक्रमकता वाढते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३ ची उत्तरे**

१) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व म्हणजे समतोल साधणारे व्यक्तिमत्त्व होय.

२) सुसंघटीत व्यक्तिमत्त्वास इंग्रजीत Integrated Personality हा शब्द आहे.

३) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व नसणाऱ्या व्यक्तींचे वर्तन अनियंत्रित, असंतुलित असते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४ ची उत्तरे**

१) व्यक्तिमत्त्वाच्या उपपत्तीचे वर्गतत्त्व व गुणतत्व उपपत्ती हे दोन गट होत.

२) शेल्डनचे वर्गीकरण शरीररचना यावर आधारलेले आहे.

३) कार्लयुंगने अंतर्मुखी व बहिर्मुखी असे व्यक्तिमत्त्वाचे दोन गट मांडले आहेत.

४) व्यक्तीच्या गुणविशेषांवर अधारलेली उपपत्ती म्हणजे गुणतत्त्व उपपत्ती होय.

५) कॅटेलचे वर्गीकरण विशेष लक्षणे व विरूद्ध लक्षणे यावर आधारलेले आहे.

## ३.५ सारांश :

व्यक्तिमत्त्वाला व्यक्तीच्या सामाजिक जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. कोणत्याही दोन व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व तंतोतंत सारखे नसते. प्रत्येक व्यक्तीचे खास असे वैशिष्टय असते. व्यक्ती आणि तिच्या सभोवतालची परिस्थिती यांच्या आंतरक्रियेतून व्यक्तिमत्त्व साकारते. व्यक्तिमत्त्व हे स्थिर नसून ते बदलते असते. व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू अथवा गुणविशेष असतात. यावरूनच मानसशास्त्रज्ञांनी व्यक्तिमत्त्वाच्या विविध व्याख्या मांडल्या आहेत. यापैकी ऑलपोर्ट यांची व्याख्या सर्वसमावेशक आहे. व्यक्तिमत्त्व विकासावर व्यक्तीची शरीररचना, ग्रंथीस्त्राव, विविधक्षमता, कुटुंब, शाळा, मित्रपरिवार, भौगोलिक परिस्थिती अशा विविध घटकांचा परिणाम होत असतो. व्यक्तिमत्त्वाचे वर्गीकरण प्रामुख्याने वर्गतत्त्वानुसार व गुणतत्त्वानुसार केले जाते. सुसंघटीत व्यक्तिमत्त्व माणसाचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. सुसंघटीत व्यक्तिमत्त्वासाठी शिक्षणात विविध उपक्रम राबविता येतात.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

**खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) व्यक्तिमत्त्वाचा अर्थ सांगून व्यक्तिमत्त्वाचे स्वरुप स्पष्ट करा.

२) व्यक्तिमत्त्व म्हणजे काय? व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

३) व्यक्तिमत्त्वासंबंधीची वर्गतत्त्व उपपत्ती विशद करा.

४) गुणतत्त्व उपपत्ती म्हणजे काय? कॅटेलच्या गुणतत्त्व उपपत्ती वर्णन करा.

५) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व विकासासाठी कोणकोणते शैक्षणिक उपक्रम राबविता येतात?

६) विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी तुम्ही कोणते मार्ग सुचवाल?

**टीपा लिहा.**

१) व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप

२) व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्या.

३) व्यक्तिमत्त्व विकास आणि जैविक घटक संबंध.

४) सुसंघटीत व्यक्तिमत्त्व

५) शेल्डनची व्यक्तिमत्त्वाची उपपत्ती

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

करंदीकर, सु. (२००९). अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र.कोल्हापूर : फडके प्रकाशन.

खरात, आ. पा. (१९७४). प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

जगताप, ह. ना. (१९९५). शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे : नूतन प्रकाशन.

नानकर, प्र. (१९९२). सुबोध शैक्षणिक मानसशास्त्र. पुणे : नूतन प्रकाशन.

❖❖❖

**घटक ४**

# अध्ययन

## (Learning)

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ अध्ययनाचा अर्थ व स्वरूप
- ४.२.२ अध्ययनावर परिणाम करणारे घटक
- ४.२.३ अध्ययनाच्या उपपत्ती
- ४.२.४ अध्ययन संक्रमणाचे प्रकार

४.३ पारिभाषिक शब्द

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी प्रश्न

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ

## ४.0 उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला

१. अध्ययनाची संकल्पना, अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करता येईल.

२. अध्ययनावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करता येतील.

३. प्रयत्न प्रमाद, अभिजात अभिसंधशन व मर्मदृष्टीमूलक उपपत्ती या सर्व अध्ययनाच्या उपपत्तींचे स्वरूप व शैक्षणिक महत्त्व स्पष्ट करता येईल.

४. अध्ययन संक्रमणाचे प्रकार स्पष्ट करता येतील.

## ४.१ प्रस्ताविक

मानवी जीवनातील अध्ययन ही एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. अध्ययन म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे. जन्मापासून–मृत्यूपर्यंत व्यक्ती काही ना काही शिकत असते. जीवनातील व्यापक घटकांना आत्मसात करणे असा अध्ययनाचा सर्वसमावेशक अर्थ आहे. शिक्षणशास्त्रज्ञांनी अध्ययनाचे तीन प्रकार सांगितलेले आहेत. औपचारिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण आणि सहज शिक्षण. या तिन्ही प्रकारच्या शिक्षणाचा किंवा अध्ययनाचा समावेश शिक्षण प्रक्रियेमध्ये होतो. म्हणजेच आपण जे जे काही करतो आणि जो काही विचार करतो त्या प्रत्येक गोष्टीत अध्ययन प्रक्रिया अंतर्भूत असते.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ a)अध्ययनाचा अर्थ व स्वरूप (Meaning and Nature of Learning)

पृथ्वीतलावरील प्रत्येक व्यक्ती आपल्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सतत काही ना काही शिकत असते. या सर्व प्रसंगामध्ये व्यक्ती शिकताना काही वेळा हेतू समोर ठेवून शिकते तर काही प्रसंगामध्ये काहीही समोर हेतू नसतो. व्यक्ती शिकते म्हणजेच त्याचे अध्ययन होते. म्हणून या घटकामध्ये आपण अध्ययन म्हणजे काय? अध्ययन प्रक्रियेचे स्वरूप कसे असते? अध्ययन प्रक्रियेची वैशिष्ट्ये कोणती आहेत? अध्ययनावर परिणाम करणारे घटक कोणकोणते आहेत? अध्ययनाच्या कोणकोणत्या उपपत्ती आहेत? अध्ययन संक्रमणाचे प्रकार कोणकोणते आहेत? याचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

**अध्ययन – अर्थ** (Learning - Meaning)

'अध्ययन' हा शब्दप्रयोग व्यवहारामध्ये शिकणे किंवा शिक्षण या अर्थानेच वापरला जातो. परंतु 'शिक्षण' आणि 'अध्ययन' या वेगवेगळ्या संकल्पना आहेत. शिक्षण या संकल्पनेच्या तुलनेने अध्ययन ही संकल्पना मर्यादित अर्थाने वापरली जाते शिक्षण ही व्यापक संज्ञा आहे आणि अध्ययन ही शिक्षणामध्येच समाविष्ट असणारी संकल्पना आहे.

अध्ययनाचा अर्थ समजून घेण्यासाठी आपणास काही व्याख्यांना परामर्श घेणे आवश्यक आहे.

**१) टेरी पेज व थॉमस जे. बी. (शैक्षणिक शब्दकोश)**

''Learning is Permanent Change in behaviour that is the result of Past experience, either produced incedently or through institutional learning through teaching.''

'व्यक्तीच्या वर्तनात पूर्वानुभवामुळे, प्रासंगिक क्रियेमुळे किंवा अध्यापनामुळे जो कायमस्वरूपी बदल होतो त्यास अध्ययन असे म्हणतात.'

**२) गेटस्** (Gates)

"Learning is the modification of behaviour through experience and training."

'अनुभव किंवा प्रशिक्षण याद्वारा वर्तनबदल होणे म्हणजे अध्ययन होय.'

**३) क्रो आणि क्रो** (Crow and Crow)

"Learning involves the acquisition of habits, knowledge and attitudes."

'सवयी, ज्ञान आणि वृत्ती यांचे संपादन करणे म्हणजे अध्ययन होय.'

**४) गॅरेटे** (Garret)

"Learning is that activity by virtue of which we organize our response with the new situation"

'नव्या परिस्थिला प्रतिसाद देण्याचे आयोजन ज्या कृतीमुळे आपण करू शकतो ती कृती म्हणजे अध्ययन होय.'

**५) मर्फी** (Murphy) :

"Learning is the modification in both behaviour and the way of perceiving."

'वर्तनामध्ये बदल त्याचबरोबर अर्थ लावण्याच्या प्रक्रियेमध्ये (अनुमान) बदल घडवून आणणे तेच अध्ययन होय.'

थोडक्यात, 'सभोवतालच्या वातावरणाला अनुसरून, पूर्वानुभवाचा आधार घेऊन हेतूपुरस्परपणे आपल्या वर्तनात इष्ट आणि टिकाऊ स्वरूपाचा बदल घडवून आणण्याची प्रक्रिया म्हणजे अध्ययन होय.'

■ **अध्ययन प्रक्रियेचे स्वरूप** (Nature of Learning) :

अध्ययनाची संकल्पना लक्षात घेतल्यानंतर अध्ययन प्रक्रिया कशी चालते हे समजून घेणे गरजेचे आहे. अध्ययन प्रक्रियेचे पृथक्करण केल्यानंतर अध्ययन प्रक्रियेचे स्वरूप लक्षात येईल.

**१) उद्दिष्टे** : (Objectives)

अध्ययन प्रक्रिया ही उद्दिष्टाप्रत जाणारी प्रक्रिया आहे. जीवनात अनेक शारीरिक, मानसिक आणि सामाजिक गरजा असतात. या गरजा पूर्ण करण्यासाठी मानवाची सतत धडपड सुरू असते. भूक लागली की अन्न मिळविण्यासाठी धडपड सुरू होते. तहान लागली की मानव पाण्याचा शोध घेतो. जीवनातील व्यक्तीच्या प्रत्येक कृतीच्या

पाठीमागे काहीतरी हेतू हा असतोच. अगदी चालणे, बोलणे, बसणे, उठणे, पळणे, पोहणे, वाहन चालविणे इ. गोष्टी शिकण्यामागे आपला काहीतरी हेतू असतोच. हे सर्व हेतू म्हणजे अध्ययनाचे उद्दिष्टे आहेत.

**२) प्रेरणा** : (Motivation)

अध्ययन होण्यासाठी उद्दिष्ट असणे गरजेचे असते तसेच प्रेरणेची सुद्धा गरज असते. तहान लागलेली व्यक्ती पाणी शोधत असते. तहान नसलेल्या व्यक्तीसमोर पाणी ठेवले तरी ती त्याकडे पाहणार नाही. म्हणजेच उद्दिष्ट ठरल्यानंतर ते साध्य करण्यासाठी त्याचे महत्त्व व गरज पटणे आवश्यक आहे. गरज, कर्तव्याची जाणीव, शाबासकी, स्तुती, यश, पारितोषिके इ. आंतरिक व बाह्य प्रेरकांच्या मदतीने शिक्षक अध्ययनार्थ्यांना कार्य प्रवृत्त करतात. माणसाच्या प्रेरणा क्षणाक्षणाने बदलत असतात. एखादी गोष्ट साध्य करण्यापूर्वी व्यक्तीला जे वाटेल ते ती गोष्ट मिळाल्यानंतर वाटेलच असे ठामपणे सांगता येते नाही. कदाचित ती गोष्ट प्राप्त झाल्यानंतर प्रेरणा तशीच कायम राहू शकते. थोडक्यात, प्रेरणा ही अध्ययन प्रक्रियेत महत्त्वाची गोष्ट आहे.

**३) शोधन** (Exploration) :

अध्ययनासाठी प्रयत्न करणे गरजेचे असते. आपणाला काय साध्य करावयाचे आहे. याची एकदा जाणीव झाली आणि प्रेरणाही मिळाली की व्यक्ती अध्ययन करू लागते. अध्ययनाच्या सुरूवातीच्याच टप्प्यात लगेच नेमका मार्ग सापडेल असे नाही. म्हणून नेमका मार्ग कोणता याचा शोध सुरू होतो. यामध्ये 'चुका आणि शिका' या पद्धतीचा वापर केला जातो. नेमक्या मार्गाकडे जात असताना अनेक मार्गाची चाचपणी केली जाते. त्यातूनच जास्तीत जास्त चांगला मार्ग कोणता हे समजते.

**४. हालचालींची पुनर्रचना** : (Modification)

उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी निरनिराळ्या हालचाली अपेक्षित असतात. या हालचालीपैकी ज्या हालचाली अनावश्यक आहेत त्या कमी होत जातात. योग्य हालचाली आणि कृती यांची सांगड घातली जाते. वर्तनास विशिष्ट अशी दिशा प्राप्त होते. एखादे वाहन चालविण्यास शिकताना सुद्धा असेच घडते. अनावश्यक हालचाली कमी होत जातात. योग्य तेवढ्या हालचाली व कृती यांची सांगड घातली जाते. वर्तनाची पुनर्रचना घडते. विविध कौशल्ये संपादित केल्यानंतर शेवटी जी सफाई दिसते ती हालचालींच्या पुनर्रचनेमुळेच.

**५) समायोजन** (Adjustment) :

अध्ययन प्रक्रियेमध्ये उद्दिष्ट प्राप्तीसाठी विविध हालचाली केल्या जातात. या हालचालींतील अनावश्यक हालचाली हळूहळू कमी होत जातात. योग्य हालचाली आणि कृती यांची सांगड घातली जाते. वर्तनास विशिष्ट अशी दिशा प्राप्त होते. त्या हालचालीमध्ये सहजता, सफाईदारपणा असणे आवश्यक असते. सरावाने संगणकावरती टायपिंग करणारी व्यक्ती बोलत, गाणी ऐकत, की बोर्डकडे ना पाहता टायपिंग करू शकते. हे एक प्रकारचे समायोजनच असते. नवीन कौशल्य प्राप्तीसाठी परिस्थितीशी जुळवून घेणे गरजेचे असते म्हणजेच समायोजन करणे आवश्यक असते.

**६) आवर्तने** (Revision) :

उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टिने अध्ययनार्थी ज्या हालचाली करतो. त्या एकदाच करून भागत नाही

निवडलेल्या हालचालींची आवर्तने करावी लागतात. अध्ययन प्रक्रियेत निवडलेल्या कृती वारंवार कराव्या लागतात. अभ्यास करताना एकाच घटकाचे पुन्हा पुन्हा वाचन करावे लागते. वारंवार उजळणी केल्याने त्या गोष्टीचे दृढीकरण होते व ती गोष्ट पक्की होते.

**७) परिपक्वता** (Maturity) :

अध्ययन प्रक्रियेमध्ये मिळणारे यश परिपक्वतेवर अवलंबून असते. लहान मुलाच्या बाबतीत अध्ययनात विशिष्ट क्षमता प्राप्त झाल्याशिवाय कौशल्ये संपादित करणे कठिण असते. बालकाचा जन्म झाल्यानंतर रांगणे, बसणे, उभे राहणे, चालणे, धावणे या क्रिया विशिष्ट कालावधीनंतर घडतात. नुकत्याच जन्मलेल्या मुलास लगेच बसता येत नाही. कारण ही क्रिया करण्यासाठी आवश्यक असलेल्या स्नायूमध्ये व अवयवांमध्ये परिपक्वता आवश्यक असते. शारीरिक आणि मानसिक पक्वता प्राप्त झाल्यानंतर थोड्या कालावधीत चांगले अध्ययन होऊ शकते.

**८) मर्मदृष्टी** (Insight) :

अध्ययनार्थी सुरूवातीच्या टप्यामध्ये आपला हेतू साध्य करण्यासाठी काही कृती करतो. या कृतींचा त्याला अनुभव म्हणून उपयोग होतो. या अनुभवाच्या जोरावर वेगवेगळ्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या समस्या मर्मदृष्टीने सुटतात.

**९) अखंड प्रक्रिया** (Continuous Process) :

अध्ययन ही अखंडपणे चालणारी प्रक्रिया आहे. मनुष्य जन्मापासून ते मृत्यूपर्यंत काही ना काही शिकत असतो. अगदी सुरूवातीच्या काळात या क्रिया प्रतिक्षिप्त व यांत्रिक स्वरूपाच्या असतात. त्यानंतर या क्रियांचे रूपांतर अभिसंधित प्रतिक्रियेत होते. लहानपणी कारक कौशल्ये व भाषिक कौशल्ये प्राप्त केली जातात. वय व अनुभव वाढत गेले की हळूहळू बालकाला सभोवतालच्या परिस्थितीचे ज्ञान होते. या ज्ञानाच्या व अनुभववाच्या जोरावर काही उच्च कौशल्ये मिळविली जातात. त्यानंतर जीवनातील विविध समस्या सोडविण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. म्हणूनच अध्ययन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

१) 'सवयी, ज्ञान आणि वृत्ती यांचे संपादन करणे म्हणजे अध्ययन होय.' अशी व्याख्या......यांनी केली आहे.

अ) क्रो आणि क्रो ब) गॅरेट क) मर्फी ड) गेटस्

२) अध्ययन ही......... प्रक्रिया आहे.

अ) खंडित ब) अखंडित क) तात्पुरती ड) द्विध्रुवीय

३) विद्यार्थ्यांना अध्ययनात........ अनुभव दिल्याने अध्ययन परिणामकारक होते.

अ) दुःखद ब) सुखद क) कार्य ड) यापैकी नाही.

४) प्रेरणेचा मुख्य स्त्रोत ........ हा आहे.

अ) गरज ब) सवय क) अभिरूची ड) अभिवृत्ती

### ४.२.२ अध्ययनावर परिणाम करणारे घटक (Factors affecting on Learning) :

अध्ययन प्रक्रिया चांगल्या रितीने घडून येणे हे अनेक घटकांवर अवलंबून असते. अध्ययन करणाऱ्या व्यक्तींच्या सभोवतालची परिस्थिती अध्ययनास अनुकूल अथवा प्रतिकुल ठरते. अध्ययनावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांची गटवारी आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ) अध्यनार्थीशी संबंधित घटक** (Related to learner)

अध्ययन करणाऱ्या व्यक्तींशी संबंधित अशा वय, लिंगभेद, बुद्धिमत्ता, शारीरिक, मानसिक, परिपक्वता, अवधान, अभिरूची, प्रेरणा, सवयी, मानसिक, कल व सज्जता इ. अनेक घटकांचा अध्ययनावर चांगला अथवा वाईट परिणाम होत असतो.

**अध्यनावर परिणाम करणारे घटक**

- अध्यनार्थीशी संबंधित घटक
  - वय
  - लिंगभेद
  - बुद्धिमत्ता
  - अवधान
  - अभिरूची
  - प्रेरणा
  - थकवा
  - परिपक्वता
  - सवयी
  - मानसिक कल
  - सज्जता
- शिक्षकांशी संबंधित घटक
  - शिक्षकाचा कल
  - शिक्षकाची क्षमता
  - शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व
  - मानसिक आरोग्य
  - शिक्षकाचे कार्य समाधान
- शाळेशी संबंधित घटक
  - शालेय संघटन
  - अध्ययन विषयक सोयी
  - भौतिक सोयी सुविधा
- कुटुंबाशी संबंधित घटक
  - कौटुंबिक दर्जा
  - कुटुंबातील भावनिक वातावरण
  - कुटुंबात उपलब्ध होणाऱ्या सोयी
- प्रेरणा आणि प्रावीण्याशी संबंधित घटक
  - प्रेरणा
  - प्रेरणेशी संबंधित व्यक्तिमत्त्व
  - प्रेरणा देणारी तंत्रे

**१) वय :**

अध्ययन करणाऱ्या व्यक्तीचे वय हा अध्ययनावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. सरकणे, रांगणे, उभे राहणे, चालणे, धावणे इ. क्रिया व्यक्तिच्या वयानुसार घडत असतात. या क्रिया घडत असताना स्नायूंची वाढ होणे, स्नायू बळकट व मजबूत होणे, स्नायूंना लवचिकता प्राप्त होणे, वळण लागणे या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

**२) लिंगभेद :**

स्त्री-पुरुषांच्या शरीरात जे फरक असतात त्यामुळे त्यांच्या शारीरिक क्षमतेत फरक पडतो. या शारीरिक क्षमतेचा परिणाम अध्ययनावर होतो. पुरूषांना अध्ययनात संधी अधिक मिळते, प्रोत्साहन मिळते, सर्व -सामान्यपणे स्त्रियांना इतकी संधी व प्रोत्साहन मिळत नाही. याचा विपरीत परिणाम अध्ययनावर होतो.

**३) बुद्धिमत्ता :**

पृथ्वीतलावरील प्रत्येक व्यक्तीची बुद्धिमत्ता वेगवेगळी असते. बुद्धिमत्तेचा आणि शिकण्याच्या प्रक्रियेचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध असतो. बुद्धिमान व्यक्ती जलदपणे अध्ययन करते. बुद्धिमत्ता जसजशी कमी होत जाते तसतशी अध्ययन क्षमता कमी कमी होते. निर्बुद्ध माणसाला एखादी गोष्ट शिकवण्यास जास्त कालावधी लागतो.

**४) अवधान :**

अवधान म्हणजे एखादी गोष्ट जाणून घेण्याची तीव्र इच्छा होऊन त्याकडे आपल्या जाणीवेचा ओघ वळविणे किंवा जाणीव केंद्रीत करणे. आपल्याला ज्या गोष्टीबद्दल प्रेम वाटते तिकडे सहज लक्ष जाते. अवधान हे व्यक्तीच्या अभिरूचीचे व्यक्त रूप होय. अभिरूचीनुसार आपले अवधान केंद्रीत करण्याची दिशा निश्चित होते.

**५) अभिरूची :**

अभिरूची म्हणजे एखाद्या बाबीविषयी वाटणारी ओढ होय. अभिरूची ही व्यक्तिपरत्वे भिन्न असते. आपण जर अवधान केंद्रित करू शकलो तर अध्ययन चांगले होते. याउलट आपणास असेही म्हणता येईल की, चांगले अध्ययन होण्यासाठी अवधानाच्या केंद्रीकरणाची आवश्यकता असते. अवधान हे अभिरूचीशी निगडीत असल्याने जर एखाद्या विषयासंबंधी अभिरूची वाटत असेल तर त्या विषयांचे अध्ययन चांगले होईल.

**६) प्रेरणा :**

अध्ययनासाठी प्रेरणा देणे अत्यंत आवश्यक असते. शिक्षकाने विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी सतत प्रेरणा दिली पाहिजे. प्रेरणेचा विद्यार्थ्यांच्या अध्यायनावर सकारात्मक परिणाम होतो. विद्यार्थ्यांच्या अध्ययनात प्रेरणा निर्माण करण्यासाठी काही प्रलोभनांचा उपयोग शिक्षकाने केला पाहिजे. यामध्ये स्तुती आणि निंदा, शिक्षा आणि पारितोषिके, स्पर्धा इ. प्रलोभनांचा योग्य प्रमाणात वापर करावा.

**७) थकवा :**

थकण्याचा अध्ययनावर विपरीत परिणाम होतो. विद्यार्थ्यांना कंटाळा किंवा थकवा येणार नाही. याची

शिक्षकांनी काळजी घेणे आवश्यक ठरते. शालेय वेळापत्रक तयार करताना अधिक दक्षता घेतली पाहिजे. प्राथमिक शाळेतील तासिका ३० मिनिटापेक्षा जास्त मोठ्या असू नयेत. विद्यार्थ्यांना अध्ययन करीत राहण्याची व विविध प्रकारची कामे करण्याची सवय लावावी म्हणजे त्यांना थकवा येणार नाही.

**८) सवयी :**

सवय ही एक यांत्रिक प्रतिक्रिया आहे. अध्ययनासाठी सवयींचा चांगला उपयोग होतो. सवयींमुळे मानसिक शक्तीची बचत होते. मानवी जीवनात सवयींचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. चांगल्या सवयींमुळे आपण खऱ्या अर्थाने मानव बनतो. नियमित वाचन, अभ्यास, सफाई, नियमितपणा, प्रार्थना, टापटीप, व्यायाम, थंड पाण्याचे स्नान, पहाटे उठणे. यासारख्या चांगल्या सवयी आपणास प्रेरक ठरतात. वाईट सवयींचा अध्ययनावर विपरीत परिणाम होतो. विद्यार्थ्यांना वाईट सवयी जडू नयेत म्हणून खबरदारी घेतली पाहिजे. अनियमितपणा, अस्वच्छता, कंटाळा, आळस, अव्यवस्थितपणा विद्यार्थ्यांत येणार नाही याची काळजी घ्यावी. वाईट सवयी अध्ययनात अडथळा निर्माण करतात.

**ब) शिक्षकांशी संबंधित घटक :**

अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा विचार केल्यानंतर शिक्षकांशी संबंधित असणाऱ्या घटकांचाही विचार आपण करणार आहोत.

**१) शिक्षकाचा कल :**

शिक्षकांना स्वतःच्या व्यवसायाबद्दल आवड, निवड, प्रेम आणि विश्वास असण्याची नितांत गरज आहे. विद्यार्थ्यांबद्दल जिव्हाळा असण्याची नितांत जरूरी आहे. विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन उदारतेचा असावयास हवा. विद्यार्थ्यांजवळ असणाऱ्या सुप्त सामर्थ्यांचा, परिवर्तनशीलतेचा उपयोग त्याचा विकास होण्यासाठी जरूर करून घेता येईल असे शिक्षकास वाटले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर शिक्षकांच्या वृत्तीचा, त्याच्या कलाचा फार मोठा परिणाम होत असतो. शिक्षकाची वृत्ती लोकशाहीवादी असली की त्याच्या विचारातून - आचरणातून ती प्रकट होत राहते. अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्याला त्यातून दिशा सापडते.

**२) शिक्षकाची क्षमता :**

विद्यार्थ्यांच्या अध्ययनाला पोषक असे वातावरण निर्माण करणे हे शिक्षकाच्या क्षमतेवर अवलंबून असते. विद्यार्थ्यांचे अध्ययन परिणामकारक व्हावे म्हणून जसे शिक्षकाला अध्ययनाच्या विविध उपपत्तीचे ज्ञान असावयास हवे, तसेच अध्यापन पद्धतीचेही ज्ञान असावयास हवे. शिक्षकाने अध्यापन करताना नवीन तंत्राचा अवलंब करावयास हवा. विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन पद्धतीचा अवलंब करावयास शिकविला पाहिजे. शैक्षणिक साहित्याचा योग्य प्रकारे वापर करून शिक्षकांनी आपले अध्यापन परिणामकरक केले पाहिजे. विद्यार्थ्यांचे अध्ययन अधिक परिणामकारक करण्यास या शैक्षणिक साहित्याचा अवलंब पोषक ठरतो.

**३) शिक्षकाचे व्यक्तिमत्व :**

अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनावर शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा परिणाम होत असतो. विद्यार्थी हा अनुकरणप्रिय असतो. शिक्षक ज्याप्रमाणे वर्तन करतील, केशभूषा, वेशभूषा करतील त्याप्रमाणे विद्यार्थी वर्तन

करतो. अनुकरण करतो, एखादे शिक्षक आवडले की ते शिक्षक असलेला विषयही त्या विद्यार्थ्याला आवडू लागतो. एकूण शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा विद्यार्थ्यांच्या मनःपटलावर अगोदर उमटतो आणि त्याचा परिणाम त्या विषयाच्या अध्ययनावर होतो.

**४) मानसिक आरोग्य :**

शिक्षकाच्या मानसिक आरोग्याचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम होतो. शिक्षकाचे मानसिक आरोग्य जर उत्तम असेल तर ते चांगले अध्यापन करू शकतात. याउलट शिक्षकाचे मानसिक आरोग्य बिघडलेले असेल तर तो प्रभावी अध्यापन करू शकत नाही. असे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करण्यास असमर्थ ठरतात.

**५) शिक्षकाचे कार्य समाधान :**

शिक्षक जे कार्य करतात त्याचे जर त्यांना समाधान मिळाले तर ते प्रभावी अध्यापन करतात. शिक्षकी पेशामध्ये जर समाधानच मिळाले नाही. तर ते प्रभावी अध्यापन करू शकत नाहीत. त्याचा प्रतिकूल परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होतो.

**क) शाळेशी संबंधित घटक :**

अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम करणाऱ्या शाळेशी संबंधित घटकांचा आता आपण विचार करूया.

**१) शालेय संघटन :**

शाळेमध्ये अनेक घटक असतात. काही मानवी घटक व काही भौतिक घटक असतात. शाळेतील या सर्व घटकांचा विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम होतो. शाळेमध्ये भौतिक सोयी-सुविधा जर विद्यार्थ्यांना चांगल्या उपलब्ध करून दिल्या तर विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगले होते. शाळेत असणारे सर्व मानवी घटकांमध्ये जर समन्वय चांगला असेल, एकमेकांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण असेल तर विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगले होते.

**२) अध्ययन विषयक सोयी :**

शाळेमध्ये विद्यार्थ्यांना कोण-कोणत्या सोयीसुविधा आहेत. त्यावर विद्यार्थ्यांचे अध्ययन अवलंबून असते. या सोयीत क्रींडागण, प्रयोगशाळा, कलाभवन, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य, नकाशे, प्रतिकृती, चित्रे, अभ्यासिका, फर्निचर, शैक्षणिक चित्रपट इत्यादींचा समावेश आहे. शाळेतील साधनसामग्री अत्याधुनिक हवी अध्ययनविषयक सोयीने शिक्षकांनी अध्ययनार्थ्यांना स्वयं-अध्ययनाची सवय लावली पाहिजे.

**३) भौतिक सोयी सुविधा :**

शाळेतील वातावरण अध्ययनास पोषक रहावे. यासाठी शाळेची इमारत प्रशस्त, भव्य आणि आकर्षक असावी. वर्ग आकाराने मोठे, तसेच वर्गामध्ये हवा खेळती असावी. वर्गामध्ये प्रकाश पुरेशा प्रमाणात असावा. कोंदट अंधाऱ्या वर्गाचा अध्ययनावर विपरीत परिणाम होतो. वर्गाच्या भिंतीना आल्हाददायक वाटेल असा रंग दिलेला असावा. शाळेमधील भौतिक सुविधा जर चांगल्या असतील व पुरेशा प्रमाणात असतील तर विद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो.

**ड) कुटुंबाशी संबंधित घटक :**

अध्ययनर्थ्याच्या अध्ययनावर त्याच्या घराचा किंवा कौटुंबिक वातावराचा मोठा परिणाम होत असतो.

अध्ययनावर परिणाम करणाऱ्या कुटुंबाशी संबंधित घटकांचा आता आपण अभ्यास करणार आहोत.

**१) कौटुंबिक दर्जा :**

विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचा प्रारंभ कुटुंबात होतो. कुटुंब ही सुद्धा अनौपचारिक शिक्षण देणारी संस्थाच आहे. कुटुंबातील माणसांच्या बोलण्याकडे, चालण्याकडे लहान मूल जाणीवपूर्वक लक्ष देते आणि अनुकरणाने स्वतःहून शिकू लागते. कुटुंबातील चांगल्या-वाईट वातावरणाचा त्याच्या अध्ययनावर परिणाम होतो. श्रीमंत कुटुंबातील मुलांना अध्ययनाच्या भरपूर सोयी उपलब्ध होतात. मध्यम आर्थिक स्थितीचे कुटुंब इतर खर्चांना आवर घालून मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देते. गरीब कुटुंबाला पोटापाण्याची सोय करणे इतके अवघड असते की, शिक्षणासाठी सोयी उपलब्ध करून देणे त्याला जवळ जवळ अशक्य असते. उलट कुटुंबातील सर्व घटकांनी कष्ट उपसून पैसे कमवावेत आणि दररोजच्या उदरनिर्वाहासाठी हातभार लावावा अशी त्याची अपेक्षा असते. अशा प्रकारे कौटुंबिक आर्थिक स्थितीचा अध्ययनावर मोठा परिणाम होतो.

**२) कुटुंबातील भावनिक वातावरण :**

कुटुंबातील भावनिक वातावरणाचा विद्यार्थ्यांचा अध्ययनावर परिणाम होतो. मुलांच्या शारीरिक गरजांबरोबरच मुलांच्या मानसिक व भावनिक गरजा कुटुंबाने पूर्ण करणे गरजेचे असते. मुलांना कुटुंबात सुरक्षितता लाभली तर त्यांचे अध्ययन चांगले होते. त्यांना मायेचा आधार आवश्यक असतो. कुटुंबामध्ये जिव्हाळ्याचे, प्रेमाचे वातावरण असेल तर त्यांचा मानसिक विकास चांगला होतो. पण कुटुंबातील वातावरण तुसडेपणाचे असेल तर मुले एकलकोंडी होतात. कुटुंबातील वाद विवादाचा प्रतिकूल परिणाम मुलांवर होतो.

**३) कुटुंबात उपलब्ध होणाऱ्या सोयी :**

कुटुंबामध्ये मुलांना शिक्षणासाठी आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध करून दिल्यास त्याचा अध्ययनावर अनुकूल परिणाम होतो. याउलट शैक्षणिक साहित्य उपलब्ध नाही करून दिले नाही तर त्याचा अध्ययनावर प्रतिकूल परिणाम होतो. अध्ययनासाठी सोयी उपलब्ध करून देणे हे केवळ घरच्या श्रीमंतीवर किंवा गरिबीवर अवलंबून नाही. कुटुंबप्रमुखाचा शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरही अवलंबून आहे. या उपलब्ध करून दिलेल्या सोयींचा परिणाम निश्चितपणे अध्ययनावर होतो.

## इ) प्रेरणा आणि प्रावीण्याशी संबंधित घटक :

अध्यनार्थ्यांच्या अध्ययनावर परिणाम करणाऱ्या प्रेरणा आणि प्रावीण्याशी संबंधित घटकांचा आपण अभ्यास करूया.

**१) प्रेरणेशी संबंधीत व्यक्तिमत्त्व :**

अध्ययनाचे यश अध्ययनात निर्माण केल्या जाणाऱ्या प्रेरणेच्या प्रमाणात असते. परिणामकारक अध्ययन प्रेरणेवर अवलंबून असते. शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व विद्यार्थ्यांच्या अध्ययनात प्रेरणा निर्माण करू शकले पाहिजे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षकाने अध्ययनासाठी आतून चालना निर्माण केली पाहिजे.

**२) प्रेरणा देणारी यंत्रे :**

अध्ययनार्थांच्या अध्ययनास प्रेरणा देणाऱ्या काही तंत्रांचा वापर करता येतो. या तंत्रांचा योग्य वेळी

योग्य प्रमाणात शिक्षकाने वापर केला पाहिजे. अध्ययनामध्ये विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केल्यावर स्तुती आणि अपयशाबद्दल निंदा योग्य ठरते. परंतु स्तुती किंवा निंदा यांचा उपयोग तारतम्याने करणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांना अध्ययनाकरिता प्रोत्साहन देण्यासाठी पारितोषिके आणि समज देण्यासाठी शिक्षेचा उपयोग पूर्वीपासून केला जातो. स्पर्धेच्या माध्यमातूनसुद्धा विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण करता येते. व त्याचा अनुकूल परिणाम अध्ययनावर होतो.

अशा प्रकारे अध्ययनावर अनेक घटकांचा परिणाम होतो.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** – २

१) खालीलपैकी अध्ययनार्थ्याच्या अध्ययनावर शिक्षकाशी संबंधित ......घटकाचा परिणाम होतो.

अ) शिक्षकाची क्षमता ब) शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व

क) शिक्षकाचे मानसिक आरोग्य ड) वरील सर्व

२) नवीन कौशल्य प्राप्तीसाठी परिस्थितीशी जुळवून घेणे म्हणजेच.....होय.

अ) समायोजन ब) शोधन क) प्रेरणा ड) परिपक्वता

३) अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनावर कुटुंबाशी संबधित .......... घटकाचा परिणाम होतो.

अ) कौटुंबिक दर्जा ब) कुटुंबातील भावनिक वातावरण

क) कुटुंबात उपलब्ध होणाऱ्या सुविधा ड) वरील सर्व

४) शिक्षकाने आपल्या अध्ययनात स्तुती व निंदा यांचा वापर ....... केला पाहिजे.

अ) सतत ब) हसतमुखाने क) तारतम्याने ड) गरजेनुसार

## ४.२.३ अध्ययनाच्या उपपत्ती – प्रयत्न प्रमाद उपपत्ती, अभिजात अभिसंधान उपपत्ती, मर्मदृष्टिमूलक अध्ययन उपपत्ती (Theories of Learning - Trial and Error , Classical Conditioning, Insightful learning.)

अध्ययन का आणि कसे होते याविषयी शास्त्रशुद्ध प्रयोग करून विविध मानसशास्त्रज्ञांनी अध्ययन पद्धतीविषयी निष्कर्ष काढले आहेत आणि ते उपपत्ती अथवा सिद्धांताच्या स्वरूपात मांडले आहेत. अध्ययन प्रक्रिया निश्चित कशी चालते याबाबतीत मानसशास्त्रामध्ये एकवाक्यता नाही. विविध मानसशास्त्रज्ञांनी मांडलेल्या अध्ययनविषयक उपपत्तींचा आपण अभ्यास करणार आहोत.

### १) प्रयत्न प्रमाद उपपत्ती (Trial and Error):

थॉर्नडाईक या मानसशास्त्राने शास्त्राशुद्ध प्रयोग करून ही उपपत्ती मांडली आहे. त्यांच्या मते, खालच्या वर्गातील सर्व प्राणी या पद्धतीनेच शिकत असतात. मनुष्यसुद्धा अनेक वेळा या पद्धतीने शिकतो. व्यवहारात अनेक कृती, कौशल्ये आपण चुकत चुकत, हळूहळू सुधारणा करून आत्मसात करतो. सरावाने चुकांचे प्रमाण कमी होऊन योग्य प्रतिसादाचे संपादन होते. यालाच प्रयत्न–प्रमाद पद्धती असे म्हणतात.

थोडक्यात, प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिता निरनिराळ्या प्रतिक्रिया करणे, त्यापैकी ज्यामुळे उद्दिष्ट प्राप्त होत नाही, त्या चुकीच्या म्हणून सोडून देणे व ज्या प्रतिक्रियेमुळे उद्दिष्ट प्राप्त होत आहे ती प्रतिक्रिया

पुन्हा तीच परिस्थती निर्माण झाली असता करणे ही प्रक्रिया प्रयत्न-प्रमाद अध्ययन पद्धतीत अभिप्रेत आहे.

प्रयत्न-प्रमाद अध्ययनविषयी थॉर्नडाईकने मांजरावर प्रयोग केला. त्याने या प्रयोगासाठी ए कूट पेटी बनवली. या कूट पेटीतील विशिष्ट कळ दाबल्याखेरीज पेटीचा दरवाजा उघडत नसे. या पेटीत एका भुकेल्या मांजराला ठेवण्यात आले. बाहेर मांजराला दिसेल अशा जागी खाद्यपदार्थ म्हणून मासा ठेवण्यात आला. भुकेल्या मांजराने बाहेर येण्यासाठी खूप धडपड केली. पेटीचे गज दाताने चावण्याचा प्रयत्न केला. गजाच्या फटीतून पंजा बाहेर काढून मासा पकडता येतो का ते पाहिले. अशा विविध प्रतिक्रिया होत असताना योगायोगाने मांजराचा पाय कळीवर पडून कळ दाबली गेली आणि दरवाजा उघडला गेला, त्यानंतर मांजर ताबडतोब बाहरे आले आणि मासा खाऊन टाकला. दुसऱ्या वेळी मांजराला पुन्हा पेटीत ठेवले आणि दरवाजा बंद करून बाहेर मासा ठेवला. त्यावेळी पहिल्यापेक्षा निरर्थक हालचालींची संख्या कमी झाल्याचे आढळून आले. पुनः पुन्हा हा प्रयोग केला असता हळूहळू अयोग्य प्रतिसादांची संख्या कमी होत जाऊन योग्य प्रतिसादांची संख्या वाढत गेली. कालांतराने मांजराला पेटीत ठेवल्याबरोबर कोणतीही निरर्थक हालचाल न करता कळ दाबून मांजर बाहेर येऊ लागले म्हणजेच प्रयत्न-प्रमाद पद्धतीने कळ दाबून दरवाजा उघडण्याची क्रिया मांजर शिकले.

थॉर्नडाईकच्या या प्रयोगावरून प्रयत्न -प्रमाद पद्धतीने विश्लेषण केल्यास पुढील अवस्था दिसून येतात.

१) मांजर भुकेले असल्यामुळे भूक ही प्रेरणा मांजराला स्वस्थ बसू देत नाही. त्यामुळे उदिष्ट पूर्तीसाठी ते धडपड करते.

२) भुकेल्या मांजराला मासा खाऊन भूक या प्रेरणेची पूर्ती करण्याचा मार्ग सरळ व सुलभ नाही. त्यामुळे सुरूवातीला शोधनात्मक हालचाली खूप होतात.

३) योगायोगाने पेटीतील कळ दाबली जाऊन दार उघडते व मासा खाण्याच्या उद्दिष्टाची म्हणजेच भूक या प्रेरणेची पूर्ती होते.

४) अशा प्रकारे मिळालेल्या यशामुळे पुढे पुढे चुकीच्या व अनावश्यक प्रतिक्रिया कमी कमी होत जातात.

५) अनेक प्रयत्नानंतर योग्य तेवढ्याच हालचाली होऊन कौशल्याची प्राप्ती होते.

प्रयत्न-प्रमाद पद्धतीने शिकणाऱ्या या प्रक्रियेमध्ये मांजराच्या चुकीच्या प्रयत्नांची संख्या हळूहळू कमी होत जाते व पायाने कळ दाबण्याची क्रिया दृढ होते. असे का घडते याचे स्पष्टीकरण करण्यासाठी थॉर्नडाईकने अध्ययनाचे तीन नियम सांगितले आहेत.

**अध्ययनाचे नियम :**

**१) सज्जतेचा अथवा तयारीचा नियम :**

व्यक्तीचे अध्ययन घडून येण्यासाठी मानसिक व शारीरिक तयारी असणे गरजेचे असते. शिकण्याची आवड व अभिरूची नसेल तर अध्ययन होणार नाही. थॉर्नडाईकच्या प्रयोगातील मांजर जर भुकेले नसेल तर ते धडपड करून पेटीबाहेर येण्याचा मार्ग शोधून काढणार नाही. शालेय शिक्षणामध्येही एखादी गोष्ट का शिकावी याचे महत्त्व पटलेले असेल किंवा अध्ययनामुळे विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक जिज्ञासेची पूर्तता होणार असेल तर शिकण्याची मानसिक तयारी फार लवकर होते.

### २) पुनरावृत्तीचा किंवा सरावाचा नियम :

मांजरावर पुन्हा पुन्हा प्रयोग केल्यावर पुढील प्रयत्नांत चुकांचे प्रमाण कमी होऊन योग्य प्रतिसादाचे दृढीकरण झाले. म्हणजेच शिकलेली क्रिया पुनः पुन्हा केली गेली की प्रत्येक पुनरावृत्तीबरोबर ती अधिकाधिक दृढ होत जाते. याचाच अर्थ अध्ययनात सराव महत्वाचा असतो. याउलट ज्ञान किंवा कौशल्याचा उपयोग करण्याची संधी वारंवार मिळाली नाही तर ते प्रतिसाद विस्मृतित जातात.

### ३) परिणामाचा नियम :

मांजराने योग्य प्रतिसाद दर्शविल्यावर दरवाजा उघडून पेटीतून मांजराची सुटका झाली आणि मांजराला अन्नभक्षण करता आले. अशा अनेक प्रयत्नानंतर कळ दाबून बाहेर येण्याचे कौशल्य मांजराने आत्मसात केले. म्हणजेच परिणामाच्या नियमाचा अर्थ असा की ज्या क्रियेमुळे प्रेरणापूर्ती झाल्याचे समाधान मिळते. त्या क्रिया दृढ होतात व ज्या क्रिया प्रेरणापूर्तीसाठी अयशस्वी ठरल्या आहेत. त्या सोडून दिल्या जातात. चांगल्या वर्तनाबद्दल पालकांकडून कौतुक होऊन शाबासकी मिळत असेल तर त्या वर्तनाची पुनरावृत्ती होऊन ते वर्तन दृढ होऊ लागते.

### अभिजात अभिसंधान उपपत्ती (Classical Conditioning Theory) :

अध्ययन क्रियेचा सर्वात महत्त्वाचा आणि प्राथमिक स्वरूपाचा प्रकार म्हणजे अभिजात अभिसंधान होय. रशियन शरीरविज्ञान शास्त्रज्ञ पॅव्हलॉव्ह यांनी अभिजात अभिसंधान उपपत्तीचा पुरस्कार केला. पॅव्हलॉव्ह यांनी वर्तनवादी दृष्टीने मानसिक प्रक्रियांचा अभ्यास केला. वर्तनवादी मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून अध्ययन हे एक वर्तनच आहे. चेतक आणि प्रतिसाद यामध्ये साहचर्य प्रस्थापित होऊन वर्तन घटते. हे वर्तन घडताना मेंदूतून जाणाऱ्या नसा यामध्ये संबंध प्रस्थापित होतो असे वर्तनवादी मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

अभिसंधान म्हणजे एखाद्या प्रतिक्रियेत नैसर्गिक चेतकाबरोबर कृत्रिम चेतक वापरून कृत्रिम चेतकाद्वारे तीच नैसर्गिक प्रतिक्रिया घडवून आणणे.

पॅव्हलॉव्ह या शरीरविज्ञान शास्त्रज्ञाने कुत्र्यांवर प्रयोग केला. कुत्र्यासमोर अन्नाची थाळी आणण्याच्या वेळी घंटा वाजविली जाई. अन्न पाहिले की लाळ सुटणे ही नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. अन्नाची थाळी आणली की घंटेचा आवाज या गोष्टीची अनेक वेळा पुनरावृत्ती करण्यात आली. कुत्र्याच्या तोंडाला भोक पाडून काचनळी घुसवून लाळ मोजपात्रात पडेल अशी व्यवस्था केली होती. प्रत्येक वेळी लाळ मोजली.

काही दिवसानंतर नुसता त्या घंटेचा आवाज कानावर पडताच कुत्र्याच्या तोंडात लाळ सुटत असे ही लाळ मोजपात्रात मोजली असता अन्न दाखवल्यानंतर सुटणाऱ्या लाळेएवढी आढळली. ही अभिसंधित प्रतिक्रिया (Classical Conditioning) झाली.

या प्रयोगामध्ये अन्न हा नैसर्गिक चेतक असून घंटा वाजवणे हा कृत्रिम चेतक आहे. कुत्र्याच्या तोंडाला लाळ सुटणे ही नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. नैसर्गिक चेतक समोर नसतानाही कृत्रिम चेतकाने तीच नैसर्गिक प्रतिक्रिया घडून येणे म्हणजे अभिजात अभिसंधान होय.

१. नैसर्गिक चेतक (अन्न) $\longrightarrow$ नैसर्गिक प्रतिसाद (लाळनिर्मिती)

२. नैसर्गिक चेतक (अन्न) + कृत्रिम चेतक (घंटेचा आवाज) $\longrightarrow$ नैसर्गिक प्रतिसाद (लाळनिर्मिती)

३. कृत्रिम चेतक (घंटेचा आवाज) ⟶ नैसर्गिक प्रतिसाद (लाळनिर्मिती)

या प्रयोगात प्रत्येक वेळी लाळ सुटल्यावर अन्न देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे अभिसंधानाचे दृढीकरण होते. घंटा वाजवून अन्न दिले नाही तर लाळनिर्मितीचे प्रमाण कमी होत जाईल.

**अभिजात अभिसंधानाचे महत्त्व :**

१) अभिजात अभिसंधान पद्धतीने आपण अनेक गोष्टी शिकतो. अध्ययनार्थ्यांना नवे शब्द शिकविताना आपण चित्रांचा, वस्तूंचा व आकृत्यांचा उपयोग करतो. क-कमळाचा, अ-अननसाचा, आ-आईचा ही अक्षरे शिकविताना कमळ, अननस, आई यांची चित्रे दाखवितो. पण नंतर चित्रांचा, वस्तूंचा व आकृत्यांचा उपयोग न करता केवळ शब्दांच्या मदतीने त्यांना भावार्थ समजू शकतो.

२) अभिजात अभिसंधानाच्या पद्धतीने अध्ययनार्थ्यांना आपण चांगल्या सवयी लावू शकतो. शिक्षक वर्गात आल्यावर अध्ययनार्थी उभे राहतात. शिक्षकांना नमस्ते म्हणतात. शिक्षकांनी यावेळी थोडे स्मित केले तर या कृतीचे दृढीकरण होते.

३) अध्ययनार्थ्यांना विविध प्रसंगी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त करणे, राष्ट्रगीत किंवा प्रार्थना म्हणताना स्तब्ध उभे राहणे. मैदानावर जाताना ओळीने जाणे, शाळेत वेळेवर येणे, वर्गात शिक्षक शिकवत असताना शांत बसणे, वेळेवर जेवण करणे इ. सवयी अभिसंधानाने लावता येतात.

४) अध्ययनार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनातही अभिसंधानाचा उपयोग करून घेता येतो. विद्यार्थ्यांना आवडणाऱ्या गोष्टींचा व कृतींचा उपयोग करून, प्रतिसाद मिळवून जे शिकवायचे आहे. त्या पाठ्यवस्तूशी प्रतिक्रियेचा संबंध जोडता येतो.

**३) मर्मदृष्टीमूलक अध्ययन उपपत्ती** (Insightful Learning Theory) :

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस मानशास्त्राच्या अभ्यासावर रचनावादाचा खूप पगडा होता. रचनावादावर मॅक्स वर्दायमर, कोहलर आणि कोफका यांनी खूप टीका केली. या मानसशास्त्रज्ञांच्या मते कोणत्याही वर्तनाचा अभ्यास करताना वर्तनाचा सम्यक विचार करणे जरूर असते. त्यातून आपणास जो बोध होतो तो समष्टिरूप असतो. या तिघांनीही अध्ययनाचे स्वरूप अवबोधाच्या स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न केला. एखादी गोष्ट आत्मसात करताना चुकीच्या प्रयत्नांशिवाय प्राणी एकदम अचूक कृती करून अपेक्षित ध्येय गाठतो हे त्यांनी मर्मदृष्टी अध्ययनाच्या साहाय्याने दर्शविले.

मानसशास्त्राच्या अनेक संप्रदायापैकी समाष्टिवादी हा एक वेगळा संप्रदाय आहे. Gestatt हा जर्मन शब्द आहे.

या मानसशास्त्रज्ञांच्या मते, एखाद्या वस्तूचा किंवा परिस्थितीचा खरा अवबोध आपणास तिच्या पूर्ण आकृतिबंधातून किंवा सामाकारातून होतो हा मूळ विचार या संप्रदायात सामावला आहे. समग्रता किंवा संपूर्ण आकृतीबंध हा या अध्ययन पद्धतीचा आत्मा आहे. एखाद्या समस्येचे किंवा परिस्थितीचे संपूर्ण व संकलित निरीक्षण केल्यावर तसेच तिचे मर्म जाणून घेतल्यावर समस्या सोडवण्याची नेमकी युक्ती सापडते म्हणजेच समस्येच्या मर्गावर आपली दृष्टि केंद्रीत होते. यासाठी मर्मदृष्टी (Insight) असा शब्दप्रयोगाचा वापर केला आहे.

मर्मदृष्टिमूलक अध्ययनात विश्लेषणाचा फारसा उपयोग होत नाही. संपूर्ण आकृतिबंध ध्यानात घेऊन

अध्ययन होते. कोलहर यांच्यामते अध्ययन तीन टप्प्यात होते.

१) समस्येची परिस्थिती पूर्णपणे जाणून घेणे.

२) संकलन पद्धतीने निरीक्षण करणे.

३) मर्म जाणून समस्या सोडविणे.

कोहलर यांच्या मते बुद्धिहीन प्रयत्न करणे किंवा केवळ सवयी लावून घेणे म्हणजे अध्ययन नव्हे. एखाद्या समस्येचे मर्म जाणल्यामुळे समस्येवर प्रकाश पडतो आणि त्यातून समस्या झटकन सुटून अध्ययन होते. मर्मदृष्टिमूलक अध्ययन पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी कोहलर यांनी सुलतान नावाच्या एका चिंपाझी जातीच्या माकडावर प्रयोग केले. ते प्रयोग कोणते ते आपण जाणून घेऊ.

**प्रयोग १ ला :**

एका पिंजऱ्यात चिंपाझीला सोडण्यात आले. हा चिंपाझी भुकेलेला होता. पिंजऱ्याच्या छताला एक केळीचा घड बांधून ठेवला होता. पिंजऱ्यात कोपऱ्याला एक रिकामी पेटी होती. ही पेटी घडाच्या खाली आणून पेटीवर उभे राहून उडी मारली तर चिंपाझीला केळीचा घड मिळणार होता. सुलतानने समस्यामय परिस्थिती पूर्णपणे जाणून घेतली. संकलन पद्धतीने परिस्थितीचे निरीक्षण केले आणि मर्म जाणून ही समस्या सोडविली पिंजऱ्यातील पेटी केळीच्या घडाखाली ओढून आणली आणि पेटीवर उभे राहून उडी मारली. केळीचा घड हस्तगत केला.

**प्रयोग २ रा :**

या दुसऱ्या प्रयोगात केळीचा घड अगोदरच्या प्रयोगातील उंचीपेक्षा जास्त उंचीवर टांगून ठेवला होता. पिंजऱ्यात आता एका पेटीऐवजी दोन पेट्या होत्या एक पेटी दुसऱ्या पेटीवर ठेवून त्यावर उभे राहून उडी मारणे जरूरीचे होते. ही समस्या पहिल्या समस्येपेक्षा जास्त अवघड होती. एका पेटीवर दुसरी पेटी ठेवून भक्कम आधार निर्माण करायचा होता. भुकेला चिंपाझी, सुलतान जेव्हा पिंजऱ्यात सोडला. तेव्हा परिस्थिती पूर्णपणे जाणून घेऊन त्याने मर्मदृष्टीने समस्या सोडवली. पिंजऱ्याच्या छतावर अडकवलेला घड सुलतानने हस्तगत केला.

**प्रयोग ३ रा :**

या प्रयोगाच्या वेळी केळीचा घड चिंपाझीच्या हाताला न येईल अशा बेताने पिंजऱ्याच्या बाहेर ठेवला होता. पिंजऱ्यात दोन लाकडी काठ्या ठेवल्या होत्या. त्या एकमेकांना जोडून मोठी लांबलचक काठी तयार करता येत होती. ती मोठी काठी तयार करता येत होती. ती मोठी काठी तयार करून मगच पिंजऱ्याबाहेर ठेवलेला केळीचा घड सुलतानला प्राप्त करणे शक्य होते. चिंपाझीने काही क्षण निरीक्षण केले आणि एकदम मर्मदृष्टीने समस्या सोडविली दोन काठ्या जोडून मोठी काठी तयार केली आणि पिंजऱ्याबाहेरील केळीचा घड मिळविला.

**मर्मदृष्टीमूलक अध्ययन उपपत्तीचे शैक्षणिक महत्त्व :**

१) दैनंदिन जीवनात आपण कळत-नकळत अनेक वेळा मर्मदृष्टिमूलक अध्ययन पद्धतीचा अवलंब करीत असतो. रस्त्यावरून चालत असताना वेगाने येणारी बस पाहून आपण रस्ता ओलांडावा की नाही, ओलांडावयाचा झाल्यास किती वेळात ओलांडावा यासंबंधी निर्णय घेतो. फळीवर उंचावर

ठेवलेला लाडूचा डबा मिळविण्यासाठी स्टुलाचा उपयोग कसा करायचा हे बालक लगेच ठरविते.

२) भाषा विषयांमध्ये कवितेचे रसग्रहण करताना समग्र कविता आपण अभ्यासतो. कवितेचे भाग पाडून ती कविता अभ्यासत नाही.

३) लहान मुलांना शब्दांच्या माध्यमातून आपण मुळाक्षरे शिकवितो. केवळ मुळाक्षरे शिकवित नाही. कमळ, गवत, आई, चमचा, जहाज इ. शब्द अगोदर शिकवून त्या शब्दाच्या माध्यमातून क, ग, आ, ज, च ही मुळाक्षरे शिकवितो.

४) अध्यापन तुटकपणे न होता सलगपणे करणे महत्वाचे आहे. शास्त्रात प्रथम शरीर, शरीरासंबंधीची सामान्य माहिती सांगून त्यानंतर शरीराचे अवयव, अवयवांचे कार्य शिकवितात.

५) एखादी कथा शिकवायची असेल तर अशावेळी आपण प्रथम संपूर्ण गोष्ट सांगतो आणि मग त्या कथेचे भाग करून ती कथा शिकवितो.

६) शास्त्रविषयक प्रयोगात अध्ययनार्थ्यांना असे निरीक्षक करावयास सांगावे की त्याचे मर्म त्यांच्या ध्यानात यावे.

अशा प्रकारे अध्ययनाच्या विविध उपपत्तींचा आढावा आपण घेतला आहे. त्या अध्ययन उपपत्तीचे शैक्षणिक महत्त्व काय आहे? याचाही आपण आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** – ३

१) अध्ययनाचे नियम ........ यांनी सांगितले.

अ) स्किनर ब) कोहलर क) थॉर्नडाईक ड) बीने

२) प्रयत्न प्रमाद उपपत्तीमध्ये थॉर्नडाईक यांनी......... यावर प्रयोग केला.

अ) मांजर ब) उंदीर क) कुत्रा ड) कबुतर

३) पॅवलाव्हने ....... प्रयोग करून अभिजात अभिसंधान पद्धती मांडली.

अ) माकडावर ब) कुत्र्यावर क) मांजरावर ड) कबुतरावर

४) मर्मदृष्टिमूलक अध्ययन उपपत्ती.......... यांनी शोधून काढली.

अ) गिलफोर्ड ब) पॅवलाव्ह क) कोहलर ड) थॉर्नडाईक

**४.२.४ अध्ययन संक्रमणाचे प्रकार** (Transfer fo Learning) :

व्यक्तीने संपूर्ण शालेय वातावरणात संपादन केलेले ज्ञान, आत्मसात केलेली कौशल्ये, वृत्ती आणि सवयी यांचा शाळेबाहेरील समाज जीवनातसुद्धा त्याला उपयोग होतो. ज्या अध्ययनार्थ्यांचे गणित आणि इंग्रजी हे विषय चांगले असतात त्याचे अन्यही विषय चांगले असतात असा एक समज आहे. एका विषयाचे अध्ययन केल्यावर दुसऱ्या विषयावर त्याचा नक्कीच परिणाम होतो. म्हणून आपण सर्वप्रथम अध्ययन सक्रमणाची व्याख्या अभ्यासूया.

**अध्ययन संक्रमण :**

एका विशिष्ट परिस्थितीत मिळविलेले ज्ञान, संपादित केलेली कौशल्ये , तंत्र, वृत्ती, सवयी यांचा उपयोग जेव्हा दुसऱ्या परिस्थितीत आपणाला होतो. अनुकुल, प्रतिकूल किंवा दुस्या परिस्थितीत अपणाला होतो. अनुकूल, प्रतिकूल किंवा कोणताच नाही, तेव्हा त्यास अध्ययन संक्रमण असे म्हणतात.

शाळेत शिकलेल्या अनेक गोष्टींचा आपल्याला दैनंदिन जीवनात उपयोग होतो. शाळेच्या परिस्थितीतील अध्ययनाचा बऱ्याचवेळा आपल्याला जीवनाच्या परिस्थितीत उपयोग होतो. एका विशिष्ट परिस्थितीतून दुसऱ्या विशिष्ट परिस्थितीत होणारे अध्ययनाचे हे संक्रमण आहे.

**अध्ययन संक्रमणाचे प्रकार :**


एखाद्या परिस्थितीतील अध्ययनाचा दुसऱ्या परिस्थितीतील अध्ययनावर तीन प्रकारचा परिणाम होतो.

१) अनुकुल परिणाम (धन संक्रमण)

२) प्रतिकूल परिणाम (ऋण संक्रमण)

३) कोणताही परिणाम होत नाही (शून्य संक्रमण)

या तीन परिणामांवरून अध्ययन संक्रमणाचे तीन प्रकार संभवतात.




### १) धन संक्रमण (Positive Transfer)

एका परिस्थितीत केलेल्या अध्ययनाचा दुसऱ्या परिस्थितीत करावयाच्या अध्ययनावर जर अनुकूल परिणाम होत असेल किंवा एका विषयाच्या अध्ययनाची दुसऱ्या विषयाच्या अध्ययनास मदत होत असेल, तर अशा अध्ययन संक्रमणास धन संक्रमण (Positive Transfer) असे म्हणतात.

१) संस्कृत विषयाचा अभ्यास मराठीच्या अभ्यासास पूरक ठरतो.

२) सायकलवर तोल सांभाळता आली की मोटारसायकल चालवता येते.

३) विज्ञानाच्या प्रयोगांचे निरीक्षण करून निष्कर्ष काढले असतील तर ते भूगोलासारख्या विषयास अध्ययनास मदत करतात.

४) गणित विषयाच्या अध्ययनाचा पदार्थ विज्ञानाच्या अभ्यासात उपयोग होतो.

शाळेमध्ये विद्यार्थ्यांना विविध विषय असे शिकवावेत की, त्या गोष्टीचे जास्तीत जास्त धन संक्रमण होईल.

### २) ऋण संक्रमण (Negative Transfer) :

एका परिस्थितीतत केलेल्या अध्ययनाचा दुसऱ्या परिस्थितीत करावयाच्या अध्ययनावर विपरीत परिणाम

होत असेल किंवा एका विषयाचे ज्ञान दुसऱ्या विषयाचे ज्ञान मिळविताना अडथळा निर्माण करीत असेल तर अशा संक्रमणास ऋण संक्रमण असे म्हणतात.

१) इंग्रजीतील वाक्यरचना शिकताना मराठी वाक्यरचनेचे ज्ञान अडथळा निर्माण करते. मराठीत आपण कर्ता, कर्म, क्रियापद अशी रचना शिकतो पण इंग्रजीत मात्र कर्ता, क्रियापदानंतर कर्म अशी रचना असते.

२) मराठीतील लिंगभेदांच्या अभ्यासानंतर हिंदीतील लिंगभेद शिकताना काही वेळा अडथळा निर्माण होतो. उदा. मराठी भाषेत पुस्तक हे नपुसकलिंगी तर हिंदीत स्त्रीलिंगी.

३) वहीवर वर्तुळाची आकृती काढणाऱ्या व्यक्तिला फळ्यावर वर्तुळाची आकृत काढताना अडथळा निर्माण होतो.

४) मराठी भाषा बोलणारा माणूस कानडी बोलू लागला तर पूर्वी मिळालेले ज्ञान नंतरचे ज्ञान मिळविताना अडथळा निर्माण करते.

### ३) शून्य संक्रमण (Zero Transfer) :

दोन्ही परिस्थिती अगदी भिन्न असतील तर एका परिस्थितीतील अध्ययनाचा दुसऱ्या परिस्थितीतील अध्ययनावर अनुकूल अथवा प्रतिकूल कोणताच परिणाम होत नाही. त्यावेळी त्या प्रकारच्या संक्रमणास शून्य संक्रमण असे म्हणतात.

१) इतिहासाच्या अध्ययनाचा गणिताच्या अध्ययनावर साधक किंवा बाधक काहीच परिणाम होत नाही.

२) सायकल शिकण्याचे कौशल्य आणि टंकलेखनाचे कौशल्ये यांचा एकमेकांवर काहीच परिणाम होत नाही.

३) धावण्याच्या कौशल्याचा वाचण्याच्या कौशल्याशी अर्थाअर्थी काही संबंध नाही.

४) स्वयंपाक करण्याच्या कौशल्याचा, विणकाम करण्याच्या कौशल्यावर कोणताही परिणाम संभवत नाही.

### ■ अध्ययन संक्रमणाचे शैक्षणिक महत्त्व :

१) अध्ययनार्थ्यांच्या बौद्धिक कुवतीवर संक्रमण अवलंबून असल्यामुळे मंदबुद्धीच्या मुलांना शिकविताना नियम व तत्त्वे व्यवस्थित समजतील याची काळजी घ्यावी.

२) अभ्यासक्रमात समाविष्ट झालेल्या विषयांचा जीवनाशी संबंध जोडून जीवनाच्या वाटचालीत त्याची उपयुक्तता प्रस्थापित केली गेली पाहिजे.

३) अध्ययनार्थ्यांची जिज्ञासा जागृत करून उपयुक्त ज्ञान व कौशल्य तसेच वृत्ती संपादन करण्यास त्यांना प्रवृत्त करावे.

४) निरनिराळे विषय शिकविताना सामान्यीकरणावर अधिक भर द्यावा. विषय तुटकपने न शिकविता त्यांचा एकमेकांशी संबंध प्रस्थापित करावा.

५) शिक्षणाचा केंद्रबिंदू अध्ययनार्थी आहे. शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची दिशा बदलली आहे. शिक्षण हे जीवनाभिमुख झाले आहे. शिक्षणाला मानसशास्त्रीय बैठक लाभली आहे. अभ्यासक्रमात होणाऱ्या बदलानुसार शिक्षकांनी अध्यापनात बदल करावा.

६) अध्ययन अध्यापनात तत्त्वशोधन व उपयोजनावर भर द्यावा.

७) चांगली जीवनमूल्ये अध्ययनार्थ्यांमध्ये रूजवण्याचा प्रयत्न करावा.

८) समाजीवनाशी संबंध जोडण्यासाठी शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

थोडक्यात, अध्यनार्थ्यांना विषयाचे आकलन सुलभ होण्यासाठी अध्ययन संक्रमण उपयुक्त ठरते.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न** – ४

१) अध्ययनातून संक्रमित होणारा..........घटक आहे.

अ) ज्ञान ब) तंत्र क) पद्धती ड) वरील सर्व

२) अध्ययन संक्रमणाचे ........ प्रकार आहेत.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

३) इंग्रजीतील वाक्यरचना शिकताना मराठी वाक्यरचनेचे ज्ञान अडथळा निर्माण करते हे...... अध्ययन संक्रमणाचे उदाहरण आहे.

अ) धन ब) ऋण क) शून्य ड) यापैकी नाही

४) संस्कृत विषयाचा अभ्यास मराठीच्या अभ्यासास उपयुक्त ठरतो हे ...... अध्ययन संक्रमणाचे उदाहरण आहे.

अ) धन ब) ऋण क) शून्य ड) यापैकी नाही

## ४.३ पारिभाषिक शब्द

**अध्ययन** : सभोवतालच्या वातावरणाला अनुलक्षून जाणीवपूर्वक स्वतःच्या वर्तनात घडवून आणलेले टिकाऊ स्वरूपाचे बदल होण्याची प्रक्रिया म्हणजे अध्ययन होय.

**प्रेरणा** : व्यक्तीच्या गरजा अनेक प्रकारच्या असतात. या गरजांची पूर्तता करण्यासाठी व्यक्तीला धडपड करावी लागते. व्यक्ती कित्येक गोष्टी करण्यात गुंतलेली असते. ती व्यक्ती यासाठी शरीर, शक्ती, बुद्धी, कौशल्य, सर्व ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये पणाला लावीत असते. 'व्यक्तीला आतून चालना देणारी, विशिष्ट दिशेने विशिष्ट साध्यासाठी चिकाटीने धडपड आणि अखंड प्रयत्न करायला लावणारी शक्ती म्हणजे प्रेरणा होय.'

**अवधान** : अवधान म्हणजे एखादी गोष्ट जाणून घेण्याची तीव्र इच्छा होऊन त्याकडे आपल्या जाणीवेचा ओघ वळविणे किंवा जाणीव केंद्रित करणे.

**अभिरूची** : अभिरूची म्हणजे एखाद्या बाबींविषयी वाटणारी ओढ होय.

**अभिसंधान** : अभिसंधान म्हणजे एखाद्या प्रतिक्रियेत नैसर्गिक चेतकाबरोबर कृत्रिम चेतक वापरून कृत्रिम चेतकाद्वारे तीच नैसर्गिक प्रतिक्रिया घडवून आणणे.

**मर्मदृष्टी** : एखाद्या समस्येचे किंवा परिस्थितीचे संपूर्ण व संकलित निरीक्षण केल्यावर तसेच तिचे मर्म जाणून घेतल्यावर समस्या सोडवण्याची नेमकी युक्ती सापडते म्हणजेच समस्येच्या मर्मावर आपली दृष्टी केंद्रित होते. यालाच मर्मदृष्टी असे म्हणतात.

**अध्ययन संक्रमण** : एका विशिष्ट परिस्थितीत मिळविलेले ज्ञान, संपादित केलेली कौशल्ये, तंत्र, वृत्ती, सवयी यांचा उपयोग जेव्हा दुसऱ्या परिस्थितीत आपणाला होतो. तो अनुकूल, प्रतिकूल अथवा कोणताच नाही अशा स्वरूपाचा असतो त्यास अध्ययन संक्रमण असे म्हणतात.

**धन संक्रमण** : एका परिस्थितीत केलेल्या अध्ययनाचा दुसऱ्या पद्धतीत करावयाच्या अध्ययनावर जर अनुकूल परिणाम होत असेल किंवा एका विषयाच्या अध्ययनाची दुसऱ्या विषयाच्या अध्ययनास मदत होत असेल तर अशा अध्ययन संक्रमणास धन संक्रमण असे म्हणतात.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १ ची उत्तरे**

अ) क्रो आणि क्रो　　ब) अखंडित　　क) सुखद　　ड) गरज

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २ ची उत्तरे**

अ) वरील सर्व　　ब) समायोजन　　क) वरील सर्व　　ड) तारतम्याने

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३ ची उत्तरे**

अ) थॉर्नडाईक　　ब) मांजर　　क) कुत्र्यावर　　ड) कोहलर

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ४ ची उत्तरे**

अ) वरील सर्व　　ब) तीन　　क) ऋण　　ड) धन

## ४.५ सारांश

प्रत्येक व्यक्ती जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत काही ना काही शिकत असतेच. शिकत असताना प्रत्येक वेळेस त्या व्यक्तीचा हेतू असेलच असे नाही. कधी कधी त्याचे सहज शिक्षण सुद्धा होते. आपण या प्रकरणात अध्ययनाचा अर्थ व स्वरूप, अध्ययनावर परिणाम करणारे अध्ययनार्थींशी संबंधित घटक, शिक्षकांशी संबंधित घटक, कुटुंबाशी संबंधित घटक, शाळेंशी संबंधित घटक याचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. तसेच अध्ययन का आणि कसे होते यासंबंधी मानसशास्त्रज्ञांनी मांडलेल्या प्रयत्न प्रमाद उपपत्ती, अभिजात अभिसंधान उपपत्ती व मर्मदृष्टीमूलक उपपत्तीचा अभ्यास केला आहे. अध्ययनार्थीच्या भावी जीवनात शिक्षणाचा उपयोग व्हावा असे आपण म्हणतो. यासाठी त्यास विविध विषयाचे अध्यापन केले जाते. त्या सर्व विषयाचा एकमेकांशी सहसंबंध

जोडता आला पाहिजे यासाठी अध्ययन संक्रमणाच्या धन अध्ययन संक्रमण, ऋण अध्ययन संक्रमण व शून्य अध्ययन संक्रमण याचाही अभ्यास आपण केला आहे.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

१) अध्ययनाची संकल्पना स्पष्ट करा.

२) अध्ययनाच्या विविध व्याख्या सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

३) अध्ययन म्हणजे काय? अध्ययन प्रक्रियेची वैशिष्टये विशद करा.

४) प्रयत्न प्रमाद उपपत्तीचे वर्णन करा.

५) थॉर्नडाईकने सांगितलेली अध्ययनासंबंधीचे मुख्य तीन नियम सांगून त्याचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट करा.

६) अभिजात अभिसंधनाविषयीचा पॅव्हलॉव्हचा प्रयोग स्पष्ट करा आणि त्याचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट करा.

७) मर्मदृष्टीमूलक अध्ययन उपपत्तीचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट करा.

८) अध्ययनावर परिणाम करणारे अध्ययनार्थीशी संबंधित घटक सविस्तर स्पष्ट करा.

९) अध्यापकाशी संबंधीत अध्ययनावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

१०) शाळेशी संबंधित अध्ययनावर परिणाम करणारे घटक सविस्तर विशद करा.

११) कुटुंबाशी संबंधित अध्ययनावर परिणाम करणारे घटक सविस्तर विशद करा.

१२) अध्ययन संक्रमणाचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

करंदीरकर, सु. (२००९). शैक्षणिक मानसशास्त्र. कोल्हापूर : फडके प्रकाशन

कळके, मा. शिरगावे, दा. व शेंडगे, म. (२००८). अध्ययनार्थीचे मानसशास्त्र आणि अध्यापन प्रक्रिया कोल्हापूर : फडके प्रकाशन

काणे, सं. (२००८). उत्तम अध्यापनाची रहस्ये. पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

चव्हाण, ग. (२००९). अध्ययन-अध्यापन : पारंपारिक ते आधुनिक, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

जगताप, ह. ना. (१९९२). अध्ययन उपपत्ती व अध्यापन, पुणे : नूतन प्रकाशन.

❖❖❖

## घटक १

# अध्यापनाचे शास्त्र

## (Science of Teching)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆


१.०. उद्दिष्ट

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ अध्यापनाची संकल्पना
- १.२.२ प्रभावी अध्यापनाची वैशिष्ट्ये
- १.२.३ अध्ययन अध्यापनातील सहसंबंध
- १.२.४ अध्यापनावर परिणाम करणारे घटक

१.३ पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

१.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न-उत्तरे

१.५ सरावासाठी प्रश्न

१.६ संदर्भ ग्रंथ

## १.0 उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला

१) अध्यापनाची संकल्पना सांगता येईल.

२) परिणामकारक अध्यापनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

३) अध्ययन व अध्यापनातील सहसंबंध स्पष्ट करू शकाल.

४) अध्यापनावर परिणाम करणारे घटक विशद करू शकाल.

## १.१ प्रास्ताविक

शिक्षण प्रक्रियेमध्ये अध्ययन व अध्यापन या दोन संकल्पना खूप महत्त्वाच्या आहेत. या दोन्हीही संकल्पना एकमेकींना परस्परपूरक अशा संकल्पना आहेत. या दोन्हीही संकल्पनांचा शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकास शास्त्रशुद्ध अर्थ, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील परस्परसंबंध यांची माहिती असणे गरजेचे आहे. या दोन्हीही संकल्पनांचा शास्त्रीय अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

शिक्षणप्रक्रियेत अध्ययन व अध्यापन ह्या संकल्पना खूप महत्त्वाच्या आहेत. सध्याच्या काळामध्ये अध्ययनार्थी केंद्रीत शिक्षण प्रक्रिया असल्यामुळे अध्ययनाचा विचार करणे गरजेचे आहे.

अध्ययनाची संकल्पनासुद्धा समजून घेणे गरजेचे आहे. पूर्वीच्या काळी शिक्षण पद्धती ही शिक्षककेंद्री होती. अध्यापनामध्ये केवळ शिक्षकालाच महत्त्वाचे स्थान होते. परंतु दिवसेंदिवस शिक्षकालासुद्धा काळाबरोबर बदलणे आवश्यक झाले. याचाच अर्थ अध्यापनाची संकल्पना अधिक व्यापक झाली आहे.

### १.२.१ अध्यापनाची संकल्पना (Concept of Teching) :

सर्वसाधारणपणे शाळेमध्ये एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला ज्ञान देण्याच्या प्रक्रियेला अध्यापन असे म्हटले जाते. अध्यापनाच्या काही व्याख्यांचा आढावा घेतल्यानंतर आपणास अध्यापनाची संकल्पना समजण्यास मदत होईल.

■ **अध्यापनाचा अर्थ :**

'अध्यापन' हा शब्द इंग्रजीमधील 'Teching' या शब्दासाठी वापरला जातो. इंग्रजी शब्दकोशामध्ये 'Teching' चा अर्थ 'The art assisting another to learn' असा दिला आहे. म्हणजेच एखाद्या व्यक्तीला अध्ययन करण्यास मदत करणारी कला म्हणजे अध्यापन होय.

**१) दि वर्ल्ड बुक एनसायक्लोपेडिया :**

'अध्यापन म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला ज्ञान, कौशल्य व कला संपादन करण्यास मदत करणारी प्रक्रिया होय.'

**२) दि लिटल ऑक्सफर्ड डिक्शनरी :**

'अध्यापन म्हणजे केवळ अध्ययनास मदत करणारी प्रक्रिया नसून प्रत्यक्ष ज्ञान, कौशल्य किंवा अनुदेशन देणारी तसेच अध्ययनकर्त्याला प्रेरणा देणारी अशी प्रक्रिया आहे.'

**३) शेफलर :**

'विद्यार्थ्यांचे अध्ययन व्हावे या उद्देशाने अध्यापकाने केलेल्या कृती म्हणजे अध्यापन होय.'

**४) जॅकेटॉट :**

'To teach is to Cause to learn'

**५) बर्टन :**

'अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे, मार्गदर्शन करणे, दिशा देणे आणि प्रोत्साहन देणे होय.'

अध्यापन ही एक विकासात्मक प्रक्रिया आहे. म्हणून शिक्षकांनी अध्यापन करीत असताना विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या शक्तींना चालना देऊन त्यांचा विकास करण्याव भर द्यावा. उदा. भाषा विषयाचे अध्यापन करताना वाङ्मयीन अभिरूची, सौदर्याभिरूची, रसिकता, रसग्रहणाची पात्रता निर्माण करावी. इतिहास अध्यापनात ऐतिहासिक घटना व व्यक्ती यांचा परिचय देण्याबरोबरच आपली संस्कृती, परंपरा याविषयी विद्यार्थ्यांच्या मनात अभिमान व आदर उत्पन्न करून त्यापासून स्फूर्ती, प्रेरणा घेऊन आपल्या जीवनास योग्य वळण लावण्यास शिकवावे.

**▸ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १ :**

१) अध्यापन म्हणजे ..........

अ) अध्यापनाला चालना देणे

ब) अध्यायनार्थ्याचे अध्ययन व्हावे या हेतूने अध्यापकाने केलेल्या कृती

क) अध्ययनकर्त्याला प्रेरणा देणारी प्रक्रिया

ड) वरील सर्व

२) अध्यापन ही ............. प्रक्रिया आहे.

अ) विकासात्मक ब) अविकासात्मक क) ज्ञानात्मक ड) अज्ञानात्मक

३) 'अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे, मार्गदर्शन करणे, दिशा देणे आणि प्रोत्साहन देणे होय.' अशी अध्यापनाची व्याख्या.......... यांनी केली आहे.

अ) शेफलर ब) जॅकेटॉट क) बर्टन ड) गॅरेट

४) शिक्षकाने आपल्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतून विद्यार्थ्यांचा...... घडवून आणायचा असतो.

अ) परीक्षेतील गुणात्मक विकास ब) समतोल विकास

क) फक्त भावनात्मक विकास ड) आर्थिक विकास

## १.२.२ प्रभावी अध्यापनाची वैशिष्टये (Characterstics of Effective Teching) :

कोणत्याही विषयाचे अध्यापन करताना त्या अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत, ते अध्यापन विद्यार्थ्यांच्या अंतःकरणापर्यंत जाऊन भिडावे अशी प्रत्येक शिक्षकाची धडपड असते. आपण केलेले अध्यापन प्रभावी व्हावे असे प्रत्येक शिक्षकास वाटते. म्हणून आपण याठिकाणी परिणामकारक अध्यापन म्हणजे काय? प्रभावी अध्यापनाची वैशिष्ट्ये कोणती आहेत याचा विचार करूया.

♦ **प्रभावी अध्यापन म्हणजे काय?**

'विद्यार्थ्यांचे अध्ययन गतिमान करू शकणारे अध्यापन प्रभावी अध्यापन होय.'

♦ **प्रभावी अध्यापनाची वैशिष्टये :**

प्रभावी अध्यापनाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) अध्ययनार्थ्यांना अधिकाधिक कृतिशील बनविले जाते :**

प्रभावी अध्यापनात अध्ययनकर्त्यांना अधिकाधिक कृतिशील बनविले जाते. ऐकण्याची, लिहिण्याची, उच्चाराची, पाहण्याची कृती अध्ययनार्थ्यांकडून करून घेतली जाते. अध्यापनाच्या आधारे वर्गात त्यांच्या अंगी असलेल्या गुणांना व कलांना खुलविणारे वातावरण निर्माण केले जाते. प्रश्नोत्तराच्या आणि चर्चेच्या माध्यमातून अध्ययनार्थ्यांना बोलके केले जातो. एखाद्या विषयावर चित्रे रेखाटण्यास सांगितली जातात, गाणी म्हणने, नाटयप्रवेशात भाग घेणे, भरतकाम व विणकाम करणे, हस्तव्यवसाय व विविध स्पर्धांत भाग घेणे यासारख्या विविध गोष्टीतून त्यांना कृतिप्रवण बनविले जाते.

**२) अध्यापनाच्या माध्यमातून जीवनाशी संबंध जोडला जातो :**

प्रत्येक विषयातील जो घटक अध्यापन केला जातो. त्याचा जीवनाशी संबंध जोडणे अधिक महत्त्वाचे असते. जीवन आणि शिक्षण यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक पाठ्यांशाची आणि व्यवहारात उपयोगिता याची सांगड घालण्याचा प्रयत्न ज्या अध्यापनात केला जातो. त्यास प्रभावी अध्यापन म्हणतात.

**३) अध्ययनार्थ्यांच्या पूर्वज्ञानाची दखल घेऊन केलेले अध्यापन :**

अध्ययनार्थ्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्या पूर्वज्ञानाची दखल घेऊन तसेच त्यांचे सहकार्य घेऊन केले जाणारे अध्यापन प्रभावी ठरते. प्रत्येक पाठ्यांशातून अध्ययनार्थ्यांचे पूर्वज्ञान आणि नव्या ज्ञानाचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला जातो. अध्ययनार्थ्यांची पातळी लक्षात घेऊन, त्यांना समजून घेऊन अध्यापन करणारा शिक्षक चांगले अध्यापन करू शकतो. विद्यार्थ्यांवर न चिडता केले जाणारे अध्यापन प्रभावी ठरते.

**४) चांगले संस्कार व चांगल्या वृत्तीची सहजपणे जोपासना :**

ज्या शिक्षकाचे अध्यापन प्रभावी असते ते अध्यायनार्थ्यांवर चांगले संस्कार व चांगल्या वृत्तीची जोपासना सतत करीत असतात. अध्यापन करीत असताना वर्गात लोकशाहीच्या तत्त्वांचा संस्कार केला जातो. वर्गात विद्यार्थी आपली मते स्पष्टपणे मांडू शकतात. चर्चेमध्ये मनमोकळेपणाने सहभागी होऊ शकतात. संस्कार करण्यासाठी खटाटोप न करता अध्ययनार्थ्यांवर अप्रत्यक्षपणे सहजपणे संस्कार केले जातात.

### ५) अध्ययन-अध्यापनाच्या सर्व नियम आणि तत्त्वांचा उपयोग :

प्रभावी अध्यापनात वर्गामध्ये आनंदी, प्रसन्न, उत्साही व निर्भय वातावरण असते. कोणत्याही प्रकारचे दडपण किंवा भीती अध्ययनार्थ्यांच्या मनात असत नाही. शिक्षकच आपले मित्र मार्गदर्शक आणि दिशादर्शक आहेत. याची जाणीव अध्ययनर्थ्यांच्या मनात तयार झालेली असते. प्रभावी अध्यापनात शिक्षक अध्ययनार्थ्यांना विविध मार्ग सुचवितात. विशिष्ट मार्ग स्विकारण्याचा आग्रह धरला जात नाही. तसेच स्वतःची मते विद्यार्थ्यांवर लादण्याचा प्रयत्न केला जात नाही.

### ६) अध्ययनास सक्षम बनविणारे :

शिक्षक किती शिकवितो यापेक्षा कसे शिकवितो याला अधिक महत्त्व आहे. ज्या अध्यापनातून अध्ययनार्थ्यांत चिकित्सक वृत्ती निर्माण होते ते अध्यापन अधिक परिणामकारक होय. अध्ययन उत्तम प्रकारे कसे करावे हे ज्या अध्यापनातून अध्ययनार्थ्याला समजते ते अध्यापन प्रभावी अध्यापन होय.

### ७) चिकित्सक दृष्टी विकसित करणारे :

जीवनामध्ये विविध समस्या निर्माण झाल्यानंतर त्या समस्या कश सोडवायच्या याचे मार्गदर्शन करणारे अध्यापन प्रभाव अध्यापन असते. प्रत्येक गोष्ट चिकित्सक दृष्टिकोनातून पाहण्याची सवय लागते. जीवनातील विविध गोष्टीकडे चिकित्सकपणे पाहण्याची क्षमता ज्या अध्यापनातून अध्ययनार्थ्यात निर्माण होते ते प्रभावी अध्यापन होय.

### ८) अध्यापन सूत्रांचा वापर :

विद्यार्थ्यांना विषयाचे आकलन चांगले होऊन धारणा चांगली होण्यासाठी अध्यापन सूत्रांचा वापर करणे आवश्यक आहे. ज्ञानाकडून अज्ञानाकडे, सोप्याकडून कठीणाकडे, मूर्तीकडून अमूर्तीकडे, विशेषाकडून सामान्याकडे अशी अध्यापन सूत्रांचा वापर केल्यास अध्यापन परिणामकारक ठरते.

थोडक्यात विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून अध्यापन केले पाहिजे. विद्यार्थ्यांचे वय, बुद्धिमत्ता, परिपक्वता, मानसिक कल, आवड, अभिरूची या सर्व गोष्टी जाणून घेऊन अध्यापन केल्यास ते परिणामकारक नक्कीच ठरते.

### ▸ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :

१) प्रभावी अध्यापन म्हणजे ..........होय

अ) अध्यायनार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे

ब) अध्यापनाच्या माध्यमातून जीवनाशी सहसंबंध न जोडणे

क) अध्ययनार्थीचे अध्ययन गतीमान करू शकणारे अध्यापन

ड) अध्ययनास सक्षम न बनविणारे

२) प्रभावी अध्यापनात वर्गामध्ये ............. वातावरण नसते.

अ) आनंदी ब) शांत क) प्रसन्न ड) निर्भय

३) कोणताही भाग शिकविण्यास सुरूवात करताना ...............

अ) सोप्याकडून कठीणाकडे शिकवीत जावे

ब) कठीणाकडून सोप्याकडे शिकवीत जावे

क) फक्त सोपा भाग शिकवावा

ड) सर्वात कठीणच भाग शिकवावा

४) एखादा सामान्य नियम किंवा सिद्धांत सांगून नंतर उदाहरणे देणे म्हणजे........होय.

अ) विशिष्टाकडून सामान्याकडे जाणे

ब) ज्ञाताकडून अज्ञाताकडे जाणे

क) अनिश्चिततेकडून निश्चिततेकडे जाणे

ड) सामान्याकडून विशिष्टाकडून जाणे

## १.४ अध्ययन अध्यापनातील सहसंबंध (Relation between Teaching & Learning) :

शिक्षक प्रक्रियेमध्ये अध्यय व अध्यापन हे दोन्ही घटक खूप महत्वाचे आहेत. अध्यापन हा अध्ययनास मदत करणारा घटक आहे. अध्यापन ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे एक व्यक्ती दुसऱ्या व्रूक्तीला ज्ञान व कौशल्ये संपादण्यास मदत करते. याचाच अर्थ असा आहे की, विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात एक प्रकारची आंतरक्रिया चालू असते. शिक्षण प्रक्रिया ही एकमार्गी प्रक्रिया नसून ती द्विमार्गी प्रक्रिया आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील देवाणघेवणीवर अध्यापन प्रक्रिया अधारित असते.

१) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा असतो. शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी-विद्यार्थी, शिक्षक-शिक्षक आणि शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियात्मक संबंधाला सर्वाधिक महत्त्व आहे. याचे कारण या आंतरक्रियांवर विद्यार्थ्यांची कुवत, प्रेरणा, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अशा विविध घटकांचा परिणाम होत राहतो.

२) अध्ययन-अध्यापन या प्रक्रिया एकमेकीस पूरक आहेत. तसेच या दोन्ही प्रक्रिया एकमेकीवर अवलंबून आहेत. अध्यापनातून अध्ययनार्थ्यांना अद्ययावत असे ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. अध्यापन हे अधिक गतिमान करून विद्यार्थ्यास अनुकूल आणि योग्य दिशा देता येते.

३) वर्गाध्यापन चांगले होण्यासाठी परिणामकारक अध्यापन पद्धतीचा अवलंब केल्याने विद्यार्थ्यांना विषयाचे परिपूर्ण आकलन होते. त्यांची धारणा चांगली होते. कौशल्ये सुलभरित्या आत्मसात करता येतात. आवडी-निवडी विकसित करता येतात. समस्यांची जाणीव होते. तर्क अथवा अनुमान करून जीवनातील समस्या सोडवण्याची क्षमता त्यांच्या ठिकाणी निर्माण होते.

४) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत शिक्षक व अध्ययनार्थी या दोघांचा सहभाग तितकाच महत्वाचा असतो. हा सहभाग जेवढा संतुलित असेल तेवढी अध्ययन-अध्यापन प्रक्रिया यशस्वी आणि परिणामकारक

होते. त्यांच्यातील समतोल ढळला तर अर्थातच ही प्रक्रिया प्रभावी आणि परिणामकारक होणार नाही. ही प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी अध्यापनाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करणे महत्वाचे ठरते.

५) अध्यापन हे अध्यायनास अधिक गतिमान करते. एखादया व्यक्तीला अध्ययनासाठी मदत करणारी कला म्हणजे अध्यापन होय. 'Teaching is an art of assisting another to learn.' अध्यापन ही अध्ययनास योग्य दिशा देते.

६) अध्ययनार्थ्यांत अध्ययनाची गरज ही सर्वात महत्वाची बाब आहे. एकदा अध्ययनार्थी अध्ययन करण्यास प्रवृत्त झाला की मग त्याच्या विविध क्षमता वापरण्याचे व वाढविण्याचे मार्गदर्शन अध्यापनातून व्हावयास हवे. अध्ययन ही केवळ दिशाहीन कृती असता कामा नये तर विशिष्ट उद्देश दाखविण्याचे काम अध्यापन करीत असते. अध्यनार्थ्याला अध्ययनासाठी प्रोत्साहित करणे हे अध्यापनाचे सर्वात महत्वाचे कार्य आहे.

अशा प्रकारे अध्ययन आणि अध्यापन या प्रक्रिया एकमेकीस पूरक, परस्परावलंबी आहेत. या दोन्ही प्रक्रिया शिक्षणव्यवस्थेमध्ये खूप महत्त्वाच्या आहेत.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३ :**

१) अध्ययन व अध्यापन ह्या ..........

अ) दोन परस्परविरोधी क्रिया आहेत

ब) एकमेकांशी संबंधित क्रिया आहेत

क) परस्परावलंबी क्रिया आहेत

ड) एकच क्रिया आहेत

२) अध्ययन व अध्यापनावर ............. यांचा परिणाम होतो.

अ) शारीरिक घटक  ब) सामाजिक घटक

क) परिसरीय घटक  ड) वरील सर्व

३) अध्ययन व अध्यापन ही द्विकेंद्रीत्मक क्रिया असून त्यापैकी एक केंद्र .......... व दुसरे केंद्र .......आहे.

अ) महाविद्यालय, शिक्षक  ब) महाविद्यालय, विद्यार्थी

क) प्राचार्य, अध्यापक  ड) विद्यार्थी, अध्यापक

४) अध्ययनाचे कार्य........ तर अध्यापनाचे कार्य .......करतात.

अ) विद्यार्थी, शिक्षक  ब) शिक्षक, विद्यार्थी

क) शिक्षक, शिक्षक  ड) विद्यार्थी, विद्यार्थी

## १.२.४ अध्यापनावर परिणाम करणारे घटक (Factors Affecting on Teching) ...

अध्यापन प्रक्रिया यशस्वी किंवा अयशस्वी होण्यासाठी अनेक घटक कारणीभूत ठरतात. अध्यापनावर परिणाम करणारे घटक कोणकोणते आहेत. त्याचा सविस्तर अभ्यास आपण करणार आहोत.

**१) शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व :**

अध्ययनार्थी व्यक्तिमत्त्व विकासाचे, पाठ्यविषयाच्या अध्ययनाचे, अध्ययनार्थीच्या सामाजिकीकरणाचे इ. विविध महत्त्वाची कार्ये पार पाडण्याची जबाबदारी ही शिक्षकांची असते. म्हणूनच शिक्षकांना 'भावी पिढीचे शिल्पकार' असे म्हटले जाते. शिक्षकाला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. विषयाची मांडणी सुलभ रितीने कशी करता येईल याचा विचार शिक्षकाला करावा लागतो. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या परिपक्वतेचा विचार करून स्वतःचे ज्ञान व आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे असते. तसेच अध्ययनार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला उत्तेजन व प्रेरणा देता आली पाहिजे. शिक्षकाला पाठ्यविषयाचे तर अध्यापन करावेच लागते. तसेच विद्यार्थ्यांचा पालक, जिवलग मित्र, सल्लागार, समुपदेशक, व्यक्तिमत्त्व विकासाचा मदतनीस अशा अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात.

शिक्षकाचे अध्ययनार्थीशी प्रेमळ वागणे, त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करणे, त्यांच्या अडीअडचणी समजून घेणे, त्यांच्या अध्ययनातील अडचणी सोडवणे, त्यांना भावनिक आधार देणे याचा अनुभव असा परिणाम अध्यापनावर होतो. याउलट चिडखोरपणा, अधिकार गाजविण्याची वृत्ती, असंतुष्टता, वशिलेबाजी, शिक्षा करण्याची हौस याचा विपरीत परिणाम अध्यापनावर होतो.

**२) शिक्षकाचे शारीरिक स्वास्थ्य :**

अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकाचे शारीरिक स्वास्थ्य चांगले असणे खूप महत्त्वाचे आहे. शिक्षकास जर विविध प्रकारच्या शारीरिक व्याधी असतील तर त्याचा प्रतिकूल परिणाम अध्यापनावर होतो. शिक्षकाचे आरोग्य उत्तम असेल तर ते अध्यापन चांगले करू शकतात. या उलट शिक्षकाच्या आरोग्याच्या संदर्भात जर तक्रारी असतील तर त्याचे लक्ष अध्यापनावर केंद्रित होत नाही. परिणामी परिणामकारक व प्रभावी अध्यापन करता येत नाही.

**३) शिक्षकाचे मानसिक स्वास्थ :**

शिक्षकाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जर चांगले असेल तर ते चांगल्या पद्धतीने अध्यापन करू शकतात. शिक्षकांवरतील अनेक अशैक्षणिक कामाचा बोजा असल्यामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडते त्यांना अनेक प्रकारच्या ताणतणावांना सामोरे जावे लागते. कामाच्या ठिकाणी शिक्षकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत. तसेच शिक्षकांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. शिक्षकांचे मानसिक स्वास्थ चांगले राहील यासाठी व्यवस्थापनाने विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.

**४) शिक्षकाचे व्यवसाय समाधान :**

शिक्षकाला शिक्षकी पेशामध्ये जर समाधान मिळाले तर तो चांगले अध्यापन करू शकतो. कोणत्याही व्यक्तीला आपण योग्य व्यवसाय निवडल्याने आयुष्यामध्ये समाधान मिळते. शिक्षकी पेशा हा पवित्र व्यवसाय

आहे. शिक्षकांचा संबंध हा सतत या विद्यार्थ्यांशी येत असतो. त्यामुळे शिक्षकाने सतत या व्यवसायात विद्यार्थीहित विचारात घेतले पाहिजे. काही शिक्षक या व्यवसायामध्ये आवड नसताना आलेले असतात. त्यांना अध्यापन म्हणजे कटकट असे वाटत असते. शिवाय काही शिक्षकांना कायम विनाअनुदानित शाळांवर तुटपुंज्या पगारावर काम करावे लागते. त्यांना व्यवसाय समाधान मिळत नाही. याचा अध्यापनावर परिणाम होतो.

### ५) अध्यापनासाठी सोयी सुविधांची उपलब्धता :

शिक्षकांना शाळा–महाविद्यालयामध्ये जर अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या तर ते प्रभावी अध्यापन करू शकतात. सध्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये इंटरनेट, प्रोजेक्टर, अध्ययन साहित्य, संदर्भ ग्रंथ, विविध प्रयोगशाळा, फर्निचर, संगणक प्रयोगशाळा, क्रीडांगण, बागबगीचा अशा विविध सोयी सुविधा जर उपलब्ध करून दिल्या तर त्याचा अध्यापनावर चांगला परिणाम होतो. याउलट सोयी सुविधा उपलब्ध नसतील तर त्याचा प्रतिकूल परिणाम अध्यापनावर होतो.

### ६) संस्थेची ध्येयधोरणे :

शिक्षक ज्या संस्थेमध्ये काम करतात त्या संस्थेच्या ध्येयधोरणांचा परिणाम अध्यापनावर होतो. शासनाकडून शिक्षणाच्या संदर्भात जी ध्येयधोरणे ठरविली जातात ती संस्थांना राबविणे बंधनकारक असतात. परंतु काही संस्था ही ध्येयधोरणे राबवीत नाहीत. शिक्षकांना शासकीय ध्येय धोरणानुसार वेतन देणे बंधनकारक असताना ते शिक्षकांची पिळवणूक करतात. याचा परिणाम अध्यापनावर होतो.

### ७) विद्यार्थीकेंद्रित उपक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य :

शिक्षकांना शाळांमध्ये विद्यार्थी केंद्रीत विविध उपक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य जर दिले तर त्याचा अध्यापनावर चांगला परिणाम होतो. काही शाळांमध्ये शिक्षकांना कसलेच स्वातंत्र्य दिले जात नाही. संस्थाचालक, मुख्याध्यापक सांगतीत त्या पद्धतीने उपक्रम राबविले जातात. मग ते उपक्रम विद्यार्थीकेंद्रित असतीलच असे नाही. शिक्षकांना जर उपक्रम राबविण्यास स्वातंत्र्य दिले तर शिक्षक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास चांगला होण्यासाठी विविध उपक्रम राबवितात. त्याचा अध्यापनावर परिणाम होतो.

### ८) अध्ययनार्थींचे ज्ञान :

शिक्षकास जर अध्ययनार्थीचे ज्ञान चांगले झाले तर ते त्यांच्या कलाप्रमाणे अध्यापन करू शकतात. आपल्या समोरील अध्ययनार्थींची बुद्धिमत्ता, त्यांची अभिरूची, त्यांचा कल या सर्व गोष्टींचा विचार करून अध्यापन करता येते. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून अध्यापन केले पाहिजे. अध्यापन प्रक्रियेमध्ये विद्यार्थी सहभाग वाढवणे खूप महत्त्वाचे असते. याचा अनुकूल परिणाम अध्यापनावर होतो.

### ९) मैत्रीपूर्ण वातावरण व संबंध :

वर्गामध्ये व वर्गाबाहेर शिक्षक व विद्यार्थी यांच्याम मैत्रीपूर्ण वातावरण व संबंध असणे खूप महत्त्वाचे आहे. ज्ञानरचनावाद, सहकार्यात्मक अध्ययन, क्रमन्वित अध्ययन, बुद्धिमंथन, पर्यवेक्षित अध्ययन यामध्ये विद्यार्थ्यांना अध्ययनास पोषक वातावरण निर्माण करून दिले जाते. आपोआप विद्यार्थ्यांचे अध्ययन गतिमान होते. या सर्व गोष्टीचा अध्यापनावर परिणाम होतो.

**१०) अध्ययनास पोषक वातावरण :**

खरं तर सध्याच्या काळात शिक्षकाने विद्यार्थ्यांना अध्ययनास पोषक वातावरण निर्माण करून देणे खूप महत्त्वाचे आहे. ज्ञानरचनावाद, सहकार्यात्मक अध्ययन, क्रमन्वित अध्ययन, बुद्धिमंथन, पर्यवेक्षित अध्ययन यामध्ये विद्यार्थ्यांना अध्ययनास पोषक वातावरण निर्माण करून दिले जाते. आपोआप विद्यार्थ्यांचे अध्ययन गतिमान होते. या सर्व गोष्टीचा अध्यापनावर परिणाम होतो.

**११) शिस्त :**

वर्गामध्ये जर शिस्तप्रिय वातावरण असेल तर विद्यार्थ्यांचे अध्यापन चांगले होते. शिस्त याचा अर्थ याठिकाणी वर्गामध्ये एकदमच शांतता पाहिजे असा नाही. तर विद्यार्थ्यांमध्ये 'स्वयंशिस्त' असणे खूप महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांना स्वतःस शिस्तीचे महत्त्व पटलेले असले पाहिजे. तरच ते शिस्तबद्ध वर्तन करतील व त्याचा अध्यापनावर चांगला परिणाम होईल.

**१२) शिक्षकाचे विषयज्ञान व व्यासंग :**

शिक्षक ज्या विषयाचे अध्यापन करणार आहे. त्या विषयाचे अद्ययावत विषयज्ञान त्यांच्याजवळ असणे गरजेचे आहे. काळानुसार त्या त्या विषयात कोणते बदल झाले आहेत? कोणकोणत्या नवीन संकल्पना आपल्या विषयात आल्या आहेत? मूल्यमापनात काय बदल झाले आहेत का? या सर्वांची सविस्तर माहिती शिक्षकास असावयास हवी. एवढेच नव्हे तर इतर विषयात सुद्धा कोणते बदल झालेत हे सुद्धा शिक्षकास माहित असणे गरजेचे आहे. याचा परिणाम अध्यापनावर चांगला होतो.

शिक्षक कोणता विषय शिकवितात त्यानुसार त्या विषयाची परिपूर्ण माहिती असावयास हवी. परीक्षेसाठी केलेला अभ्यास हा अध्यापन करण्याच्या दृष्टिने अपुरा ठरतो. आपल्या विषयाच्या बाबतीत सतत नवनवीन जाणून घेण्याचा प्रयत्न शिक्षकाने केला पाहिजे. ज्ञान हे कणाकणाने सतत मिळवीत राहिले पाहिजे. शिक्षकाचा व्यासंग जर गाढा असेल तर ते विद्यार्थ्यांना परिणामकारक अध्यापन करू शकणार आहेत. आपल्या विषयाबद्दल शिक्षकाच्या मनात अभिरूची निर्माण झाली पाहिजे. अभिरूचीला अभ्यासाची जोड मिळाली. की तिचे व्यासंगात रूपांतर होण्यास वेळ लागत नाही. व्यासंगात रूपांतर होण्यास वेळ लागत नाही. व्यासंग असेल तर शिक्षक नवनवीन अभ्यासण्याचा प्रयत्न करतात व याचा परिणाम अध्यापनावर होतो.

थोडक्यात, शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व, शिक्षकाचे शारीरिक व मानसिक स्वास्थ, शिक्षकाचे व्यवसाय समाधान, अध्यापनासाठी सोयी सुविधांची उपलब्धता, संस्थेची ध्येयधोरणे, विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबविण्याचे स्वातंत्र्य, अध्ययनार्थीचे ज्ञान, मैत्रीपूर्ण वातावरण व संबंध, शिस्त, शिक्षकाचे विषयज्ञान व व्यासंग या सर्व घटकांचा अध्यापनावर परिणाम होतो.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४ :**

१) खालीलपैकी .......... या घटकाचा अनुकूल परिणाम अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनावर होतो.

अ) वशिलेबाजी ब) चिडखोरपणा

क) असंतुष्टता ड) भावनिक आधार देणे

२) खालीलपैकी ........ या घटकाचा प्रतिकूल परिणाम अध्ययनार्थ्यांच्या अध्ययनावर होतो.

अ) अध्ययनार्थींशी प्रेमळ वागणे    ब) अधिकार गाजविणे

क) अध्ययनार्थींना अडीअडचणी समजून घेणे    ड) अध्ययनार्थींना भावनिक आधार देणे

३) शिक्षकाचे .......... चांगले असेल तर अध्यापन परिणामकारक होते.

अ) शारीरिक स्वास्थ    ब) मानसिक स्वास्थ

क) व्यवसाय समाधान    ड) वरील सर्व

४) शिक्षकाला पाठ्यविषयाच्या अध्यापनाबरोबर ....... भूमिका पार पाडावी लागते.

अ) विद्यार्थ्यांचा पालक    ब) विद्यार्थ्यांचा जिवलग मित्र

क) विद्यार्थ्यांचा सल्लागार    ड) वरील सर्व

## १.३ पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या

१ **अध्यापन** : 'अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे, मार्गदर्शन करणे, दिशा देणे आणि प्रोत्साहन देणे होय.'

२ **प्रभावी अध्यापन** : 'विद्यार्थ्यांचे अध्ययन गतिमान करू शकणारे अध्यापन म्हणजे प्रभावी अध्यापन होय.'

## १.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – उत्तरे

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – १**

१) ड    २) अ    ३) क    ४) ब

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – २**

१) क    २) ब    ३) अ    ४) ब

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ३**

१) क    २) ड    ३) ड    ४) अ

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ४**

१) ड    २) ब    ३) ड    ४) ड

## १.५ सरावासाठी प्रश्न

१) अध्यापनाच्या विविध व्याख्या सांगा.

२) अध्यापनाची संकल्पना स्पष्ट करा.

३) परिणामकारक अध्यापनातील वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) अध्ययन व अध्यापनातील सहसंबंध स्पष्ट करा.

५) अध्यापनावर परिणाम करणारे विविध घटक सविस्तर विशद करा.

## १.६ संदर्भ ग्रंथ :


करंदीकर, सुरेश (२००९). शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

कळके, माधवी, शिरगावे, दादासाहेब व शेंडगे, मधुकर (२००८). अध्ययनार्थीचे मानसशास्त्र आणि अध्यायन प्रक्रिया. कोल्हापूर : फडके प्रकाशन.

काणे, संध्या (२००८). उत्तम अध्यापनाची रहस्ये पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

चव्हाण, गणेश (२००९). अध्ययन-अध्यापन : पारंपारिक ते आधुनिक. पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

जगताप, ह. ना. (१९९२). अध्ययन उपपत्ती व अध्यापन. पुणे : नूतन प्रकाशन.


❖❖❖

## घटक – २

# अध्यापन पद्धती

## (Teching Methods)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆


२.०. उद्दिष्ट

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

 २.२.१ अध्यापन पध्दती

 २.२.२ व्याख्यान पध्दती

  २.२.२.१ व्याख्यान पध्दतीचे फायदे

  २.२.२.२ व्याख्यान पध्दतीच्या मर्यादा

  २.२.२.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

 २.२.३. दिग्दर्शन पध्दती

  २.२.३.१ दिग्दर्शन पध्दतीचे फायदे

  २.२.३.२ दिग्दर्शन पध्दतीच्या मर्यादा

  २.२.३.३ दिग्दर्शन करताना शिक्षकाने घ्यावयाची काळजी

  २.२.३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

 २.२.४ समस्या निराकरण पध्दती

  २.२.४.१ समस्या निराकरण पध्दतीचे फायदे

  २.२.४.२ समस्या निराकरण पध्दतीच्या मर्यादा

  २.२.४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

 २.२.५ गोष्ट अध्यापन पध्दती

  २.२.५.१ गोष्ट अध्यापन पध्दतीचे फायदे

  २.२.५.२ गोष्ट अध्यापन पध्दतीच्या मर्यादा

  २.२.५.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## २.० उद्दिष्टे:

या घटकाचे अभ्यासानंतर आपणास -

- अधयपन पध्दतीचा अर्थ, त्याचे घटक व वर्गीकरणाची माहिती सांगता येईल.
- विविध अध्यापन पद्धतींचे वर्गीकरण करता येईल.
- व्याख्यान पद्धती, दिग्दर्शन पध्दती, समस्या निराकरण पध्दती, गोष्ट पध्दती इ. चा अर्थ सांगता येईल.
- व्याख्यान पद्धती, दिग्दर्शन पध्दती, समस्या निराकरण पध्दती, गोष्ट पध्दती इ. चे नियोजन आणि त्याची कार्यवाही सांगता येईल,
- व्याख्यान पद्धती, दिग्दर्शन पध्दती, समस्या निराकरण पध्दती, गोष्ट पध्दती इ. अध्यापन पध्दतीचे फायदे तोटे सांगता येतील.

## २.१ प्रास्ताविक :

मागील घटकामध्ये आपण 'अध्यापनाचे शास्त्र' समजून घेतले. तसेच अध्यापन आणि अध्ययन यातील संबंध, अध्यापनावर परिणाम करणारे घटक, इ. ची माहिती आपण जाणून घेतली. तर सद्य: घटकामध्ये आपण अध्यापन पद्धती, अध्यापन पध्दतींचे घटक, अध्यापन पध्दतींचे वर्गीकरण इ. ची माहिती घेणार आहोत. तसेच व्याख्यान पद्धती, दिग्दर्शन पध्दती, समस्या निराकरण पध्दती, गोष्ट पध्दती इ. अध्यापन पध्दतींचा अर्थ, त्याचे नियोजन, कार्यवाही, या अध्यापन पध्दतीचे फायदे-तोटे समजून घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ अध्यापन पध्दती :

अनुदेशनाची उद्दिष्टे गाठण्यासाठी, नियोजित अभ्यासक्रमाचे सुव्यवस्थितपणे अध्यापन करणे आवश्यक असते यासाठी परिणामकारकरित्या अध्यापन पध्दतीचा वापर करावा.

आता आपल्या मनामध्ये अध्यापन पध्दती म्हणजे नेमके काय ? हा प्रश्न उद्भवतो. त्याचे उत्तर एकदम सोपे आहे. ते म्हणजे अध्यापन पध्दती म्हणजे अध्यापकाने वापरलेली प्रक्रिया ज्याद्वारे अध्ययनाबाबतची ध्येये गाठता येणे सहज शक्य होते व त्यांच्या सहाय्याने अध्ययन हे अधिक सोपे व परिणामकारक होते.

अध्यापन पद्धती ही अध्ययनार्थीचे अध्ययन व्हावे म्हणून अध्ययनार्थीच्या गटाचे नियोजन, देवाण-घेवाण अध्ययनाचे मूल्यमापन इ. शी संबंधित प्रक्रिया होय.

प्रत्येक अध्यापन पध्दतीमध्ये पुढील दोन पायऱ्या दिसून येतात.

आकृती क्रमांक १ : अध्यापन पध्दतीमध्ये समाविष्ट घटक

**अध्यापन पध्दती**

अ) अध्ययन घटकांची निवड आणि श्रेणी

ब) यांच्या अध्यापनासाठी तंत्र आणि प्रक्रियेचा वापर करणे

पुढील पायर्यांच्या आधारावर आपण अध्यापन आशयाला अनुसरून अध्यापन पध्दतीची निवड करू शकतो.

अध्यापन पध्दतीच्या पायऱ्या

१. कोणत्या आशयाचे अध्यापन करायचे आहे ?

२. कोणती तंत्र किंवा साधने वापरणे आवश्यक आहे ?

काही अध्यापन पध्दती मानसशास्त्रीयदृष्ट्या अध्ययनार्थीची अध्ययनासंबंधी अभिरुची वाढविण्यास सक्षम असतात तर काही कमी परिणामकारक असतात. कारण त्या पध्दतीमध्ये अध्ययनार्थ्यांच्या सहभागाला कमी प्रमाणात वाव असतो.

चांगल्या अध्यापन पध्दतीची तीन गुणवैशिष्ट्ये आपणास सांगता येतील. अध्ययनार्थ्यांच्या संबंधी तयारी, कृती आणि समाधान. अध्यापन पध्दतींच्या साहाय्याने अधिक प्रमाणात कौशल्ये विकसित होण्यास अध्ययनार्थ्यास साहाय्य होते.

**अध्यापन पध्दती**

- विषय वस्तूचे व्यवस्थितरित्या सादरीकरण/प्रतिपादन व्हावे याकडे अधिक प्रमाणात लक्ष देण्यात येते.
- अध्यापन पध्दतीमध्ये वापरण्यात आलेल्या पायऱ्या ह्या ताठर आणि आधीच ठरविलेल्या असतात.
- एखाद्या आशयाचे परिणामकारकरित्या सादरीकरण / प्रतिपादन
- विषय वस्तूच्या स्वरुपावरुन अध्यापन। पध्दतीची निवड
- संपादन चाचणीच्या साहाय्याने विषय वस्तू वरील प्रभुत्व म्हणजे अध्यापनाच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन
- अध्यापनाच्या तंत्राचा आणि पूरक साहित्याचा अध्यापनासाठी परिणामकारकता वाढविण्यासाठी वापर

अध्यापनाची परिणामकारकरित्या उद्दिष्टे गाठण्याकरिता अध्यापक प्रयत्नशील असतो. त्यामुळे अध्यापक विविध अध्यापन पध्दतींचा वापर हा अध्ययन परिस्थितीस अनुकूल असतील अशा पष्टतींचा वापर करतो. ढोबळमानाने या अध्यापन पध्दतीचे दोन भागात वर्गीकरण करण्यात येते. ते म्हणजे एकाधिकारशाही अध्यापन पद्धती (शिक्षक केंद्रित अध्यापन पध्दती) आणि लोकाधिकारशाही अध्यापन पध्दती (विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धती).

**अध्यापन पध्दतीचे कर्गीकरण**

**१. एकाधिकारशाही अध्यापन पध्दती**

१. व्याख्यान पध्दती

२. दिग्दर्शन पध्दती

३. स्वाध्याय पध्दती

४. कथन/गोष्ट पध्दती

५. वर्णनात्मक पध्दती

६. स्पष्टीकरण पध्दती

७. सोदाहरण स्पष्टीकरण पध्दती

८. क्रमान्वित अध्यापन पध्दती

९. भूमिका-पालन पध्दती

**२. लोकाधिकारशाही अध्यापन पध्दती**

१. गटचर्चा पध्दती

२. प्रश्नोत्तर पध्दती

३. शोध पध्दती

४. समस्या निराकरण पध्दती

५. प्रकल्प पध्दती

६. स्वतंत्रपणे अध्ययन पध्दती

७. गृहपाठ पध्दती

८. सराव पध्दती

९. क्षेत्रीय भेटी पध्दती

या अध्यापन पध्दतीच्या वर्गीकरणावरुन आता आपणाला विविध अध्यापन पध्दतींची नांवे माहिती झाली आहेत. त्याचे ढोबळमानाने दोन प्रकार माहिती झाले आहेत. या वरील अध्यापन पध्दतीपैकी सध्या आपणाला चार अध्यापन पध्दतींचा अभ्यास या घटकांमध्ये करायचा आहे त्या अध्यापन पध्दती म्हणजे व्याख्यान पध्दती, दिग्दर्शन पध्दती, गोष्ट / कथन पध्दती इ. या तीन अध्यापन पध्दती एकाधिकारशाही / हुकुमशाही अध्यापन पध्दती प्रकारात मोडतात तर समस्या - निराकरण पध्दती ही लोकाधिकार शाही या अध्यापन पध्धती मध्ये त्याचा समावेश होती. अशा या चार अध्यापन पध्दतीची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

## २.२.२ व्याख्यान पध्दती :

व्याख्यान पध्दतीमध्ये सादरीकरण करावयाच्या घटकाचे 'सविस्तर' आणि 'सुस्पष्ट' विवेचन करण्यात येते. ते विवेचन सुस्पष्ट, सरळ व द्रक-श्राव्य साधने आणि फलक (काळा/पांढरा) लेखन यांच्या सहाय्याने करण्यात येते.

**व्याख्यान पध्दतीची गुणवैशिष्ट्ये**

१. शाब्दिक संप्रेषण

२. एकच शिक्षक

३. एकमार्गी आंतरक्रिया

४. विद्यार्थी संख्या अधिक

अशा पध्दतीने व्याख्यान पध्दती ही आंतरक्रियात्मक नसलेली आपणास दिसून येते. तसेच या त्याच्या मर्यादा देखील आहेत. व्याख्यान पध्दतीमध्ये आंतरक्रिया आपणा व्यवस्थित नियोजन करुन व अध्यापन वेळेचे नियोजन करून करता येणे शक्य आहे.

**व्याख्यान पध्दतीचा हेतू :**

पुढील हेतू हे व्याख्यान पध्दती वापरण्यापाठीमागे असलेले आपणास दिसून येतात.

व्याख्यान पध्दती वापरण्यामागील हेतू

१. वस्तुस्थितीबद्दल माहिती देणे

२. सारांश रूपाने माहिती मांडणे

३. अभ्यासक्रमाशी संबंधित साहित्याची अध्ययनार्थीस ओळख करून देणे

४. नवीन माहिती थोडक्यात सादरीकरण

५. संकल्पना आणि तत्वांचे स्पष्टीकरण करणे

अशा या व्याख्यान पध्दतीवर प्रभुत्व काहीशा अनुभवानंतर प्राप्त होऊ शकते. काही नवीन अध्यापकांना व्याख्यान देण्यापूर्वी त्याचे नियोजन करण्याकरिता अधिक वेळ खर्च करावा लागतो. अनियोजित व्याख्याने ही कमी प्रमाणात परिणामकारक व अपुरी असतात. अनुभव असलेल्या अध्यापकांना देखील अध्यापनाचे नियोजन करावे लागते. पण त्यासाठी त्यांना लागणारा कालावधी हा नवीन अध्यापकांच्या मानाने कमी असतो.

**परिणामकारक व्याख्यानाचे नियोजन :**

खालीस पायन्यांचा समावेश परिणामकारक व्याख्यान पद्धतींमध्ये होतो.

व्याख्यान नियोजनाच्या पायन्या

१. अनुदेशनीय उद्दिष्टांमध्ये घटकांचे रूपांतर करणे

२. अध्यापनाच्या मुद्यांची आणि अध्ययन कार्यकृतींची तयारी करणे

३. माध्यमाची आणि साहित्याची निवड

४. प्रेरणा आणि प्रेरणा देण्याच्या तंत्राचे नियोजन करणे

५. प्रश्न विचारण्याचे नियोजन करणे आणि प्रत्याभरण देणे

६. मूल्यमापन आणि मूल्यांकनाचे नियोजन करणे.

वरील पायऱ्यांचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे :

**१. अनुदेशनीय उद्दिष्टांमध्ये घटकाचे रुपांतर करणे :**

यामुळे व्याख्यानाच्या अंतिम टप्प्यानंतर अध्ययनार्थी काय करु शकतात. याचा निर्देश होतो. तसेचं अध्ययनार्थींची अभिवृत्ती, त्यांची कौशल्ये किंवा अध्यापन कलेशी संबंधित त्याचे ज्ञान वाढते.

**२. अध्यापनाच्या मुद्यांची आणि अध्ययन कार्यकृतींची तयारी करणे :**

या पायरीवर व्याख्यानामध्ये समाविष्ट करण्यात येणारे मुख्य मुद्दे हे तार्किकदृष्ट्या योग्य पद्धतीने व कमीत कमी वाक्यांमध्ये लिहून काढण्यात येतात. अध्ययन कृतींची योग्य निवड होणे आवश्यक असते. त्यामुळे अध्ययनार्थी अधिक अध्ययन कृतीमध्ये गुंतला जाऊ शकेल व अध्ययनार्थींची निष्क्रियता कमी करु शकेल.

**३. माध्यमांची आणि साहित्यांची निवड :**

अध्ययन अध्यापनाची परिणामकारकता वाढविण्यासाठी अध्यापकाने योग्य दृक-श्राव्य साहित्याची निवड करणे आवश्यक आहे. उदा. उध्र्ध्व शीर्ष प्रक्षेपक पारदर्शिका, पॉवर पॉईन्ट सादरीकरण, प्रतिकृती, तक्ते, आकृत्या इ. ज्यामुळे अध्ययनाच्यांना एखाद्या विषयाचे सहज आकलन होऊ शकेल. तसेच फलक लेखनासाठी लागणाऱ्या कालावधीचा देखील बचत होते.

**४. प्रेरणा आणि प्रेरणा देण्याच्या तंत्राचे नियोजन करणे:**

बऱ्याचवेळा अध्यापक अध्ययनार्थ्यांच्या अभिरुचीचा विचार न करताच अध्यापन करतो. अशा अध्ययनार्थ्यांचे अध्ययनाकडे दुर्लक्ष होण्याचीच जास्त शक्यता असते. जर अध्ययनार्थ्यांना एखाद्या घटकाच्या अध्ययनाची उपयुक्तता समजली तर ते स्वतःहून अध्ययनामध्ये अधिक अभिरुची घेतात.

म्हणूनच अध्यापकाने विषय वस्तूंचे सादरीकरण अध्ययनार्थीस अधिक अभिरुचीपूर्ण होईल अशा पद्धतीने करणे आवश्यक आहे. तसेच अध्यापकाने व्याख्यान अधिक श्रवणीय व कृतीशील व्हावे याकरीता प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सकारात्मक पद्धतीने दिलेले प्रत्याभरण आणि प्रेरणा अध्ययनाधींचे अवधान निर्माण करुन टिकवून ठेवू शकते. अध्ययनार्थीचे अध्ययन व्हावे याकरीता अध्यापकाने त्वरित प्रत्याभरण द्यावे. त्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया अधिक बळकट होऊ शकेल.

**५. प्रश्न विचारण्याचे कौशल्य आणि प्रत्याभरण देणे :**

बरेच शिक्षक आपण सांगितलेला मुद्दा परत एकदा सांगण्याबद्दल अध्ययनार्थीस प्रश्न विचारतात. अशाप्रकारचे प्रश्न हे निम्न दर्जाचे असतात. हे प्रश्न विद्यार्थ्यांमध्ये कोणत्याही प्रकारे विचार करण्याची, विश्लेषण करण्याची, निर्णय घेण्याची क्षमता विकसित करीत नाहीत. तसेच हे प्रश्न एखाद्या अध्ययनार्थ्यापुरते सीमीत असतात. ते इतरांना कृतीशील बनवण्याकरीता उपयुक्त ठरत नाहीत. ते उपयुक्त ठरावेत म्हणून विचार प्रक्रियेला चालना देणारे प्रश्न विचारावेत व त्याची उत्तरे वर्गभर विखुरलेल्या अध्ययनार्थ्यांकडून घ्यावीत. वर्गाध्यापनातील अनुदेशनामध्ये विद्यार्थ्यांच्या उत्तर देण्याच्या प्रक्रियेला सामोरे जाणे ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. कोणत्याही प्रकारे

विद्यार्थ्याचे जरी उत्तर चुकले तरी त्याला नाराज करता कामा नये. जर विद्यार्थ्यांचे उत्तर चुकले असले तर अध्ययनार्थ्यांचे उत्तर का चुकले आहे, याचे स्पष्टीकरण अध्यापकाने देणे आवश्यक आहे, त्याचबरोबर बरोबर उत्तर स्पष्ट केले पाहिजे.

६. मूल्यनिर्धारण आणि मूल्यमापन यांचे नियोजन

अध्ययनासंबंधित उद्दिष्टांची कितपत पूर्तता केली आहे हे पाहण्यासाठी मूल्यनिर्धारण आणि मूल्यमापन याच नियोजन करणे आवश्यक असते. घटकाचे अध्यापन केल्यानंतर वस्तुनिष्ठ प्रश्न अथवा थोडक्यात उत्तरे लिहिण्याविषयी मूल्यमापन साधन तयार करणे आवश्यक ठरते.

### २.२.२.१ व्याख्यान पद्धतीचे फायदे :

या पद्धतीचे फायदे पुढीलप्रमाणे –

**१. कमीत कमी स्त्रोतांची आवश्यकता :**

औपचारिक शिक्षण पद्धतीसाठी हा सर्वात स्वस्त पर्याय आहे. एकाच वेळी विविध साधनांशिवाय अध्यापन करण्यास उपयुक्त ठरते.

**२. विद्यार्थ्यांच्या गरजाप्रमाणे लवचिक :**

अध्ययन अध्यापन संबंधित वातावरण, वेळेची मर्यादा, तिच्या गरजा, अभिरुची, अभिवृत्ती इ. बाबींना अनुसरून अध्यापन पद्धती वापरता येते.

**३. वेळेची बचत :**

वर्ग वेळेमध्ये व उराविक कालावधी मध्ये एकच अध्यापक अध्यापनाचे काम करू शकतो. तसेच मोठ्या प्रमाणात आशयाचे व अभ्यासक्रमाच्या विविध पैलूचे सादरीकरण करता येणे शक्य होते.

**४. प्रेरणा देणे :**

व्याख्यान पद्धतीमुळे प्रेरणा, उत्साह टिकून राहण्यास मदत होते. विद्यार्थी लक्षपूर्वक ऐकतात. यामुळे अध्ययनार्थीकडून अध्यापकाला अध्यापनासंबंधित प्रोत्साहन मिळते.

**५. भावात्मक विकासासाठी उपयुक्त :**

वैयक्तिक आणि भावनिकरित्या अध्यापन पद्धती उपयुक्त ठरते. व्याख्यान पद्धती ही वेगळ्या पद्धतीने अध्ययनार्थ्यांना प्रभावित करते.

### २.२.२.२ व्याख्यान पद्धतीच्या मर्यादा :

व्याख्यान पद्धतीच्या मर्थांदा पुढीलप्रमाणे –

**१) आशयकेंद्रित :**

आशयाच्या किंवा विषय वस्तूच्या भोवती आधारलेली असते. विषय वस्तूचे सादरीकरण हेच महत्त्वाचे असते. उद्दिष्टांच्या पूर्तीकडे आवश्यक तेवढे लक्ष देण्यात येत नाही. शिक्षक जास्तीत जास्त अध्ययनार्थीला फक्त

माहिती देतील याच्याकडेच अधिक लक्ष देतात.

### २) एकमार्गी प्रक्रिया :

व्याख्यान पद्धतीमध्ये अध्ययन अध्यापनप्रक्रिया ही एकमार्गी होते. येथे अध्यापक बोलतात आणि अध्ययनार्थी त्यांच्या अभिवृत्ती, अभिरुचीशिवाय ऐकतात. अशाप्रकारे या अध्यापन पद्धतीमध्ये अध्ययनार्थी क्रियाशील नसतात.

### ३) विद्यार्थ्यांच्या अभिरुचीच्या विचारांचा अभाव :

व्याख्यान पद्धती ही अध्ययनार्थ्यांच्या अभिरुची, गरजा आणि क्षमतांचा विचार करीत नाही. विषयवस्तू ही विद्यार्थ्यांपेक्षा अधिक महत्त्वाची बाटते. अध्यापक शाब्दिकरित्या अधिक संप्रेषण साधतात.

### ४) खालच्या वर्गासाठी उपयुक्त नाही :

शाब्दिक संप्रेषण हे तितक्याच गतीने अध्ययनार्थ्यांनि आकलन करून घेणे अवघड जाते. खालच्या स्तरातील अध्ययनार्थी हे इतकी मनाची एकाग्रता करु शकत नाही. परिणामी ती पद्धती परिणामकारक ठरत नाही.

### ५) उच्च बोधात्मक उद्दिष्टे गाठण्यास उपयुक्त नाही :

निरीक्षणातून भेदाभेदन करण्याची क्षमता, नवनिर्मायक क्षमता, समस्या निराकरण क्षमता इ. बाबी अध्ययनार्थ्यामध्ये विकसित करण्यात सदर अध्यापन पद्धती फारशी उपयुक्त ठरत नाही.

### २.२.२.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१) अध्यापन पद्धतीचे ढोबळ मानाने कोणते दोन प्रकार पडतात ?

२) अध्यापन पद्धती म्हणजे काय ?

३) अध्यापन पद्धती कशी निवडतात ?

४) व्याख्यान या अध्यापन पद्धतीचे हेतू कोणते ?

तर मग आता, तुम्ही अध्यापन पद्धती, व्याख्यान पद्धती इ. संकल्पनांशी चांगल्याच प्रकारे अवगत झाली आहेत. आता आपणाला माहिती घ्यायची आहे. ती म्हणजे दिग्दर्शन पद्धतीबाबत.

## २.२.३ दिग्दर्शन पद्धती :

दिग्दर्शन पद्धतीमध्ये दाखविणे, स्पष्टीकरण करणे, विद्यार्थ्यांना कृतीमध्ये सामावून घेणे, त्यांना प्रश्नोत्तरे विचारणे इ. चा समावेश होतो. ही पद्धती शाब्दिक स्पष्टीकरण आणि प्रात्यक्षिक यामध्ये दुवा जोडते. दिग्दर्शन पदतीचे नियोजन अध्ययनार्थीस संकल्पना, तत्त्वे आणि प्रक्रिया समजावून सांगण्याकरिता उपयुक्त ठरते. दिग्दर्शन पद्धती ही व्याख्यान पद्धतीचा देखील भाग असू शकते. बहुतेक या अध्यापन पद्धतीचा वापर हा सर्व शालेय अभ्यासक्रमातीत विविध विषय तसेच, कार्यानुभवासाठी उदा. विविध कला, संगीत, नृत्य, खेळ आणि इतर सहशालेय कृतीसठी उपयुक्त ठरतो. उदा. भाषा शिक्षणात, लज्जा, राग, क्रोध, भीती, हृदय, दुःख, इ. भावना

प्रगट करण्यासाठी उपयुक्त ठरते.

सामाजिक शास्त्रामध्ये देखील दिग्दर्शन पद्धतीचा. अध्यापनासाठी वापर करता येतो. उदा. नागरिकशास्त्राच्या अध्यापनात प्रतिनिधी निवडण्याच्या प्रक्रियेचे दिग्दर्शन करता येते. इतिहास विषयाच्या अध्यापनात विविध कालातील संस्कृतीचे कपडे, दागिने आणि इतर वस्तू इ. भूगोलाच्या अध्यापनात विश्व, पृथ्वी, विविध ग्रह, तारे, इ. की स्थिती त्याचे स्थान समजण्यासाठी दिग्दर्शन पद्धती उपयुक्त ठरते. तर भूमितीच्या अध्यापनासाठी देखील दिग्दर्शन पद्धती उपयुक्त ठरते. तर विज्ञान विषय शिकवण्यासाठी ही अध्यापन पद्धती अत्यंत उपयुक्त असलेली दिसून येते. विज्ञानातील विविध कृती व प्रात्यक्षिके ही यशस्वीपणे सादरीकरण करता येऊ शकतात. उदा. पाण्याचा पंप, डिझेल, पेट्रोल पंपाची कार्यपद्धती, मानवी डोळा, हृदय इ.

**परिणामकारक दिग्दर्शन पद्धतीचे नियोजन :**

परिणामकारक अध्ययनासाठी दिग्दर्शन पद्धतींचे नियोजन करणे आवश्यक आहे. ज्यामुळे शेवटच्या क्षणी विद्यार्थ्यासमोर होणारा गौंधळ टाळता येऊ शकेल. यासाठी पुढील पायऱ्यांच्या सहाय्याने दिग्दर्शन पद्धतीचे नियोजन करता येऊ शकेल.

दिग्दर्शन पद्धती नियोजनाच्या पायऱ्या

१. संकल्पनेचे आकलन व्यवस्थित करणे.

२. अगदी थोडक्यात संकल्पना किंवा तत्वांचा सारांश लिहिणे

३. दिग्दर्शनामध्ये वापरण्यात येणाऱ्या पायऱ्यांची यादी करणे.

४. ज्या मुद्यांवर अध्यापनात भर द्यायचा आहे, अशा मुद्यांची यादी करणे

५. दिग्दर्शन कसे करावयाचे आहे त्याचे नियोजन करणे

६. संकल्पना आकलन पडताळण्याबाबत विचारायच्या प्रश्नांचे नियोजन करणे,

७. सादरीकरणाचा सराव करणे.

## २.२.३.१ दिग्दर्शन पद्धतीचे फायदे

१. **भौतिक आणि जीवशास्त्रीय विषयाच्या अध्यापनासाठी उपयुक्त :** भौतिक आणि जीवशास्त्रविषयक विज्ञानाच्या संकल्पना, तत्त्वे, वस्तुस्थितीदर्शक बाबी समजण्यासाठी दिग्दर्शन पद्धती उपयुक्त ठरते.

२. **ठरविलेली उद्दिष्टे गाठण्यासाठी उपयुक्त :** वस्तु, साधने आणि कृतींचे नियोजन करुन अध्यापनाची ठरविलेली उद्दिष्ट गाठता येतात.

३. **विद्यार्थ्यांचा कृतीशील सहभाग :** अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे विद्यार्थी कृतीशील सहभागी बनतात. चांगले निरीक्षक, योग्य तार्किक क्षमता असणारे, गहन विचार करणारे आणि सृजनशील विचार करणारे देखील बनतात.

४. **शालेय अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या अध्यापनासाठी उपयुक्त :** दिग्दर्शन पद्धती ही अभ्यासक्रमातील जवळजवळ सर्व विषयांचे अध्यापन करण्यास उपयुक्त ठरते. तसेच अभ्यासपूरक कार्यक्रमांसाठी म्हणजेच संगीत, खेळ आणि इतर कला, तसेच छंद इ. साठी ही अध्यापन पद्धती उपयुक्त ठरते.

५. **वेळेची बचत करुन प्रेरणा देण्यास उपयुक्त :** दिग्दर्शन पद्धती ही शिक्षकाला त्याचे कार्य पूर्ण करण्यास मदत करते. अध्यापकाला कमीत कमी वेळात अध्यापन करण्यासाठी ही अध्यापन पद्धती उपयुक्त ठरते. आवश्यक असा उत्साह विद्यार्थ्यांमध्ये आणण्यास उपयुक्त ठरते.

### २.२.३.२ दिग्दर्शन पद्धतीच्या मर्यादा :

दिग्दर्शन पद्धतीच्या खालील मर्यादा आहेत.

**१) कौशल्यांनी व क्षमतांनी परिपूर्ण अशा अध्यापकाची आवश्यकता: –**

दिग्दर्शन पद्धती व्यवहारात राबविण्याकरीता सक्षम अध्यापकाची आवश्यकता असते. तसेच त्याला संकल्पना आणि त्यास निगडीत प्रात्यक्षिके ही व्यवस्थित करता येणे गरजेचे असते. दिग्दर्शनाचे कौशल्य न येण्याच्या स्थितीमध्ये ह्या पद्धतीने अध्यापन परिणामकारक होऊ शकत नाही.

**२) कमीत कमी विद्यार्थी संख्या व अधिक साधनांची आवश्यकता : –**

विद्यार्थ्यांकडे जर यशस्वीपणे निरीक्षण करण्यात येण्यावर या अध्यापन पद्धतीची यशस्विता अवलंबून असते. एका वर्गामध्ये कमीत कमी विद्यार्थी संख्या असणे आवश्यक ठरते. तसेच दिग्दर्शनासाठी विविध प्रकारच्या साहित्याची आवश्यकता असते.

**३) कृतीच्या दिग्दर्शनावरच भर :**

दिग्दर्शन पद्धती फक्त एखादी कृती कशी करायची याबद्दलच माहिती देते. पण प्रत्यक्ष कृती करुन पहाण्यासाठी संधी देत नाही. तसेच आवश्यक ज्ञान व कौशल्ये या प्रकारच्या अध्यापनातून विद्यार्थ्यांना प्रात होतीलच असे ठामपणे सांगता येत नाही.

**४) वेळेचा व शक्तीचा अपव्यय :**

दिग्दर्शन पद्धती जर योग्यपणे हाताळली नाही तर वेळ आणि शक्तीचा अपव्यय होऊ शकतो. तसेच अध्ययन व अध्यापनाची उद्दिष्टे गाठणे त्यामुळे शक्य होऊ शकत नाही.

**५) एकमार्गी आंतरक्रिया**

दिग्दर्शन पद्धतीच्या वातावरणामध्ये विद्यार्थी प्रश्न विचारण्याबद्दल नाराज असतात. परिणामी ते संकल्पना किंवा तत्वे याबाबत शंका विचारत नाहीत आणि त्यामुळे त्यांच्या शंकांचे समाधान होत नाही.

### २.२.३.३ दिग्दर्शन करताना शिक्षकाने घ्यावयाची काळजी :

दिग्दर्शनाचा वापर करताना शिक्षकाने काही गोष्टींची खबरदारी घेतल्यास ही पद्धती यशस्वीपणे वापरता येते.

१. टेबलाभोवती विद्यार्थी उभे करून दिग्दर्शन करावे. जर विद्यार्थी शिस्तप्रिय असतील तर त्यांना

डेस्कवर बसण्यास सांगावे किंवा डेस्कवर स्टूल ठेवून बसण्यास सांगावे. खिडक्यांचाही त्याकरता उपयोग करावा.

२. योग्य उजेड वर्गात असेल याबाबत दक्ष असावे. त्याकरता फळ्यावर ट्यूब असल्यास उत्तम ! वर्गात विजेची सोय असणे चांगले. विशेषतः प्रयोगशाळेला जोडून दिग्दर्शन खोली असणे चांगले. त्याचप्रमाणे योग्य पार्श्वभूमी असणे आवश्यक आहे. काळ्या वस्तू फळ्यासमोरून दाखवू नयेत.

३. दिग्दर्शनाच्या साहित्याचा पुरेसा आकार असावा, अचूक दिग्दर्शन करता यावे. उदा:- व्हर्नियर कैवार, मायक्रोमीटर, परीक्षा नलिका, इलेक्ट्रिक बेल इत्यादी.

४. प्रत्येक वस्तू लागणाऱ्या क्रमाने ट्रेमध्ये असावी किंवा टेबलावर असावी. जे साहित्य वापरावयाचे ते ते उजव्या बाजूस व वापरलेले डाव्या बाजूस असावे. सर्व साहित्य एकदम दाखवू नये. त्यामुळे विद्यार्थ्यांचा गोंधळ होतो. अनावश्यक बाबी, प्रयोग वह्या, कॅटलॉग टेबलावर असू नयेत. प्रयोगाशी संबंधित बाबीच टेबलावर असाव्यात.

५. प्रयोग यशस्वी होईल याबाबत शिक्षकाला निश्चित खात्री असावी. त्याचप्रमाणे प्रयोगाला वेळ किती लागेल. रासायनिक पदार्थ किती प्रमाणात घ्यावा, याकरिता शिक्षकाची तयारी उत्तम असावी. प्रयोगाची चाचणी घेतलेली असावी.

६. काही वेळा काही साहित्य फुटण्याची शक्यता असते. साहित्य कार्यक्षम नसते. परीक्षा नलिकेला उष्णता जास्त देण्याकरिता स्पिरीट दिवा जादा लागतो. या बाबी विचारात येऊन त्यासंबंधी तरतूद करावी.

७. साहित्याच्या अपुरेपणाबद्दल शिक्षकाने केव्हाही तक्रार करता कामा नये; अथवा निराश होता कामा नये. या ठिकाणी शिक्षकाला आपले कौशल्य दाखवता येते. उदा. स्पिरीट दिव्यात स्पिरीट नसेल तर स्टोव्ह वापरावा. साहित्य योग्य रितीने तापवावे.

८. ज्या साहित्याशी प्रयोग करावयाचा त्यापैकी बरेचसे साहित्य विद्यार्थ्यांच्या माहितीचे असावे. विद्यार्थ्यांना हाताळता यावे.

९. विद्यार्थी प्रात्यक्षिकाचेवेळी जे प्रयोग करतात त्या प्रयोगाशी क्रम साधावा.

१०. साहित्य शिक्षकाला योग्यपणे हाताळता यावे, जर ते नादुरुस्त झाले तर दुरुस्त करता यावे.

११. शिक्षकाने क्रमवार एकेका विद्यार्थ्याला मदत करावयास बोलावले पाहिजे, अधिकाधिक सहकार्य घ्यावे.

१२. विद्यार्थ्याचे प्रयोगाकडे अवधान हे महत्त्वाचे आहे. शिक्षकाजवळ अवधान राखणे व अभिरुची निर्माण करणे त्याबाबत क्लुप्त्या असाव्यात.

१३. वेळ व ऋतु याबाबत काळजी घ्यावी, नैसर्गिक वातावरण हे काही वेळा बाधक ठरते. उदा. घर्षणजन्य विद्युतचे पावसाळ्यात प्रयोग होत नाहीत. बर्फाबाबतचे प्रयोगास उन्हाळा चांगला असतो, फॉस्फरसचे थंडीच्या दिवसात प्रयोग करावेत.

१४. प्रयोग दिग्दर्शन करताना तक्ते, चित्रे, आकृत्या, प्रतिकृती, फिल्मस्ट्रीप इत्यादी अत्याधुनिक साधनांचा वापर करावा.

१५. प्रयोग खोलीत मोठा फळा असावा. आकृत्या, तक्ते, कृती, रासायनिक पदार्थांची नावे इ. बाबतीत मोठा उपयोग होतो. प्रयोगातील योग्य बाबी फलकावर उदा. निरीक्षणे, कोष्टके, निष्कर्ष इत्यादी लिहिण्यात याव्यात.

१६. विद्यार्थ्याची आवड आणि अनुमान क्षमता विकसित करण्यासाठी दिग्दर्शनावर प्रश्न विचारण्यात यावेत.

### २.२.३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१) दिग्दर्शन पद्धती म्हणजे काय ?

२) कोणते विषय दिग्दर्शन पद्धतीने शिकवता येतात ?

३) दिग्दर्शन पद्धतीचे कोणकोणते फायदे आहेत ?

४) दिग्दर्शन पद्धतीच्या कोणकोणत्या मर्यादा आहेत ?

आता तुम्ही चांगल्या पद्धतीने दिग्दर्शन पद्धती आत्मसात केलेली आहेत. तर मग आता आपण समस्या निराकरण या अध्यापन पद्धतीबाबत माहिती करुन घेऊया.

## २.२.४ समस्या निराकरण पद्धती :

समस्या निराकरण पद्धती ही अध्ययनार्थ्यांना त्यांच्या पूर्व ज्ञानावर आधारीत समस्येचे विश्लेषण करुन त्यावर उत्तर शोधण्यासाठी उपयुक्त ठरते. या पद्धतीत प्रामुख्याने विद्यार्थ्यांसमोर पाठ्यवस्तू समस्या रुपात मांडून त्यांना विचार करण्यास प्रवृत्त केले जाते. ही पद्धती ड्युईच्या समस्या निराकरणाच्या प्रयत्नातूनच विचारशक्तीचा विकास होतो' या तत्वावर आधारलेली आहे. रीस्क यांच्या मते, विद्यार्थ्यांच्या मनामध्ये प्रश्न निर्माण करुन त्यावर अचूक उत्तर शोधण्यासाठी, विमर्शनात्मक विचार करण्यासाठी, त्यांना हेतूपूर्वक चेतना देण्यासाठी समस्या निराकरणाचा उपयोग होतो.

समस्या निराकरण पद्धतीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे :

समस्या निराकरण पद्धतीच्या पुढीलप्रमाणे संरचित पायऱ्या असलेल्या आपणास दिसून येतात.

**१) समस्येची ओळख :**

समस्येची ओळख करुन देणे. या परिस्थितीमध्ये पूर्व नियोजन करुन जाणीवपूर्वक समस्येची ओळख करून घ्यावी लागते. क्षमता, अभिरुची, याचा विचार करुन जीवनातील उदाहरणे द्यावी लागतात.

उदा. अ) शालेय कृतींसाठी अनुदान नसणे.

ब) शालेय क्रीडांगणाबाबतचे प्रश्न

क) शाळेमध्ये प्रयोग शाळेशी निगडीत सुविधा असाव्यात.

### २) समस्येचे आकलन करुन घेणे आणि वर्णन करणे

समस्या निराकरण करण्यासाठी अध्ययनार्थ्यानी समस्येचे वर्णन करुन आकलन करुन घेणे आवश्यक आहे. यासाठी समस्येचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. ज्यामुळे अध्ययनार्थ्यांना समस्येच्या निराकरणाची गरज भासू लागेल. तसेच त्यांना समस्या सोडविण्याचे अनेक मार्ग प्राप्त होतील.

### ३) समस्येशी संबंधित माहिती गोळा करणे :

समस्येशी निगडीत माहितीही अपेक्षित उत्तराकरीता गोळा करणे, त्या अपेक्षित उत्तरावर चर्चा करणे व अपेक्षित उत्तराप्रत म्हणजे समस्येवर योजावयाच्या उपाययोजनेपर्यंत येणे. यासाठी ग्रंथालय, नोंदी केलेली माहिती, इतरांच्याकडून सल्ला घेणे याशिवाय इतर स्त्रोतांकडून व स्वतःकडे असलेल्या पूर्वज्ञानाच्या सहाय्याने समस्येचे निराकरण करण्यासाठी समस्येशी संबंधित माहिती गोळा करणे.

### ४) गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करणे

या पायरीवर समस्येशी संबंधित माहिती विश्लेषणाचा समावेश होतो. अपेक्षित उत्तरे साध्य करण्यासाठी माहितीचे वर्गीकरण करुन समस्येवर उपाययोजना करण्यासाठी उपयुक्त ठरणारी माहितीच घेणे म्हणजे गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करणे होय.

### ५) गृहितकाची मांडणी किंवा तात्पुरते उत्तर :

विश्लेषण करुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे गृहितकाची मांडणी कशा प्रकारे करण्यात यावी हे विद्यार्थ्यांना सांगण्यासाठी त्यांना योग्य ती दिशा किंवा मार्गदर्शन द्यावे.

### ६) गृहितकाची निवड आणि चाचणी :

विविध गृहितकांमधून एका योग्य गृहितकाची निवड करणे. यासाठी विविध गृहितकांचे नियोजन अभ्यासणे आणि त्यातून प्रत्येक गृहितकावर एका मागोमाग एक चर्चा करुन त्याचा समस्येवर उत्तर शोधण्यासाठी उपयोग करुन घेणे.

### ७) स्वीकृत केलेल्या गृहितकाचे किंवा निष्कर्षांचे उपाययोजन करणे :

गृहितकाची योग्य चाचणी घेतल्यानंतर त्याची स्वीकृती करण्यात येऊन त्याचे उपयोजन समस्या निराकरण करण्यासाठी करण्यात येते. तसेच त्याच प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी देखील स्वीकृती करण्यात आलेल्या गृहितकांचे उपयोजन करण्यात येते.

### समस्या निराकरण पद्धती

१. समस्येचे सादरीकरण

२. विद्यार्थ्यांकडून पाठपुरावा

**पायरी १ ली :** अनोळखी घटकातून ओळखीचे घटक शोधणे.

त्वरित ओळखीच्या घटकाकडून मार्गदर्शन मिळविणे.

**पायरी २ री :** समस्येचे ओळखीच्या प्रकारात वर्गीकरण करणे.

**पायरी ३ री :** गृहितकांची मांडणी करणे योग्य गृहितकांची निवड उपपत्ती, तत्त्वे, कल्पना, पद्धती इ. च्या आधारावर करणे.

**पायरी ४ थी :** गृहिताकाची समस्येवर उपाययोजना म्हणून पडताळणी करणे,

**पायरी ५ वी :** इतर गृहितकांची मांडणी करुन समस्येवर उपाययोजना म्हणून विचार करणे.

**पायरी ६ वी :** समस्या सोडविण्यासाठी योग्य उपाययोजनांचा विचार करणे.

### २.२.४.१ समस्या निराकरण पद्धतीचे फायदे :

१. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढविणे: वर्गात येणारे व खऱ्या अर्थाने दैनंदिन जीवनात येणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

२. उच्च दर्जाच्या बौद्धिक उद्दिष्टांची पूर्तता : विद्यार्थ्यांची बौद्धिकदृष्ट्या वाढ होण्याकरीता तसेच उच्च बौद्धिक क्षमतांबाबतचे उद्दिष्ट गाठण्याकरीता समस्या निराकरण पद्धती उपयुक्त ठरते.

३. विद्यार्थ्यांना समस्या निराकरणाचे प्रशिक्षण : समस्या निराकरण पद्धती समस्येचे विश्लेषण करण्याकरीता आणि ती सोडविण्याकरिता आवश्यक प्रशिक्षण देण्यास उपयुक्त ठरते.

४. विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणे : स्वयं निर्भर होण्यास स्वावलंबी प्रयत्न हे अध्ययन कृती करण्यासंबंधात उपयुक्त ठरते.

५. अध्ययन अभिरुचीपूर्ण बनविते : विद्यार्थी केंद्रित अध्यापन पद्धती असल्याने अध्ययन प्रक्रिया अभिरुचीपूर्ण व हेतूपूर्ण या अध्यापन पद्धतीमुळे बनते.

### २.२.४.२ समस्या निराकरण पद्धतीच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत

१. ठराविक उद्दिष्ट गाठण्यास उपयुक्त ठरत नाही : हेतूपूर्ण उद्दिष्टे गाठण्यासाठी समस्या निराकरण पद्धती उपयुक्त ठरत नाही.

२. विद्यार्थ्यांकडे विशिष्ट गुणवत्तेची आवश्यकता : प्रत्येक विद्यार्थ्यांकडे योग्य क्षमता, संयम असणे या पद्धतीत आवश्यक ठरते. परंतु सर्वच विद्यार्थ्यांकडे या बाबी असतीलच असे नाही. त्यामुळे व्यक्तिभेदाचा विचार ही अध्यापन पद्धती करीत नाही.

३. चुकीची गृहितके मांडल्यास वेळ व शक्तीचा अपव्यय: समस्या निराकरणासाठी तात्पुरते उत्तर शोधणे यासाठी विचार करण्याची क्षमता आवश्यक आहे. तसेच बऱ्याचवेळा समस्येवर उपाययोजना करण्यासाठी अयोग्य गहितकाची निवड होण्याची देखील शक्यता असते. त्यामुळे वेळेचा, श्रमाचा अपव्यय होतो.

४. अधिक तयारी व क्षमतेची आवश्यकता : शिक्षकाच्या अंगी विविध क्षमता असण्याची आवश्यकता असते. स्वतंत्रपणे विद्यार्थ्याला समस्या निराकरणासाठी मार्गदर्शन देणे गरजेचे असते.

५. कमीत कमी विद्यार्थी संख्या आणि विविध स्त्रोतांची आवश्यकता : योग्य साधन स्त्रोतांची व छोट्या गटाचीच आवश्यकता या पद्धतीमध्ये असते. अन्यथा गडबड गोंधळ होऊन परिणामकारकपणे अध्यापन पद्धती राबविणे शक्य होत नाही.

### २.२.४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१) समस्या निराकरण अध्यापन पद्धतीची व्याख्या सांगा,

२) समस्या निराकरण अध्यापन पद्धतीचे हेतू सांगा,

३) समस्या निराकरण अध्यापन पद्धतीच्या वापरामुळे अध्ययन प्रक्रियेतील कोणत्या अंगाचा विकास होतो?

४) समस्या निराकरण पद्धतीच्या केंद्रभागी कोण आहे?

आता तुम्ही नक्कीच समस्या निराकरण पद्धती आत्मसात केली आहे आणि दैनंदिन जीवनातील समस्या सोडविण्यासाठी देखील तुम्ही याचा वापर करत आहात. तर मग आता आपण आणखी एका अध्ययन पद्धतीचा परिचय करुन घ्यायचा आहे. ती अध्यापन पद्धती आहे 'गोष्ट पद्धती' किंवा 'कथन पद्धती'.

### ३.२.५ गोष्ट अध्यापन पद्धती किंवा कथन पद्धती :

गोष्ट अध्यापन पद्धती म्हणजे एखाद्या वस्मूचे, घटनेचे, किंवा इतर पाठीमागील अनुभवांचे, प्रसंगाचे क्रमवार, आणि सुसंगत असे शाब्दिक वर्णन होय. जेणेकरुन अध्ययनार्थीच्या मनामध्ये सुस्पष्ट, सविस्तर आणि अभिरुचीपूर्ण असे एखाद्या घटनेबाबतचे चित्र मनामध्ये हुबेहुब उभे राहील व त्याचे एखाद्या अध्ययन घटकाबाबतचे आकलन व्यवस्थित होऊ शकेल. गोष्ट अध्ययन पध्दतीने अध्यापन करताना अध्यापक एखाद्या घटनेबाबतचे स्वत:चे अनुभव हे स्वतःची सृजनशीलता कल्पकता वापरून कथन करीत असतो.

गोष्ट अध्ययन पध्दतीमध्ये सुसंगत व क्रमवार एखाद्या घटनेचे, प्रसंगाचे, अनुभवाचे शाब्दिक चित्रीकरण क्षमता महत्वाची असते. मुलांना गोष्टी ऐकायला फार आवडते. लहान मुले तर गोष्ट ऐकताना त्यामध्ये स्वतःला हरवतात, स्वतःच्या कल्पनेमध्ये ती घटना प्रसंग स्वतः अनुभवतात, आणि म्हणून गोष्ट पध्दतीचा वापर (प्राथमिक, पूर्व प्राथमिक) स्तरातील अध्ययनार्थ्यासाठी करण्यात येतो.

शालेय अभ्यासक्रमातील जवळ जवळ सर्व विषयांचे अध्यापन करण्याकरीता या अध्यापन पध्दतीचा करण्यात येतो. गद्य, पद्य, निबंध तसेच त्याशी निगडीत असे सांस्कृतिक, प्राचीन संदर्भ देण्याकरिता भाषेचा शिक्षक या पध्दतीचा वापर करतात. तसेच विज्ञान अध्यापन करणारा शिक्षक विज्ञानातील संबंधित वैज्ञानिकांच्या आयुष्यातील प्रसंगांचे कथन, अध्यापन करताना करून अध्ययन अभिरूची पूर्ण बनवतात.

अशा या अध्यापन पध्दतीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे -

गोष्ट अध्यापन पध्दतीची प्रक्रिया

१. योग्य आणि सुसंगत असे एखाद्या पटनेचे प्रसंगाने शाब्दिक वर्णन

२. सृजनशीलपणे एखाद्या घटनेचे विद्यार्थ्यांची अभिरूची वाढविण्यासाठी कथन.

३. अभिरूचीपूर्ण, सविस्तर, सुसंगत, क्रमवार एखाद्या घटनेचे प्रसंगाचे शाब्दिक कथन करून विद्यार्थ्यांच्या मनात प्रसंगाचे चित्रीकरण निर्माण करणे.

### २.२.५.१ गोष्ट अध्यापन पद्धतीचे फायदे :

१. संप्रेषण कौशल्य आणि योग्य हावभावांचा विकास : अध्यापकाकडे असलेल्या उत्तम संप्रेषण कौशल्ये, योग्य हावभाव करण्याच्या क्षमतेला अध्ययनार्थीवर प्रभाव पडून त्यांची देखील संप्रेषण कौशल्ये व हावभाव आत्मसात करण्यात प्रगती.

२. संकल्पना स्पष्टीकरण करण्यास उपयुक्त : विविध प्रसंगांशी संबंधित संकल्पना समजण्यासाठी सुसंगत क्रमवार अशा घटनांचे कथन उपयुक्त ठरते.

३. शालेय अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या अध्यापनासाठी उपयुक्त : शालेय अभ्यासक्रमाता सर्व विषयांचे अध्यापन करण्यास ही अध्यापन पध्दती उपयुक्त ठसते.

४. श्रवण कौशल्याच्या विकसनासाठी उपयुक्त : विद्यार्थ्यांची श्रवण कौशल्ये सुधारण्यासाठी उपयुक्त.

५. अमूर्त संकल्पनांचे आकलन वाढते: विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीत वाढ, अमूर्त संकल्पना देखील मनःचक्षू पुढे आणण्याची क्षमता वाढते.

### २.२.५.२ गोष्ट अध्यापन पद्धतीच्या मर्यादा :

गोष्ट अध्यापन पद्धतीच्या खालीलप्रमाणे मर्यादा असलेल्या दिसून येतात.

१. **विशिष्ट गोष्टींची आवश्यकता :** गोष्ट अध्यापन पध्दती ही एक कला आहे. या अध्यापन पद्धतीत अध्यापकाकडे गोष्ट सांगण्यास आवश्यक असणारी कौशल्ये असणे आवश्यक ठरते. अन्यथा ही अध्यापन पध्दती अयशस्वी ठरते.

२. **अध्यापन कंटाळवाणे :** गोष्ट अध्यापन पध्दतीची प्रक्रिया सुव्यवस्थित झाली नाही, तर अध्ययनार्थ्यांना प्रेरणा मिळणार नाही. परिणामी अध्ययन-अध्यापन नीरस, कंटाळवाणे होते.

३. **एकमार्गी प्रक्रिया :** बऱ्याचवेळा या अध्यापन पध्दतीत्त विद्यार्थी हे केवळ श्रवण करणारे व अध्यापक कथन करणारे असल्याने अध्ययन-अध्यापन प्रक्रिया एकमार्गी बनते.

४. **वेळेचा अपव्यय :** गोष्टींचे कथन करताना काहीवेळा विषयांतर होते व कथन करणाऱ्यांकडून निरर्थक बडबड होते. परिणामी कोणतीही फलनिष्पत्ती होत नाही आणि वेळ वाया जाण्याची शक्यता अधिक वादते.

५. **वस्तुनिष्ठतेचा अभाव :** एखाद्या घटनेचे, प्रसंगाचे वस्तुनिष्ठ चित्र तो कथनकार करेलच असे नाही. कारण कदाचित स्वतःच्या मतानुसार त्या घटनेचे. प्रसंगाचे अन्वयार्थीकरण करण्याची शक्यता असते.

### २.२.५.३ स्वयं अध्ययन प्रश्न :

१) गोष्ट अध्यापन पद्धती म्हणजे काय ?

२) कोणत्या विषयाचे अध्यापन करण्यास गोष्ट अध्यापन पध्दती उपयुक्त ठरते ?

३) कोणत्या कौशल्यांच्या विकसनासाठी गोष्ट अध्यापन पध्दती उपयुक्त ठरते ?

४) गोष्ट अध्यापन पध्दती कोणत्या प्रकारची अध्यापन पध्दती आहे ?

## २.४ सारांश :

या घटकातंर्गत अभ्यासलेल्या प्रमुख अध्यापन पद्धतीचा सार पुढीलप्रमाणे –

**१. व्याख्यान पद्धती :**

१. सादरीकरण करावयाच्या आशयाचे स्पष्टीकरण

- **प्रकार**

१. एकाधिकारशाही (शिक्षक केंद्रित)

- **फायदे :**

१. कमीत कमी स्त्रोताची आश्यकता

२. विद्यार्थ्यांच्या गरजाप्रमाणे लवचिक

३. वेळ आणि शक्तीची बचत

४. प्रेरणा देणे

५. भावनात्मक विकासासाठी उपयुक्त

- **तोटे**

१. आशय केंद्रित

२. एक मार्गी प्रक्रिया

३. विद्यार्थ्यांच्या अभिरूचीचा विचार करण्यात येत नाही.

४. खालच्या स्थानासाठी (पूर्व प्राथमिक, प्राथमिक) वर्गासाठी उपयुक्त नाही.

५. विचार प्रक्रिया चा विकास करण्यास उपयुक्त नाही.

**२. दिग्दर्शन पद्धती :**

एखादी वस्तू दाखविणे, स्पष्टीकरण देणे, आणि त्यावर आधारित विद्यार्थ्यांना प्रश्नोत्तरे विचारणे.

- **प्रकार**

एकाधिकारशाही (शिक्षक केंद्रीत)

- **फायदे :**
    १. भौतिक आणि जीवशास्त्रीय विषयासाठी उपयुक्त
    २. ठरविलेली उद्दिष्टये गाठण्यासाठी उपयुक्त
    ३. कृतीयुक्त सहभाग घेण्यास उपयुक्त
    ४. शालेय अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या अध्यापनासाठी उपयुक्त
    ५. वेळेची बचत करून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यास उपयुक्त
- **तोटे**
    १. कौशल्याने व क्षमता आणि परिपूर्ण अशा अध्यापकांची आवश्यकता
    २. कमीत कमी विद्यार्थी संख्या व अधिक साधनांची आवश्यकता
    ३. कृतींच्या दिग्दर्शनावरच भर
    ४. योग्य पद्धतीने पद्धती हाताळली नाही तर वेळेचा व शक्तीचा अपव्यय
    ५. एकमार्गी आंतरक्रिया

**३. समस्या निराकरण पद्धती :**

विद्यार्थ्यांना समस्या निराकरणाची संधी देणे.

**प्रकार**

लोकशाही (विद्यार्थी केंद्रित)

- **फायदे**
    १. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे.
    २. उच्च दर्जाच्या बहुतेक उद्दिष्टांची पूर्तता करणे.
    ३. विद्यार्थ्यांना समस्या निराकरण आणि प्रशिक्षण देणे.
    ४. अध्ययन अभिरूचीपूर्ण बनते.
- **तोटे**
    १. ठराविक उद्दिष्ट गाठण्यात उपयुक्त ठरत नाही.
    २. विद्यार्थ्यांकडे विशिष्ट गुणवत्तेची आवश्यकता
    ३. चुकीची गृहितके मांडल्यास वेळ व शक्तीचा अपव्यय
    ४. अधिक तयारी व क्षमतांची आवश्यकता
    ५. कमीत कमी विद्यार्थी संख्येची आणि विविध स्रोताची आवश्यकता.

४. **गोष्ट पद्धती :**

एखाद्या वस्तूचे, घटनेचे, अनुभवाचे, प्रसंगाचे क्रमबद्ध शाब्दिक वर्णन म्हणजे गोष्ट पद्धती होय.

प्रकार

एकाधिकारशाही (शिक्षक केंद्रित)

- **फायदे**
  १. संप्रेषण कौशल्य आणि योग्य हावभावांचा विकास
  २. संकल्पना स्पष्टीकरण करण्यास उपयुक्त
  ३. शालेय अभ्यासक्रमातील जवळजवळ सर्व विषयांचा अध्यापनासाठी उपयुक्त
  ४. अमूर्त संकल्पनांचे आकलन वाढते.
- **तोटे**
  १. गोष्ट सांगण्याच्या कौशल्याची आवश्यकता
  २. अध्यापन कंटाळवाणे
  ३. एक मार्गी आंतरक्रिया
  ४. वेळेचा अपव्यय
  ५. वस्तुनिष्ठतेचा अभाव

## २.५ पारिभाषिक शब्द :

**अध्यापन पद्धती** : अध्यापन पद्धती म्हणजे अध्यापकाने अध्ययनाची उद्दीष्टे गाठण्यासाठी वापरलेली तंत्रे किंवा प्रक्रिया होय.

**एकाधिकरण अध्यापन पद्धती** : ज्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये अध्यापक केंद्रस्थानी असतो अगर वर्गाध्यापनासाठी विद्यार्थ्यांपेक्षा अध्यापक कृतीशील असतो व अध्यापकाच्या मतानुसार सर्व अध्ययन अध्यापन प्रक्रिया चालते त्यास एकाधिकारशाही अध्यापन पद्धती असे म्हणतात.

**लोकाधिकारशाही अध्यापन पद्धती** : ज्या अध्ययन-अध्यापन प्रक्रियेच्या केंद्रस्थानी अध्ययनार्थी असतो. अध्ययनार्थींच्या गरजा, अभिरूचीचा विचार करून अध्ययन अनुभवांची व कृतीनी युक्त जी अध्यापन प्रक्रिया चालते त्यास लोकाधिकारशाही अध्यापन पद्धती असे म्हणतात.

## २.६ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे :

१) १. एकाधिकारशाही

२. लोकाधिकारशाही हे अध्यापन पद्धतीचे दोन प्रकार आहेत.

२) अध्यापन पद्धती ही नियोजन, साहाय्य, मूल्यमापन इ. शी संबंधीत अध्ययनाचे मूल्यमापनअकरणारी प्रक्रिया आहे.

३) अध्यापन पद्धती निवडण्याच्या दोन पायऱ्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे

१. कोणत्या आशयाचे अध्यापन करायचे आहे?

२. कोणती तंत्रे किंवा साधने वापरणे आवश्यक आहेत?

४) व्याख्यान पद्धती वापरण्याचे अनेक हेतू आहेत–

१. नवीन माहिती शब्द रूपात सादर करणे.

२. संकल्पना आणि तत्त्वांचे स्पष्टीकरण करणे.

३. वस्तुस्थितीबद्दल माहिती देणे.

४. सारांश रुपाने माहिती मांडणे.

५. अभ्यासक्रमांशी संबंधित साहित्याची ओळख करून देणे.

५) दिग्दर्शन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांना काही घटक दाखविणे. त्यांचे स्पष्टिकरण करून प्रश्नोत्तरामध्ये समाविष्ठ करून घेणे. इ. चा समावेश होतो.

६) दिग्दर्शन पद्धतीने सर्व विषय शिकविता येतात. उदा. विविध कला, संगीत, नृत्य, खेळ, शालेय अनुभव सहशालेय कृती, सामाजिक शास्त्रे, विज्ञान इ.

७) दिग्दर्शन पद्धतीचे फायदे

१) भौतिक आणि जीव शास्त्रीय विषयासाठी उपयुक्त

२) ठरविलेली उद्दिष्ट गाठण्यासाठी उपयुक्त

३) विद्यार्थ्यांचा कृतीशील सहभाग घेणे.

४) सहशालेय कार्यक्रमासाठी उपयुक्त

५) वेळ वाचविण्यासाठी व विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी उपयुक्त

८) दिग्दर्शन पद्धतीच्या मर्यादा

१) सर्व कौशशल्यांनी सक्षम अशा अध्यापकांची आवश्यकता

२) कमीत कमी विद्यार्थी संख्या व विविध साहित्यांची गरज

३) कृतीवर अधिक भर नाही तर कृतीच्या निरीक्षणावर भर

४) व्यवस्थित हाताळणी केली नाही तर वेळेचा अपव्यय

५) एकमार्गी आंतक्रिया

९) समस्या निराकरण पद्धती म्हणजे जेथे अध्ययनार्थीना समस्येचे विश्लेषण करण्याची आणि तिचे

निराकरण पूर्व ज्ञानावर आधारित करण्याची संधी होय.

१०) महत्त्वाचा हेतू म्हणजे अध्ययनार्थीस समस्येवर योग्य उपाययोजना करण्याचे प्रशिक्षण देणे होय.

११) बौद्धिक अंगचा विकास समस्या निराकरण पद्धतीमुळे होतो.

१२) समस्या निराकरण पद्धती ही विद्यार्थी केंद्रित आहे.

१३) गोष्ट पद्धती म्हणजे एखाद्या वस्तूचे, घटनेचे, अनुभवांचे, प्रसंगाचे क्रमवार आणि मुसंगत असे शाब्दिक वर्णन होय.

१४) शालेय अभ्यासक्रमातील जवळ जवळ सर्व विषयांच्या अध्यापनासाठी गोष्ट पद्धती उपुयक्त ठरते.

१५) संप्रेषण कौशल्ये आणि योग्य हावभावांचा विकास करण्यासाठी संप्रेषण कौशल्ये उपयुक्त ठरतात.

१६) गोष्ट पद्धती ही (शिक्षक केंद्रीत) एकाधिकारशाही पद्धतीची अध्यापन पद्धती आहे.

## २.६ सरावासाठी प्रश्न :

१) अध्यापन पद्धतीविषयी चर्चा करा.

२) व्याख्यान पद्धतीचे फायदे व तोटे स्पष्ट करा.

३) दिग्दर्शन पद्धतीबद्दल थोडक्यात माहिती लिहा.

४) समस्या निराकरण पद्धतीच्या पायऱ्या स्पष्ट करा.

५) समस्या निराकरण पद्धती आणि गोष्ट पद्धतीची तुलना करा.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :

आफळे, बापट (१९७३), शिक्षणाचे मानस शास्त्रीय अधिष्ठान, श्री विद्या प्रकाशन: पुणे

देशमुख, एल. जी. (२००४), शैक्षणिक शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापन शास्त्र, फडके प्रकाशन: कोल्हापूर

धनवडे, सुरेखा, धनावडे, नंदकुमार व पाटील अनिल (२०१२), शैक्षणिक शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापन शास्त्र, फडके प्रकाशन: कोल्हापूर

पारसनीस, न. रा. (१९९६), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, नूतन प्रकाशन : पुणे

मुळे, डी. व्ही. (२००८). शैक्षणिक मानसशास्त्र आणि सैद्धांतिक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, : कोल्हापूर

येवले, सीमा (२००७). शैक्षणिक तंत्रविज्ञान, नित्यनूतन प्रकाशन : पुणे

Bhatia and Bhatia, (1992). A Textbook of Educational Psychology, DOGBG House : Delhi

Mangal, S. K. (2001). Educational Technology, Vinod Publications : Ludhiana

Sharma, R. K. (2005). Advanced Educational Technology, Vinod Pustak Mandir : Agra

❖❖❖

## घटक ३
# शिक्षक
## (Teacher)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ शिक्षकाचे गुण व स्थान
- ३.२.२ शिक्षक एक नियोजक
- ३.२.३ राष्ट्रीय, सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची जोपासना आणि शिक्षकाची भूमिका व कार्ये

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयंअध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## ३.० उद्दिष्टे :

शिक्षक या घटकाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टी लक्षात येतील.

१. मानवी घटक म्हणून शिक्षकाचे स्थान व महत्त्व यांचे आकलन होईल.

२. शिक्षण कार्यातील शिक्षकाची भूमिका लक्षात येईल.

३. भारतीय उदयोन्मुख समाजात शिक्षकाचे योगदान समजेल.

४. समाज परिवर्तनातील शिक्षकाचे योगदान कोणते व शिक्षकांनी समाजपरिवर्तन कसे करणे गरजेचे आहे हे समजेल.

५. शिक्षकाची व्यावसायिक जबाबदारीची माहिती मिळेल.

६. चांगल्या शिक्षकाचे गुण वैशिष्ट्ये समजतील.

७. शिक्षकाला आवश्यक असणारी नियोजनाची गरज लक्षात येईल.

८. शिक्षकाने करावयाच्या नियोजन कार्याच्या स्वरूपाची माहिती मिळेल.

९. मूल्यशिक्षणाची ओळख होईल.

१०. मूल्यांच्या रूजवणूकीमध्ये आदर्श शिक्षकांची भूमिका समजेल.

## ३.१ प्रस्तावना :

प्राचीन काळापासून शिक्षकाला अनन्य साधारण महत्त्व आहे. शिक्षण प्रक्रियेत अध्ययन आणि अध्यापन प्रक्रियेला महत्त्व असले तरी शिक्षक हा या प्रक्रियेचा अविभाज्य घटक आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मित्र, मार्गदर्शक व तत्त्ववेत्ता आहे. तसेच तो अध्यापनातून काही वर्तनात बदल घडवण्याचा प्रयत्न करीत असतो. शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्टये लक्षात घेऊन त्यांची सांगड जीवनाच्या ध्येयांशी घालून जीवनाविषयक तत्त्वज्ञान प्रत्यक्ष कृतीत उतरविणारा एक तत्त्वज्ञानी असतो. शिक्षक हा सर्व अर्थाने विचार करता तो विद्या व्यासंगी असावा असे मानले जाते. शिक्षकी पेशा हा इतर सर्व पेशांपेक्षा नोबेल प्रोफेशन असा समजला जातो. कारण येथे विद्यादानाबरोबर विद्याप्राप्तीही होत असते. अध्यापन ही द्विकेंद्री प्रक्रिया आहे. त्यामुळे शिक्षकाचा-अध्यापनाचा अभ्यास करणे तेवढेच महत्त्वाचे आहे. व्यावसायिक शिक्षणाला आणि विद्यापीठीय शिक्षणाला महत्त्व आल्यानंतर शिक्षण प्रक्रिया ही व्यापक होत गेली. व्यापक स्वरूपामुळे तिच्यातील गुंतागुंतही वाढत गेली. शिक्षण क्षेत्रात शिक्षकाचा जिव्हाळ्याचा संबंध आहे. याविषयी म्हंटले जाते की, 'Quality of Education depends mainly upon the qualities of Teacher and not on the material facilities.' शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकांवरच अवलंबून असेल. ती भौतिक साधनाच्या सोयीवर नाही म्हणून दर्जेदार शिक्षण मिळविण्यासाठी दर्जेदार शिक्षक असले पाहिजेत.

## ३.२ विषय विवेचन :

### १.१ शिक्षण कार्यांबाबत शिक्षकाची भूमिका :

आधुनिक काळातील शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांला जरी महत्त्व असले तरी शिक्षकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अध्यापन किंवा शिक्षण ही एक द्विकेंद्री प्रक्रिया आहे. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत शिक्षक हा विद्यार्थ्यांइतकाच महत्त्वाचा घटक आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या समोरचा आदर्श असतो. त्यामुळे तो सुशिक्षीत, प्रशिक्षित, सुसंस्कारित सदाचारी असला पाहिजे. विद्यार्थी शिक्षकाचे अनुकरण करत असतात. नवीन पिढी घडविण्यासाठी त्याने ज्ञानदान तर केलेच पाहिजे, परंतु विद्यार्थ्यांच्या मनावर सुसंस्कार केले पाहिजेत.

आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञानचा विस्फोट झाला आहे. यामुळे विविध शाखांचा विकास झालेला आहे. जसे लोकसंख्या शिक्षण, पर्यावरण शिक्षण, पालक-शिक्षक शिक्षण, नीती व मूल्यांचे शिक्षण, संगणक शिक्षण या विविध विषयांच्या प्रगतीच्या परिणामामुळे शिक्षण आणि अभ्यासक्रमातील सुधारणा सतत वाढत आहेत. विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे शिक्षणासाठी विविध साधनांचा वापर शिक्षकाला करता आला पाहिजे. मुक्त शिक्षण, पत्राद्वारे शिक्षण, दूरस्थ शिक्षण यांचा अवलंब करत दुरदर्शन, संगणक, मोबाईल आणि इंटरनेट यांच्यासारख्या सुविधांचा वापर करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा शिक्षकाला पूर्ण करता येणे काळाची गरज बनली आहे. आजच्या तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या युगात जरी विद्यार्थ्यांना शिक्षकापेक्षा जास्त माहिती असली तरीही नवे शोध, नवी माहिती व नवीन ज्ञान त्यांनी आत्मसात करणे आवश्यक आहे. त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याचे काम मात्र शिक्षकाला करता आले पाहिजे. अन्यथा विद्यार्थी माहितीलाच ज्ञान समजू शकतो.

आदर्शवादाचा जनक प्लेटोने शिक्षक तत्त्वज्ञ प्रशासक असावा असे म्हंटले होते. समाज नियंत्रणाची समाजात सुव्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी तत्त्वसरूपी आहे. शिक्षकाची, आदर्श व मूल्ये यांच्यावर अढळ श्रद्धा असणारे तत्त्वज्ञानी शिक्षक असावेत असे प्लेटोने सांगितले होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात, 'जो अध्यात्मिक अंधकार नष्ट करतो तो गुरू' पुढे ते सांगतात, 'गुरूला आचार्य म्हणतात, आचार्य कोणाला म्हणावे?' तर ज्याचे आचरण हे सदाचरण आहे तो आचार्य समाजात चांगले परिवर्तन घडवून आणणारा शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभच असतो.

### १.२ उदयोन्मुख भारतीय समाजात शिक्षकाचे महत्त्व :

१. शिक्षण क्षेत्रात शिक्षकाचे किंवा गुरूचे स्थान हे अत्यंत महत्त्वाचे आहे. संत कबीरांनी शिक्षकांची महती सांगताना म्हंटले आहे, 'गुरू आणि परमेश्वर दोघेही माझ्यापुढे उभे आहेत. अशावेळी मी सर्वप्रथम कोणाच्या पाया पडू? सर्वांत प्रथम मी गुरूच्या पाया पडतो. कारण परमेश्वर प्राप्तीसाठी आवश्यक मार्गदर्शन मला गुरूकडूनच मिळाले आहे.'

२. एच. जी. वेल्सच्या मते 'शिक्षक हा सत्य इतिहास घडवणार असतो.' (The Teacher is the real maker of history - H. G. Wells)

३. गुरूस उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणात महत्त्वाचे स्थान आहे. व्युत्पत्तीनुसार पाहिल्यास पुढील प्रमाणे अर्थ सांगता येईल.

अज्ञानरूपी अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश दाखवणारा आधारस्तंभ म्हणजे गुरूजी होय.

४. रॉस म्हणतो, 'शिक्षक असे सांस्कृतिक वातावरण निर्माणकरू शकतो की ज्या वातावरणामध्ये विद्यार्थ्यांवर नैतिक व अध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करून त्यांचा पूर्णत्वाने विकास करता येईल.'

५. रविंद्रनाथ टागोर म्हणतात,

'जाहिराती देऊन शिक्षक मिळतील परंतु गुरू मिळणार नाही.'

प्रत्येक व्यक्ती हा एक चांगला शिक्षक बनू शकत नाही. कारण अध्यापन करणे ही कठीण कला असून त्यात सामाजिक जबाबदारी आहे. म्हणूनच शिकवणे किंवा अध्यापन करणे ही एक प्रभावी कला आहे. ती प्रयत्न आणि सराव यामुळे आत्मसात करता येते. ज्ञानपिपासूवृत्ती शिक्षकास ज्ञानी करते. याविषयी रविंद्रनाथ टागोर म्हणतात,

''शिक्षक जोपर्यंत स्वतः शिकत नाही तोपर्यंत तो विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे शिकवू शकत नाही. जो पर्यंत एक दिवा स्वयंप्रकाशित होत नाही. तोपर्यंत तो दुसऱ्या दिव्यास प्रकाशित करू शकत नाही.''

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १ :**

अ) शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

ब) समाजामध्ये शिक्षकाची प्रतिष्ठा कमी होण्याची कारणे स्पष्ट करा.

## १.३. समाज परिवर्तनात शिक्षकाचे योगदान

शिक्षण हे परितवर्तनाचे खरे साधन आहे. समाजात परिवर्तन करण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे. शिक्षक हाच सामाजिक परिवर्तनाचा खरा आधार आहे. उत्तम शिक्षक समाज बदलू शकतो. शिक्षक हा समाजाचे आणि देशाचे भवितव्य उज्वल करू शकतो. समाजातील गंभीर स्वरूपाचे प्रश्न व त्यांची जाणीव ही अधिक तर शिक्षकांनाच माहित असते. शिक्षक हा समाजसेवक आणि समाजसुधारक असतो. नवीन विचार, तत्त्वे, आदर्श आणि नवे ज्ञान हे शिक्षक समाजातील प्रत्येकापर्यंत पोहचवतो. प्राचीन काळात गुरूला परमेश्वराइतकेच महत्त्व होते. प्राचीन राजे-महाराजे हे गुरू आज्ञेचे पालन करत असत. शिक्षकी पेशा हा केवळ नोकरी नाही तसेच तो चार भिंतीच्या आत विद्यार्थ्यांना चार धडे शिकवणे असा मर्यादित स्वरूपाचाही नाही. अध्यापन करणे हे शिक्षकांचे कार्य आहेच पण त्याच बरोबर सामाजिक नियंत्रण आणि समाजाचे परिवर्तन यामध्ये समन्वय साधने बाबीही महत्त्वाच्या आहेत.

एक संवेदनशील, विचारी, समाजशील, सामाजिक जबाबदारीची जाणीव असणारा, चारित्र्य संपन्न माणूस म्हणूनच शिक्षकांनी आपली योग्य ती भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. आजच्या शिक्षकाने समाजकार्यात व सामाजिक परिवर्तनात सक्रिय असावे. तो परिवर्तनाला उत्सुक असावा. नवे ज्ञान, नवी संशोधने, आदर्श याबाबत तो जागरूक असावा. शिक्षकाने नव्या चाकोरीत प्रवेश करावा. आपल्या अध्यापन व्यवसायावर त्याची पूर्णतः निष्ठा असावी. आपल्या कार्याबाबत विश्वास असावा. समाजानेही शिक्षकाला मान सन्मान द्यावा. समाजातील त्याचे स्थान निरपेक्ष आहे. सापेक्ष वृत्तीने, मानसन्मानाच्या अपेक्षेने त्यांने समाजाचे कार्य करायचे नाही. तर त्यांना आपल्या समाजसेवेतून समाजाचे लक्ष आपणाकडे वेधून घ्यायचे आहे.

आजही समाजात त्यागी, सेवाभावी आणि चारित्र्यसंपन्न शिक्षकांची वाणवा आहे. शासन आणि समाज आदर्शशिक्षकांच्या कार्याची जरूर दखल घेत असते. प्रा. हुमायून कबीर याविषयी म्हणतात. 'चांगल्या शिक्षक कृतीतून शिक्षण पद्धतीतील दोषही दूर करता येतात.' डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात. ''समाजातील शिक्षकाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. पारंपारिक ज्ञानाचे आणि तांत्रिक कौशल्यांचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे करण्याच्या प्रक्रियेतील तो मुख्य आधार आहे. तोच संस्कृतीचा नंदादीप प्रज्वलीत ठेवतो. तो फक्त विद्यार्थ्यांला मार्गदर्शन करतो. असे नाहीतर तो राष्ट्राचे भवितव्य घडवतो, म्हणून समाजातील आपली जबाबदारी शिक्षकांनी ओळखली पाहिजे.''

शिक्षकाद्वारे समाजसेवा व समाज परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर शिक्षकाने स्वतः बदलले पाहिजे. समाजाच्या समस्या समाजाचे तत्त्वज्ञान समाज जीवनाची ध्येये आणि उद्दिष्टये त्याने समजावून घेतली पाहिजेत. समाज परिवर्तनासाठी शिक्षक हा आधुनिक बनला पाहिजे. समाज परितर्वनाला आवश्यक अशी मनोभूमिका तयार करण्याच्या कामी शिक्षकाने प्रयत्नशील असले पाहिजेत.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २ :**

  क) सामाजिक परिवर्तनामध्ये शिक्षकाचे योगदान सांगा

  ड) एक नियोजक म्हणून शिक्षकाच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट करा.

## १.४ शिक्षकाची व्यावसायिक जबाबदारी

माहिती, ज्ञान, आदर्श हे शिक्षकांद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले जातात. अनुकरण पद्धतीमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांना वैज्ञानिक, साहित्यिक, संगीतमय व मनोरजंन करणारी माहिती पूर्ण उदाहरणे सांगत चांगला आदर्श समोर ठेवतात. अशा आदर्शांचे विद्यार्थी अनुकरण करतात. सद्गुण व सदाचाराचे अनुकरण केल्यामुळे विद्यार्थी आपले व्यक्तिमत्त्व सर्वांग सुंदर घडवत असतात. विद्यार्थी हे नेहमीच शिक्षक काय शिकवतात त्यापेक्षा काय आदर्श ठेवतात. याकडे लक्ष देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अनुकरणाद्वारे शिक्षकांचे सद्गुण, चारित्र्य, कर्तव्यदक्षता, प्रामाणिकता विवेकबुद्धी या गुणांचे अनुकरण करू आपले व्यक्तिमत्त्व घडवावे. अलीकडील काळात आदर्शवादात 'मानसिक शक्ती' या सिद्धांतास महत्त्व प्राप्त झाल्यामुळे विशिष्ट मानसिक शक्ती विकसित करण्यासाठी विशिष्ट विषय उपयुक्त आहेत. हा विचार बळावला आहे. त्यातूनच शिक्षण संक्रमणाचा सिद्धान्त उदयास आला आहे.

प्राचीन काळापासून समाजात व अध्यापन प्रक्रियेत शिक्षकाला प्रचंड महत्त्व असून गुरूला समाजात उच्च स्थान आहे. आजही हे स्थान टिकून आहे. शिक्षक हा केवळ अध्यापक नसून तो विद्यार्थ्यांचा मित्र तत्त्ववेत्त, मार्गदर्शक असतो. अध्यापन करणे हा एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. प्रत्येक व्यवसायाचे समाजात एक विशिष्ट असे स्थान असते. अध्यापकीय व्यवसायाचे काही निकष आहेत ते पुढीलप्रमाणे : १. अद्यायावत विषयज्ञान, २. प्रदीर्घ काळ प्रशिक्षण, ३. व्यावसायिक स्वातंत्र्य, ४. व्यावसायिक बांधीलकी, ५. सामाजिक जबाबदारी, ६. शिक्षक व्यवसाय पवित्र व सेवाभावी व्यवसाय, ७. समाजाच्या गरजा भागवणारा व्यवसाय, ८. समाजाच्या परिवर्तनाची जबाबदारी.

▶ **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३ :**

इ) राष्ट्रीय मूल्यांच्या जोपासनेत शिक्षकाच्या भूमिकेची माहिती द्या.

क) मूल्य शिक्षणाचे महत्त्व विशद करा.

### ३.२.१. शिक्षकाचे गुण व स्थान :

विद्यार्थी हा नेहमी शिक्षकाला आदर्श व्यक्ती मानत असतो. शिक्षणातून विद्यार्थी सर्वांगीण विकसित व्हावा यासाठीच शिक्षक प्रयत्नशील असतो. विद्यार्थी शिक्षकाकडून केवळ ज्ञान माहिती यांचीच अपेक्षा करतो असे नसून शिक्षकाकडून प्रेरणा मिळावी, शिक्षकाने चांगले संस्कार घडवावेत, शिक्षकाने जीवनमूल्यांची ओळख करून द्यावी इ. बाबींची अपेक्षा करतो. आजच्या युगात गुणत्तायुक्त शिक्षण हे अधिकाधिक दर्जेदार बनवण्यासाठी चांगल्या शिक्षकांची देशाला गरज आहे. चांगल्या शिक्षकाच्या ठिकाणी खालील गुणवैशिष्ट्ये असावीत तरच तो वरील चांगल्या भूमिका यशस्वीपणे पार पाडेल.

**१. शैक्षणिक उद्दिष्टानुवर्ती अध्यापन :**

शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षणाची व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ उद्दिष्ट्ये मानलेली आहेत. ज्ञानदान व्यावसायिक कार्यक्षमतेचा विकास, समाजशीलता, आदर्श नागरिकत्त्व, सौदर्याभिमुख रसिकता व प्रतिभा यांचा विकास चारित्र्यसंपन्नता, लोकशाही दृष्टिकोन, समायोजन क्षमता, वेळेचा सदुपयोग, व्यावसायिक क्षमता, राष्ट्रनिष्ठा, विश्वसामंजस्य ही शिक्षणाची सर्वसामान्य ध्येये आहेत.

**२. विषयज्ञान :**

शिक्षकाला आपल्या विषयांचे ज्ञान उत्तमरित्या असणे गरजेचे आहे. जो विषय शिकवायचा आहे त्याचा व्यासंग असणे हे चांगल्या शिक्षकाचे वैशिष्ट्य आहे. आपल्या अध्यापन विषयातील नव्या संकल्पना, अद्ययावत ज्ञान शिक्षकाला असणे आवश्यक असते. जर विषयज्ञान सखोल असेल तर विद्यार्थ्यांना येणाऱ्या शंका शिक्षक सोडवू शकेल.

**३. प्रभावी अध्यापन :**

शिक्षकाचे अध्यापन जर प्रभावी असेल तर विद्यार्थ्याचा ओढा अशा शिक्षकांच्याकडे अधिक असतो. शिक्षणातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षकाची व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ उद्दिष्टये मानलेली आहेत. आपले अध्यापन सचेतन, दर्जेदार व प्रभावी होण्यासाठी शिक्षकाने वार्षिक नियोजन व दैनंदिन अध्यापनाचे नियोजन करावे. नियोजनबद्ध अध्यापन करताना अध्यापनाचा आशय शैक्षणिक साधनांचा वापर, शाब्दिक व वस्तूरूप अध्ययन अनुभव यांचे योग्य ते नियोजन करणे हा चांगल्या शिक्षकाचा गुण आहे.

**४. प्रेमळ, मनमोकळा आणि विद्यार्थ्यांना समजून घेणारा स्वभाव :**

विद्यार्थी नेहमी पालकांपेक्षा शिक्षकांवर विश्वास ठेवून आपले मन मोकळे करतात. जर शिक्षकाचा स्वभाव प्रेमळ व विद्यार्थ्यांना समजून घेणारा असेल तर अशाच स्वभावामुळे विद्यार्थ्यांना शिक्षक हवाहवासा वाटतो. प्रेमानेच विद्यार्थी सुधारतात हे शिक्षकाने लक्षात ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवणारा शिक्षक विद्यार्थ्यांना प्रिय असतो. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना प्रगतीस

प्रोत्साहन देणारा असावा. आपल्या हातून झालेली चूक शिक्षकाने मान्य केली पाहिजे. मनाचा मोठेपणा शिक्षकाकडून अभिप्रेत असतो म्हणजे शिक्षक-विद्यार्थी सुसंवाद चांगला घडून येतो व विकासाची द्वारे सर्वार्थाने खुली होतात.

**५. चारित्र्यसंपन्न :**

चारित्र्य हा माणसाचा अलंकार आहे. शीलवान व्यक्ती समाजात ही दीपस्तंभाप्रमाणे योग्य मार्गदर्शन करतात. त्यामुळे शिक्षक हा चारित्र्यसंपन्न असावा. चारित्र्यवान नागरिक निर्माण करण्याचे कार्य शिक्षणाद्वारे होत असते. म्हणून खऱ्या अर्थाने शिक्षक हा निर्व्यसनी असावा. व्यसनमुक्त समाज घडवण्यासाठी शिक्षक स्वत: निर्व्यसनी असला पाहिजे. म्हणजे तो चारित्र्यसंपन्न समाज घटकांची निर्मिती करून योग्य समाज व्यवस्थेचा पाया उभारू शकतो.

**६. अध्यापन पद्धती, सुत्र आणि तंत्राचा वापर :**

शिक्षकाला विषयानुरूप व घटकानुरूप अध्यापन पद्धतीची निवड करता आली पाहिजे. तसेच शिक्षकाला वेगवेगळ्या शिक्षण पद्धतीची जाण असावी. त्याला अध्यापनाची सुत्रे प्रभावीपणे पाठात वापरता आली पाहिजेत. वर्ग अध्यापनात वेगवेगळ्या तंत्राचा आणि पद्धतीचा वापर करायची तंत्रे व पद्धती शिक्षकाने आत्मसात करावीत म्हणजे अध्यापन व अध्ययन प्रक्रियेमध्ये एकसंघपणा अनुभवता येईल.

**७. प्रामाणिकपणा :**

आजच्या युगात प्रमाणिकपणा महत्त्वाचा गुण आहे. त्यामुळे शिक्षकाने मुख्याध्यापकांशी, संस्थेशी, सहकारी तसेच विद्यार्थ्यांशीही प्रामाणिक रहावे. त्याने फक्त आवडणारेच काम न करता मुख्याध्यापकांनी नेमून दिलेले काम सुद्धा करावे. शालेय साहित्यांची आणि उपकरणांची योग्य प्रकारे जपणूक करावी.

**८. व्यक्तिमत्व :**

व्यक्तिमत्व संकल्पनेत आपण शरीररचना, बुद्धिमत्ता, क्षमता, विचार, भावना, अभिरूची, अभिवृत्ती, स्वभाव यांचा समावेश करतो. शिक्षकाचे व्यक्तिमत्त्व हे समतोल प्रभावी आकर्षक असले पाहिजे. नीटनेटकेपणा साधी राहणी, वक्तशीरपणा, उक्ती आणि कृती यातील समानता, सेवाभाव स्पष्टता इ. गुण उत्तम व्यक्तिमत्त्व असणाऱ्या शिक्षकाचे आहेत. ज्यामुळे शिक्षक हा शिक्षण क्षेत्रातील प्रमुख आधार मानला जात आहे.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ४ :**

य) चांगल्या शिक्षकाची गुण वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**इतर गुण वैशिष्ट्ये**

**१. लोकशाही दृष्टिकोन :**

लोकशाही ही केवळ शासन पध्दती नसून ती सामाजिक मूलव्यवस्था आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय या लोकशाही मूल्यांवर शिक्षकाचा विश्वास असला पाहिजे. शिक्षकाने हुकूमशाही वृत्तीचा अंगीकार कधीही करू नये.

२. **स्वयं मूल्यमापन करण्यास तयार :**

आपल्या अध्यापन कौशल्याचे, सामाजिक सेवेचे, कर्तव्य परायणतेचे मूल्यमापन स्वत:च करण्याची तयारी असली पाहिजे. आपल्या कार्यातील गुण-दोष समजल्याने व्यक्तीच्या कार्यक्षमतेत सुधारणा होते. दोष किंवा त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणजे अध्यापन प्रभावशाली होण्यास मदत होईल.

३. **नेतृत्व क्षमता :**

शिक्षक हा समाजाचा सेवक व सुधारक असतो. त्यामुळे त्याला शालेय समूहाचे तसेच शालाबाह्य समूहाचे नेतृत्व करता आले पाहिजे. अनेक शिक्षकांनी लोकांना समाजाला योग्य नेतृत्व देऊन समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा नष्ट करून पुरोगामी विज्ञाननिष्ठ बनवण्यासाठी प्रयत्न केले आहेत. समाज संघटन करणारा हा चांगला समाज संघटक असावा.

शिक्षकाचे स्थान व गुण यांवरील स्वयंअध्ययनासाठी विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न :

१. शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका स्पष्ट करा.

२. समाज परिवर्तनातील शिक्षकांचे योगदान स्पष्ट करून त्यांच्यावरील अडचणी स्पष्ट करा.

३. उदयोन्मुख समाजात शिक्षकांचे महत्त्व सांगा.

४. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगातील शिक्षकाचे कार्य स्पष्ट करा.

५. चांगल्या शिक्षकांची गुण वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ५ :**

विधानांखाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

अ) ............ ची भूमिका विद्यार्थ्यांसाठी मित्र, मार्गदर्शक व तत्त्ववेत्याची आहे.

१) शिक्षकाची  २) अभिनेता  ३) राजकारणी  ४) मित्र

ब) जो आध्यात्मिक अंधकार नष्ट करतो तो......होय.

१) नेता  २) पालक  ३) गुरू  ४) समाज

क) ........ करणे हे शिक्षकाच्या जीवनाचे प्रमुख कार्य होय.

१) वक्तृत्त्व  २) ज्ञानदान  ३) समाजसेवा  ४) व्यायाम

ड) .........परिवर्तनात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते.

१) व्यवसाय  २) निसर्ग  ३) समाज  ४) मानसिक

ई) देशाचे भवितव्य.............घडत असते.

१) घरामध्ये  २) मित्रांत  ३) वर्गा-वर्गांत  ४) क्रिडांगणावर

### ३.२.२ शिक्षक – एक चांगला नियोजक :

आजच्या युगात ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. अशावेळी मानवी जीवनाच्या कक्षा सतत विस्तारित होत आहेत. माणूस हा जेव्हा प्रचंड विश्वाची निर्मिती झाली त्यापासून तो विविध गरजा भागवणाऱ्या वस्तूचा शोध घेत आहे. हीच प्रवृत्ती शिक्षणाला सुद्धा लागू पडते. त्यामुळे शिक्षणाचे राष्ट्रीय पातळीवर अवलोकन करत असताना शिक्षणाची ध्येय ठरवली जातात हे नियोजन संपूर्ण राष्ट्राला उद्देशून असते.शिक्षक जेव्हा या ध्येचाचा विचार करतो त्यावेळी त्याला वेगवेगळ्या प्रकारचे नियोजन लागते. हे नियोजन करत असताना प्रत्येक उपक्रमाचे नियोजन असते. छोट्या छोट्या योजनांचे नियोजन जर अचूक झाले तर राष्ट्राने शिक्षणाचे ठरवलेले ध्येय साध्य होण्यास अडचण येत नाही. यासाठी प्रत्येक घटकांचे नियोजन अचूक हवे. विनोबा भावे नियोजनाबद्दल म्हणतात, 'कोणत्याही गोष्टीचे नियोजन करताना लाख वेळा विचार करावा, परंतु एकदा केलेले नियोजन लाखो प्रयत्न करून कृतीद्वारे यशस्वी करण्याचा प्रयत्न करावा. शिक्षण ही राष्ट्राची नियोजनपूर्वक केलेली कायमस्वरूपी गुंतवणूक आहे. हे शिक्षणाद्वारे साध्य होते म्हणून शिक्षकांची जबाबदारी ही योग्य, अचूक नियोजन करण्याची आहे. त्यामुळे चांगले नियोजन करणारा शिक्षकच यशस्वी व आदर्श शिक्षक होतो.'

**शिक्षकाला नियोजनाची आवश्यकता :**

कोणतेही कार्य करताना त्यासाठी योग्य नियोजन असेल तर ते कार्य यशस्वी होते. शिक्षणात शिक्षकाला अध्यापन करतच विद्यार्थ्यांच्या वर्तनात इष्ट असे वर्तन बदल करून त्यांच्यात परिवर्तन करून आणावयाचे असते. हे कार्य दिर्घकाळ चालणारे आहे म्हणून शिक्षकाला विविध प्रकारे नियोजन करावेच लागते.

१. शिक्षकाचे वर्ग अध्यापनाचे कार्य नियोजित वेळेत आणि यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी नियोजन करणे आवश्यक असते.
२. शिक्षणाची ध्येय आणि उद्दिष्टये साध्य करण्यासाठी नियोजन करणे गरजेचे असते.
३. परिणामकारक अध्यापनासाठी नियोजनाची गरज असते.
४. अध्यापन व अध्यापनेतर कार्यातील समन्वय साधण्यासाठी नियोजन करावे.
५. अध्यापनाला योग्य दिशा प्राप्त करण्यासाठी नियोजन करावे.
६. वेळ व श्रम यांची बचत करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे.
७. श्रम विभागणी तत्त्वांची अंमलबजावणी होण्यासाठी नियोजन करावे.
८. विद्यार्थ्यांच्या वर्तनात इष्ट परिवर्तन करण्यासाठी नियोजनाची गरज असते.
९. शिक्षकाला आपले कार्य अधिक कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी नियोजन करणे गरजेचे आहे.
१०. वर्ग अध्यापन आणि सहशालेय उपक्रम यांचा समन्वय साधण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे.

### २.३ शिक्षकाच्या नियोजन कार्याचे स्वरूप :

शिक्षकाचा नियोजक म्हणून अनेक जबाबदाऱ्या पार पाडत असताना प्रामुख्याने तीन प्रकारच्या

नियोजनाचा वापर करून शैक्षणिक कार्याचे नियोजन करावे लागते.

१. अभ्यासक्रमाचे नियोजन

२. अभ्यासपूरक उपक्रमाचे नियोजन

३. अभ्यासेत्तर कार्याचे नियोजन

**१. अभ्यासक्रमाचे नियोजन :**

अभ्यासक्रमाचे नियोजन करत असताना शिक्षकाला जे विषय शिकवायचे आहेत. त्याचे वर्गानुसार वर्गीकरण करून नियोजन करावे लागते. तसेच विषयातील कोणता भाग कधी शिकवायचा आहे ते नियोजन वर्षांच्या सुरूवातीस करावे लागते. याला वार्षिक नियोजन म्हणतात. एकाच विषयाचे अनेक शिक्षक असतील तर कोणता भाग कोणत्या शिक्षकाने शिकवावा याचे नियोजन करावे लागते अन्यथा परस्परांमध्ये सामंजस्य, ऐक्य व सहकार्य राहत नाही. अध्यापन परिणामकारक, दर्जेदार व प्रभावी होण्यासाठी गरज असते ती सक्षम नियोजनाची.

**२. अभ्यासक्रम पूरक उपक्रमाचे नियोजन :**

शिक्षकाला जसे अभ्यासक्रमाचे नियोजन वर्ग अध्यापनासाठी उपयुक्त आहे त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी विद्यालयात उपयुक्त अभ्यासपूरक कार्यक्रमांचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे. अशा नियोजनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शिक्षकाला पाठ्य घटकाला पूरक उपक्रमांचे नियोजन करावे लागते. शिक्षणाचा आणि जीवनाचा योग्य समतोल हा अभ्यास पूरक उपक्रमातून साधला जातो. विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संस्कार रूजवण्यासाठी, कलागुण वाढीस लावण्यासाठी, नेतृत्त्वाची क्षमता निर्माण करण्यासाठी कल्पनेला चालना देण्यासाठी, नवनिर्मीती करण्यासाठी हे अभ्यासपूरक उपक्रम असतात. याचे नियोजन करत असताना खालील बाबींचा विचार केला पाहिजे.

१. उपक्रम कोणत्या ध्येयासाठी, उद्दिष्टांसाठी आणि मूल्य संस्कारासाठी आहे याचे नियोजन प्रथम करावे.

२. वर्षभरामध्ये जे उपक्रम घ्यावयाचे आहेत याची यादी तयार करावी.

३. उपक्रमाचे स्वरूप निश्चित करावे.

४. उपक्रमासाठी लागणारा कालावधी निश्चित करावा.

५. उपक्रमामध्ये सहभागी व्यक्तिची भूमिका निश्चित करावी.

६. निवडलेला उपक्रम समाजाला, विद्यार्थ्यांना, विद्यालयाला किती उपयुक्त आहे याचा विचार करून नियोजन करावे.

विद्यालयामध्ये नेहमीच वेगवेगळ्या जयंती, पूण्यतिथी, राष्ट्रीय सण, स्नेहसंमेलन, शिबीरे यांचे आयोजन केले जाते. हे नियोजन करण्याची जबाबदारी ही शिक्षकाची असते. हे नियोजन अचूक होण्यासाठी वरील बाबींचा विचार केल्यास उपक्रमांचे नियोजन करताना शिक्षकाला निश्चित फायदा होतो व त्याद्वारे उपक्रम यशस्वीरित्या राबविणे शक्य होते.

### ३. अभ्यासेतर कार्याचे नियोजन :

शिक्षकांनी जर अभ्यासेतर कार्यांचे अचूक नियोजन केले तर विद्यार्थ्यांचा विकास सर्वांगीण होतो. अभ्यासेतर कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहकार्याने व सहभागाने चालवण्यासाठी अनेक उपक्रमांचा समावेश होतो.

उदा. वसतिगृहातील सहकार्य भोजन व्यवस्था, शालेय विद्यार्थी ग्राहक भांडार, संचयनी, पुस्तक पेढी, हस्त व्यवसाय या साऱ्यातून करता येणाऱ्या वस्तू इ.

वरील उपक्रमांमध्ये नियोजनात मुख्याध्यापकांची प्राचार्यांची पूर्वपरवानगी, व्यवस्थापक मंडळाची परवानगी, आर्थिक गैरकारभार होणार नाही. याची काळजी घेतली पाहिजे. आर्थिक व्यवहारात पारदर्शकता प्रामाणिकता व जबाबदारपणा आणण्यासाठी काटेकोर नियोजन करावे.

शिक्षकाला त्यांचे व्यावसायिक कार्य यशस्वीपणे करण्यासाठी नियोजन हे अत्यावश्यक असते. यशस्वी नियोजनावरच कार्यक्रमांची, उपक्रमांची यशस्विता अवलंबून असते.

### शिक्षकाचा व्यावसायिक विकास :

शिक्षण ही द्विकेंद्री पद्धती असली तरी शिक्षकास शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत महत्त्व आहे. शिक्षकाचा प्रमुख व्यवसाय फक्त अध्यापन नसून या व्यावसायात त्याने ज्ञान आणि त्याने त्यात मिळवलेला अनुभव यावर अधिक भर देण्यात येतो. त्यासाठी शिक्षकाचा व्यावसायिक विकास होणे गरजेचे आहे.

प्रत्येक व्यक्तिने स्वतः अध्यापनात परिपूर्ण असणे आवश्यक असते. प्रत्येकच व्यक्ति चांगला शिक्षक होऊ शकत नाही. कारण अध्यापन करणे हे जिकीरीचे काम आहे. म्हणूनच शिकवणे ही कला असून ती प्रयत्न व सरावाने येते. त्यात मिळालेला अनुभव यावर अधिक भर देण्यात येतो. त्यासाठी शिक्षकाचा व्यावसायिक विकास करणे गरजेचे आहे.

अलीकडे इलेक्ट्रॉनिकची उपकरणे उपयोगात येत असल्याने विज्ञान व तंत्रज्ञानाची माहिती अवगत करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांत सृजनशीलता (Creativity) आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी शिक्षकाची महत्त्वाची भूमिका असते. शिक्षकाच्या व्यावसायिक विकासाच्या गरजेसाठी त्याच्या समर्थनार्थ पुढील विचार उपयुक्त आहेत.

१. अध्यापनात नवीन तंत्राचा वापर करणे.

२. प्रज्ञावान तसेच सामान्य बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी वापरावयाच्या अध्यापन पद्धतीचा विकास करणे.

३. सामाजिक गरजा विचारात घेऊन अभ्यासक्रमांची आखणी करणे.

४. दृकश्राव्य साधनांचा वापर करणे

५. नवीन मूल्यमापनांच्या पद्धतीचे ज्ञान अवगत करणे.

६. नव-नवीन अभ्यास पद्धती व अध्यापन पद्धतींचा अभ्यास असणे.

शिक्षकाच्या व्यावसायिक विकासासाठी चर्चासत्रे, कार्यशाळा, शालेय उपक्रम इ. घटकांचा वापर करता येतो.

**शिक्षकास स्वतःच्या व्यावसायिक विकास करण्यास पुढील माध्यमे उपयोगी पडतात.**

१. स्वतः जाणीव जागरूक असणे.

२. विद्यार्थीसंबंधी जाणीव जागृत असणे.

३. शिक्षण संस्थेसंबंधीत जाणीव असणे.

४. समूहासंबंधीत जाणीव असणे.

१. स्वतः जाणीव जागरूक असणे.

**१. स्वतः जाणीव :-**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे जसे शिक्षणाचे कार्य आहे. तसेच शिक्षकाने त्याच्या अंगी असलेल्या गुणाचा विकास केला पाहिजे. स्वतःमध्ये आढळणाऱ्या उणिवा, गुण यांची जाणीव ठेवून स्वतः आत्मावलोकन केले पाहिजे. शिकवताना विविध अध्यापन पद्धतीचा वापर केला पाहिजे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व जाणून त्यांचा विकास करण्यासाठी आपली पूर्ण शक्ती पणाला लावणे गरजेचे आहे.

**२. विद्यार्थीसंबंधी जाणीव :-**

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ शिकवण्यावर भर देण्यापेक्षा शिकण्यासाठी मार्गदर्शन करावे व प्रेरीत ही करावे. अध्ययनास विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती तयार केली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार त्याला मदत करणे आवश्यक असते. विद्यार्थी-शिक्षक यांचे परस्पर संबंध सलोख्याचे असले पाहिजे. योग्य विद्यार्थी बनवण्यासाठी शिक्षकाने प्रेरणादायी असणे आवश्यक आहे की ज्याद्वारे अध्ययन प्रक्रियेत एकसूत्रपणा निर्माण होऊन विद्यार्थी स्वयं अध्ययन करण्यास उत्सुक होईल.

**३. शिक्षण संस्थेसंबंधीत जाणीव :-**

ज्या शिक्षण संस्थेत शिक्षक अध्यापन करीत असेल त्या शिक्षणसंस्थेशी शिक्षकाने परस्पर संबंध चांगले ठेवले पाहिजेत. शिक्षकाचे आपल्या व्यवस्थापन मंडळाशी सलोख्याचे संबंध असावेत. शिक्षणसंस्थेचे नावलौकिक कसे होईल यासाठी त्याने प्रयत्न करावेत. शिक्षक व संस्था यांच्यामध्ये एक प्रकारची जवळीक निर्माण होणे गरजेचे आहे.

**४. समूहासंबंधीत जाणीव :-**

विद्यार्थी समाज व शिक्षक यांचा समुदायामध्ये समावेश होतो. शिकवणारे शिक्षक हे त्यांचे नेतृत्त्व करत असतात. समाजाला, विद्यार्थी समुहाला एकत्रित ठेवतात. प्रौढ शिक्षणासारख्या कार्यक्रमामुळे विद्यार्थी व समाज यात आपुलकी निर्माण होते.

शिक्षकाला आपली ध्येये आणि उद्दिष्टये गाठावयाची असतील तर योजना आखणे गरजेचे आहे. या छोट्या-छोट्या उपक्रमांचे नियोजन जर अचूक झाले तर राष्ट्राने शिक्षणाचे ठरवलेले ध्येय साध्य होईल. त्यासाठी प्रत्येक घटकांचे नियोजन असणे गरजेचे आहे.

शिक्षकास शैक्षणिक क्षेत्रात महत्त्व आहे. शिक्षकाचा प्रमुख व्यवसाय हा अध्यापन आहे. त्यासाठी शिक्षकाचा व्यावसायिक विकास करणे गरजेचे असते. यावर रविंद्रनाथ टागोर म्हणतात. ''शिक्षक जोपर्यंत स्वतः शिकत नाही. जोपर्यंत एक दिवा स्वयंप्रकाशित होवू शकत नाही. तो पर्यंत दुसऱ्या दिव्यास प्रकाशित करू शकत नाही.'' यामुळेच शिक्षकाचा व्यावसायिक विकास झाला पाहिजे.

i) उपघटक : शिक्षक एक चांगला नियोजक या उपघटकावरील स्वयंअध्ययनासाठी विद्यापीठीय स्वरूपाचे प्रश्न –

१. शिक्षकाला नियोजनाची आवश्यकता सविस्तर स्पष्ट करा.

२. टिपा लिहा : शैक्षणिक नियोजकाचे प्रकार

३. शिक्षकासाठी नियोजनाचे महत्त्व सांगा.

४. अभ्यासेत्तर कार्याचे नियोजन स्पष्ट करा.

ii) शिक्षकाचा व्यावसायिक विकास या उपघटकासंबंधीत स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–

१. शिक्षकाचा व्यावसायिक विकास स्पष्ट करा.

२. शिक्षकाच्या व्यावसायिक विकासासाठी गरजेचे विचार स्पष्ट करा.

३. व्यवसाय विकासासाठी शिक्षकास उपयुक्त पडणारी माध्यमे सांगा.

## ३.२.३ राष्ट्रीय, सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची जोपासना आणि शिक्षकाची भूमिका व कार्ये –

भारताला उच्चतम अशी सांस्कृतिक व सामाजिक परंपरा लाभलेली आहे. भारताचा प्राचीन काळापासून आजतागायतचा ऐतिहासिक वारसा संपूर्ण विश्वात नावलौकिक मिळवलेला आहे. त्याच उच्चतम सांस्कृतिक मूल्यांची, अध्यात्मिक तत्त्वज्ञानाची आणि संपन्न ऐतिहासिक वारश्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देणे व त्यांना जागरूक, प्रगल्भ व सुजाण नागरिक बनवणे ही शिक्षकांची प्रमुख जबाबदारी आहे, ज्या दृष्टीने शिक्षकाची भूमिका खालीलप्रमाणे –

**शिक्षकाची भूमिका –** राष्ट्रीय, सांस्कृतिक व सामाजिक विकास घडवून आणताना शिक्षक फार महत्त्वाचा आधार ठरतो.

### १. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास व शिक्षकाचे अध्यापन कार्य –

भारतावर दीडशे वर्षे ब्रिटीशांनी राज्य केले. भारतीय समाज ही गुलामगिरी झुगारून देण्यासाठी व स्वातंत्र्यासाठी लढला. या परिस्थितीची गंभीरता विद्यार्थ्यांना समजावी तसेच वैचारिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक प्रश्नांची जाणीव व्हावी यासाठी स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाची माहिती पूर्णतः विद्यार्थ्यांना समजावी म्हणून शिक्षकास पुढील बाबी माहिती असाव्यात.

१. स्वातंत्र्य लढ्याची योग्य व अचूक संपूर्ण माहिती.

२. विद्यार्थ्यांना एकात्मतेची जाणीव, धर्मनिरपेक्षता, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मुल्यांची माहिती.

३. स्वातंत्र्य लढ्यातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, वैचारिक क्षेत्रातील व्याप्ती.

४. स्वातंत्र्य लढ्यात सर्व जाती, धर्म, पंथ यातील स्त्री–पुरूषांनी दिलेले योगदान.

५. विद्यार्थ्यात राष्ट्रप्रेम, स्वातंत्र्यप्रेम विकसित करण्यास शिक्षकाने आपल्या वर्तणुकीतून व बोलण्यातून दाखवावे.

**२. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्यांची रूजवणूक व शिक्षकाचे अध्यापन कार्य –**

सुरक्षिततेच्या आणि व्यवस्थेच्या दृष्टिने प्रत्येक देशात निश्चित यंत्रणा सुरू असते. भारतीय राज्यघटनेत देशाच्या अपेक्षा व जाणीवा प्रतिबिंबीत होतात. हा आशय विद्यार्थ्यांना समजावा ही शिक्षकाची जबाबदारी असते.

१. संविधानात्मक जबाबदाऱ्या, नागरिकांची कर्तव्ये पार पाडायची भावना रूजवणे.

२. 'आम्ही प्रथम भारतीय आहोत.' याची जाणीव शिक्षकाने विद्यार्थ्यांत रूजवावी.

**३. राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यास आवश्यक आशय व शिक्षकाचे कार्य :**

भारतामध्ये वेगवेगळी संस्कृती वेगवेगळ्या प्रदेशात आहे. त्यातून एकता साधण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय अस्मिता ही एक भावना आहे. या दृष्टिने शिक्षकाने प्रयत्न करावा.

१. राष्ट्रीय अस्मिता वाढवण्यासाठी राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रभक्ती विकसित करणे.

२. विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रीय एकात्मता जागृत करताना शिक्षकाने एकतेचे दर्शन घडविणे.

३. लोकशाहीबद्दल विद्यार्थ्यांना अवगत करणे.

४. राष्ट्रीय प्रतिकाबद्दल जाणीव व पूज्यभाव शिक्षकाने विद्यार्थ्यांत जागृत करणे.

**४. भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा रूजवणूक करण्यात शिक्षकाची भूमिका –**

भारताला प्राचीन काळापासून सांस्कृतिक वारसा लाभला आहे. यातील काही गोष्टी आजही आपणास उपयोगी पडतात. पाश्चात्य संस्कृतीचा जरी भारतावर प्रभाव असला तरीही चांगल्या गोष्टी जरूर घ्याव्यात, मात्र आपल्या सांस्कृतिक वारसांमध्ये आजही पूर्वीचे स्थान मिळवून देण्याचे सामर्थ्य आहे. शिक्षकाने नवीन पिढीला हा भारताचा सामाईक वारसा संक्रमित केला पाहिजे.

**५. समानता, लोकशाही व धर्मनिरपेक्षता याबांबत शिक्षकाची भूमिका –**

भारत हे सार्वभौम, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक राष्ट्र आहे. आपल्या देशाला विकसित करण्यासाठी या मूल्यांची माहिति विद्यार्थ्यांना द्यावी. कायद्यासमोर सर्वजण हे सर्व समान आहेत. जाती, धर्म, कोणी उच्च नाही वा नीच नाही नागरिकांचे कर्तव्य धर्मनिरपेक्षता संकल्पना, समानतावाद इ. माहिती विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवावी.

**६. स्त्री–पुरूष समानता रूजवण्यात शिक्षकाची भूमिका :**

प्राचीन व मध्ययुगीन काळात स्त्रीला सामाजिक व शैक्षणिक गुलागिरीचे जीवन जगावे लागत असे. मुलीचा जन्म म्हणजे मातापित्यासाठी समस्या ठरत असे. यासाठी उदयोन्मुख भारतीय समाजात शिक्षकाने स्त्री–पुरूष समानतेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले पाहिजे. स्त्री परावलंबत्त्वाचा प्रतिमा पुसून काढली पाहिजे व यासाठी शिक्षकाने प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी माता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले यांपासून ते कल्पना चावला, पी. व्ही. सिंधू यांच्यापर्यंतचा स्त्री सक्षमतेचा आशय, विचार बिंबवला पाहिजे.

**७. पर्यावरणाचे संरक्षण जाणीव जागृती करण्यात शिक्षकाची भूमिका :**

माणूस ज्या वातावरणात राहतो त्यानुसार आपली जीवनशैली घडवतो. आपण ज्या पर्यावरणात राहतो त्यांचे रक्षण करणे मानवाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. पर्यावरणाचे संरक्षण हा केवळ देशापुरताच सीमित नसून तो सर्व मानव जातीशी संबंधित आहे. याची जाणीव शिक्षकांनी विद्यार्थ्यांना करून द्यावी.

**८. सामाजिक अडसरांचे निर्मूलन करण्यासाठी शिक्षकाची भूमिका :**

भारतावर इंग्रजांनी राज्य करताना इंग्रजांनी 'तोडा व राज्य करा' या नीतीचा अवलंब केला होता. त्यामुळे भारतीय समाजात अनेक भेदभाव निर्माण झाले. वर्ण व्यवस्था, कर्मकांड, स्त्रियांना उपेक्षित स्थान यामुळे सामाजिक अडसर निर्माण झाले होते. याचे निर्मूलन करण्यासाठी सर्व धर्माबद्दल शिक्षकाने विद्यार्थ्यांत जागृती निर्माण करावी.

**९. लहान कुटुंबाचा आदर्श याबाबत जाणीव जागृती करणे.**

भारतात सर्वात मोठी व महत्त्वाची समस्या ही लोकसंख्या आहे. भारतात समाजातील कुटुंब लहान असावे यावर भर देण्यात आला आहे. अध्यापकांनी विद्यार्थ्यांना याबाबतीत जागृत करावे. शिक्षकाने लहान कुटुंबाचा आदर्श व त्याचे फायदे विद्यार्थ्यांना समजावून द्यावेत.

**१०. वैज्ञानिक मनोभावाची रूजवणूक करणे :**

यंत्रामुळे मानवाचे जीवन हे सुखकर झाले आहे. या यंत्राच्या वापरासाठी तंत्रज्ञानाची गरज भासते. इतर क्षेत्रातही यंत्राचा वापर करावा लागतो. त्यामुळे नवीन पिढीत वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक असते. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक पद्धतीने अध्ययन करण्यास प्रवृत्त केले पाहिजे आणि समस्या सोडवण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला पाहिजे.

## ३.३ सारांश :

शिक्षक एक सामाजिक अभियंता आहे. कारण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वांची उभारणी करून राष्ट्र उभारणी व राष्ट्रोन्नती करण्यामध्ये शिक्षकाचे योगदान मोलाचे आहे. समाजात शिक्षकाचे स्थान फार महत्त्वाचे आहे. शिक्षकाची भूमिका प्रत्येक काळात दीपस्तंभाची म्हणजेच आदर्श मार्गदर्शकाची राहीली आहे. शिक्षक समाज परिवर्तनाचा मूलाधार आहे. विद्यार्थी शिक्षकाच्या चांगल्या गुणांचे व आदर्शाचे अनुकरण करत असतो. चांगली मूल्ये व नीतितत्वे असणाऱ्या शिक्षकांची समाजाला गरज असते. कर्तव्याचे भान ठेवून शिक्षकांची सामाजिक बांधिलकी जोपासली पाहिजे. शिक्षकाने प्रभावी अध्यापन कार्य करण्यासाठी ज्ञान साधना, संशोधन व चांगल्या अभिरूचीची जोपासना करून शैक्षणिक कार्याचे योग्य नियोजन करणे अपेक्षित आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्दांचे अर्थ

१) अध्यापन : विद्यार्थ्यांना म्हणजेच अध्ययनर्थींना शिकण्यास सहाय्य करणे व मार्गदर्शन करणे. शिकवणे, ज्ञान देण्याच्या बाबतीत शिक्षकाचे कर्तव्य.

२) अभ्यासविषय : वर्ग अध्यापनात शिकवले जाणारे विषय, अध्ययन अनुभवांचा संच

३) अभ्यासनुवर्ती : वर्ग अध्यापनात विषयांच्या आणि अभ्यासक्रमाच्या शिवाय प्रत्यक्ष अन्य अनुभव देण्यासाठीचे उपक्रम, कार्यक्रम :

४) अभ्यासेत्तर : विद्यार्थ्यांच्या सहकार्याने व सहभागाने राबविले जाणारे व्यक्तिमत्व विकासासाठीचे उपक्रम.

५) नियोजन : सूत्रबद्ध, क्रमबद्ध व कालबद्ध आखणी, आपली विहीत उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी नेमकी कोणती कामे करावी लागतील, त्यांचा योग्य क्रम कसा असावा, त्यासाठी उपलब्ध साधन सामुग्री व मनुष्यबळ यांचा उत्तम वापर कसा करून घेता येईल या सर्व गोष्टींचा विचार करून भविष्यकालीन कार्याची केलेली आखणी, योजना व मांडणी.

६) योगदान : सहभागी होऊन कार्य निष्पत्ती करणे.

७) व्यक्तिमत्व : व्यक्तीच्या मन आणि शरीराशी निगडीत गुणांचे संघटन, व्यक्तीच्या गुणांचा समुच्चय.

८) विकास : गुणात्मक व सकारात्मक बदलाची प्रक्रिया.

९) शिक्षक : विद्यार्थ्याला ज्ञानदान करणारी व अध्ययनास मदत व मार्गदर्शन करणारी प्रशिक्षित व्यक्ती.

## ३.५ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे (संक्षिप्त स्वरूपात)

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**अ) शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.**

उत्तर : ज्ञानदान करून विद्यार्थ्यांना अध्ययनास मदत शिक्षक करत असतो. विद्यार्थ्यांसाठी शिक्षक हा मित्र, मार्गदर्शक आणि तत्ववेत्ता म्हणून संबोधला जातो. शिक्षक विद्यार्थ्यांना अध्ययनाची प्रेरणा देतो. विद्यार्थ्यांचे अध्ययन प्रभावी व्हावे म्हणून सातत्याने प्रयत्नशील असतो. मूल्यांची रूजवणूक करण्यामध्ये शिक्षकाचा वाटा मोलाचा असतो.

**ब) समाजामध्ये शिक्षकाची प्रतिष्ठा कमी होण्याची कारणे स्पष्ट करा.**

उत्तर : आजच्या शिक्षकात काही प्रमाणात ज्ञानलालसा आणि ध्येयवादाची कमतरता जाणवते. विद्यार्थ्यांबद्दल आपुलकी जाणवत नाही. संशोधनवृत्ती आणि व्यासंग यांचा अभाव जाणवतो. नोकरी म्हणून, आर्थिक उत्पनाचे साधन म्हणून शिक्षकी पेशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वाढला आहे. सामाजिक बांधिलकी व सामाजिक उत्तरदायित्व याची जाणीव शिक्षकांमध्ये कमी झाली आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**क) सामाजिक परिवर्तनामध्ये शिक्षकाचे योगदान सांगा.**

उत्तर : समाजात शिक्षकाचे स्थान महत्त्वाचे आहे. सामाजिक नियंत्रण व सामाजिक परिवर्तनात शिक्षकाचे योगदान मोलाचे असते. कारण देशाचे भावी नागरिक म्हणजेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास आणि मूल्यांच्या रूजवणुकीचे महत्तम कार्य शिक्षकच करत असतो. सामाजिक परिवर्तनाचा खराखुरा आधार शिक्षकच असतो. सामाजातील प्रश्नांची जाण असल्याने विद्यार्थ्यांपर्यंत त्याची माहिती पोहचवून सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न शिक्षकच करत असतो.

**ड) एक नियोजक म्हणून शिक्षकाच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट करा.**

उत्तर : शिक्षक अभ्यास विषयक, अभ्यासानुवर्ती व अभ्यासा इतर कार्याचे नियोजन करत असतो. शिक्षकाला वार्षिक, दैनंदिन तसेच घटक अशा तीन स्वरूपात शैक्षणिक नियोजन करावे लागते. शालेय कार्याचे, शालेय उपक्रमांचे व कार्यक्रमांचे नियोजन हे शालेय संघटन आणि व्यवस्थापन प्रक्रियेचे महत्वाचे पैलू शिक्षक परिपूर्ण करत असतो. शिक्षणाची ध्येये आणि उद्दिष्टे समर्थपणे साध्य करण्यासाठी शिक्षकाच्या नियोजन कार्याला अनन्य साधारण महत्त्व आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**इ) राष्ट्रीय मुल्यांच्या जोपासनेत शिक्षकाच्या भूमिकेची माहिती द्या.**

उत्तर : शिक्षक वर्ग अध्यापनात तसेच अभ्यासेत्तर उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी राष्ट्रीय मूल्ये रूजवण्याचा प्रयत्न करतो. राष्ट्रीय आदर्श, देशप्रेम, एकात्म भावनेचा विकास, सर्वधर्मसमभाव, लोकशाही नागरिकत्वाची जाण, समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य अशी देशहितकारक मूल्ये प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष शिक्षक जतन, संवर्धन व संक्रमण करत असतो.

**फ) मूल्य शिक्षणाचे महत्त्व विशद करा.**

उत्तर : नैतिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय मूल्यांचे संस्कार आणि रूजवणुक विद्यार्थ्यांच्या अंगी होणे नितांत गरजेचे आहे. सुजाण नागरिक तयार करण्याच्या प्रक्रियेचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. नितीतत्त्वांची, आदर्शांची आणि आध्यात्मिक मूल्यांची जाणीव शिक्षण प्रणालीद्वारे विद्यार्थ्यामध्ये होणे आवश्यक आहे. संस्कृतीचा व मूल्यांचा ठेवा संक्रमित होणे हा शिक्षणाचा मूलभूत हेतू आहे. यातूनच सौदर्याभिरूची, रसिकता, प्रतिभा, राष्ट्राभिमा, एकात्मतेची भावना, राष्ट्र पुरूषांबद्दल आदर निर्माण होतो.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४**

**य) चांगल्या शिक्षकाची गुण–वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

उत्तर : विषयाचे ज्ञान व आवड, व्यासंग, उद्दिष्टानुरूप अध्यापन, दैनंदिन अध्यापनाचे नियोजन, मानसशास्त्रीय अभ्यास, अध्ययन सिद्धांत आणि अध्यापन पद्धतींचे ज्ञान, सर्व अध्यापन

सूत्रांची योग्य माहिती असणे, विद्यार्थ्यांविषयी प्रेम व जबाबदारीची जाणीव, चारित्र्य संपन्नता, आदर्श व्यक्तिमत्त्व, लोकशाही वृत्ती, नेतृत्त्वक्षमता, निःपक्षपातीपणा, वर्ग नियंत्रण, नियोजन क्षमता इत्यादी गुण-वैशिष्ट्ये एका चांगल्या शिक्षकाची आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ५**

**विधानांखाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

अ) **शिक्षकाची** भूमिका विद्यार्थ्यांसाठी मित्र, मार्गदर्शक व तत्ववेत्याची आहे.

ब) जो अध्यात्मिक अधंकार नष्ट करतो तो **गुरू** होय.

क) **ज्ञानदान** करणे हे शिक्षकाच्या जीवनाचे प्रमुख कार्य होय.

ड) **समाज** परिवर्तनात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते.

इ) देशाचे भवितव्य **वर्गा-वर्गात** घडत असते.

## ३.६ स्वयं अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे (संक्षिप्त स्वरूपात)

### १) थोडक्यात उत्तरे लिहा.

**अ)** शिक्षक - राष्ट्राचा शिल्पकार

**ब)** सांस्कृतिक वारशाचे जतन व संक्रमण करण्यामध्ये शिक्षकाची भूमिका

**क)** शिक्षकाचे सामाजिक उत्तरदायित्त्व

**ड)** शिक्षक - विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान

**इ)** अध्यापकीय व्यवसायाचे महत्त्व

२. भारतीय संविधानात्मक जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात शिक्षकाचे कार्य सांगा.

३. राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यास आवश्यक आशय सांगून शिक्षकाची भूमिका सांगा.

४. भारतीय चळवळीच्या इतिहासासाठी कोणत्या घटनांची माहिती शिक्षकांस हवी?

५. वैज्ञानिक मनोभावाची रूजवणूक स्पष्ट करण्यात शिक्षकाची भूमिका सांगा.

६. सविस्तर उत्तरे :

विद्यार्थी जीवनात मूल्यशिक्षणाचे महत्त्व सांगून आदर्श शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

करंदीकर, सुरेश (२००१). शैक्षणिक मानसशास्त्र फडके प्रकाशन : कोल्हापूर

जगताप, ह. ना. (१९८८) अध्ययन व अध्यापन उपपत्री नूतन प्रकाशन : पुणे

दांडेकर, वा. ना. (२००७) शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र श्री विद्या प्रकाशन : पुणे
माळी, तडसरे, चौरे (१९८८), वैकासिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन : कोल्हापूर
पारसनीस, न. रा. (१९९०) प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, नूतन प्रकाशन, पुणे
पारसनीस न. रा. (१९८७) : शिक्षणाची तात्त्विक व समाजशास्त्रीय भूमिका : नूतन प्रकाशन, पुणे.
नानकर, शिरोडे (२००५), सुबोध शैक्षणिक मानसशास्त्र, नित्य नूतन प्रकाशन, पुणे
बोरूडे, कुमठेकर, देसाई व गोळविलकर (१९९०), वैकासिक मानसशास्त्र विद्यार्थी गृह प्रकाशन : पुणे
देशमुख, एल. जी. (१९८८) : शिक्षणाचे तत्त्वज्ञान व समाजशास्त्र, फडके प्रकाशन : कोल्हापूर

❖❖❖

## घटक ४

# अवबोध, अवधान आणि अभिवृत्ती

## (Personality, Attention and Attitude)

◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆◆

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ अभ्यासविषयाची मांडणी

- ४.२.१ अवबोध - संकल्पना, अवबोधावर परिणाम करणारे घटक, अवबोधातील दोष, शैक्षणिक महत्त्व
- ४.२.२ अवधान - संकल्पना, प्रकार, अवधानावर परिणाम करणारे घटक, शैक्षणिक महत्त्व
- ४.२.३ अभिवृत्ती - संकल्पना, परिणाम करणारे घटक, शैक्षणिक महत्त्व

४.३ सारांश

४.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न-उत्तरे

४.५ सरावासाठी प्रश्न

४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.0 उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

* अवबोधनाची संकल्पना, अवबोधावर परिणाम करणारे घटक, अवबोधातील दोष व शैक्षणिक महत्त्व समजून घेता येईल.
* अवधानाची संकल्पना, प्रकार, अवधानावर परिणाम करणारे घटक व शैक्षणिक महत्त्व समजून घेता येईल.
* वृत्तीची सकंल्पना, वृत्तीवर परिणाम करणारे घटक व शैक्षणिक महत्त्व समजून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना :

मानसशास्त्राची शैक्षणिक मानसशास्त्र ही एक वास्तववादी व उपयोजनात्मक शाखा आहे. शैक्षणिक मानसशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून अवबोध, अवधान व वृत्ती यांना अधिक महत्त्व आहे. कारण कोणत्याही वस्तूचे ज्ञान जर मिळवायचे असेल तर प्रथम त्या वस्तूचा बोध होणे महत्त्वाचे आहे. हा सामान्यबोध तयार होण्यासाठी अवबोधास महत्त्व आहे. मानवाचे वर्तन त्यांच्या वृत्तीतून स्पष्ट होते. म्हणून मानवाच्या वर्तनाला त्याची वृत्ती कारणीभूत ठरत असते. या प्रकरणात आपण अवबोध, अवधान व वृत्ती यांचा शैक्षणिक मानसशास्त्रातील अध्यापन शास्त्राच्या दृष्टिने विचार करणार आहोत. अवबोध, अवधान व वृत्ती यांचा अध्ययन व अध्यापन प्रक्रियेशी जवळचा संबंध आहे. शिक्षण क्षेत्रात भौतिक घटकाबरोबर मानवी घटक महत्त्वाचे असतात. विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, प्रशासक हे संवदेनशील मानवी घटक आहेत. त्यांचे वर्तन, अवधानक्षमता आणि त्यांच्या वर्तनाशी निगडीत असणाऱ्या वृत्ती यांच्या अभ्यास शैक्षणिक दृष्टिने महत्त्वाचा आहे. अध्ययन, अध्यापन आणि शैक्षणिक प्रशासन प्रभावी, दर्जेदार व परिणामकारक होण्यासाठी अवबोध, अवधान आणि वृत्ती यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

या प्रकरणात अवबोध, अवधान, वृत्ती यांची संकल्पना त्यावर परिणाम करणारे घटक तसेच त्यांचे शैक्षणिक महत्त्व याचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ अभ्यासविषयाची मांडणी :

या घटकाची विभागणी तीन विभागात केली आहे. पहिल्या विभागात आपण अवबोध म्हणजे काय, त्यावर परिणाम करणारे घटक कोणते तसेच अवबोधानातील दोष व अवबोधाचे शैक्षणिक महत्त्व समजावून घेणार आहोत. दुसऱ्या भागात अवधानाची संकल्पना, अवधानावर परिणाम करणारे घटक व शैक्षणिक महत्त्व अभ्यासणार आहोत.

**४.२.१ अवबोध –** संकल्पना, अवबोधनावर परिणाम करणारे घटक, अवबोधातील दोष, शैक्षणिक महत्त्व.

अवबोध संकल्पना : मानवी मनात अनेक संवेदना निर्माण होतात. संवेदनेला अर्थ लावला की तिचे

रूपांतर अवबोधात होते. अवबोध म्हणजे अर्थपूर्ण संवेदना आणि संवेदना म्हणजे अर्थरहित ज्ञान होय. संवेदना म्हणजे मूर्त स्वरूपातील अनुभव नाही पण अवबोध म्हणजे अर्थपूर्ण अनुभव होय.

अवबोध तयार होणे ही मानसिक प्रक्रिया असली तरी प्रशिक्षणात तिला महत्त्व आहे. अवबोध तयार व्हावेत म्हणून प्रशिक्षणात विविध प्रयत्न केले जातात. शिक्षक प्रशिक्षणात अध्यापन प्रभावी व टिकाऊ होण्यासाठी विविध कौशल्य, तंत्र, पद्धती यांचे ज्ञान प्रशिक्षणार्थीस देत असतो.

अवबोध चांगला व्हावा म्हणून शिक्षक प्रशिक्षणात काही गोष्टींचा समावेश करावा लागेल त्यापैकी काही बाबी अवबोध चांगला तयार होण्यासाठी नमुना पाठामध्ये चित्र, नमुने, चिन्ह इ. चा वापर केला जावा त्यामुळे योग्य अशा अवबोधाचे रूढीकरण होईल. अवबोधासाठी संवेदन आणि पुर्वानुभव यांची गरज असते.

''ज्या मानसिक प्रक्रियेमुळे एखादी वस्तू किंवा वस्तुस्थिती यांचे संवेदनाद्वारे तात्कालीन आकलन होते तिला अवबोध असे संदर्भ द्यावेत.''

व्यक्तीला वस्तू, घटना किंवा प्रक्रिया याविषयी अवबोध किती प्रमाणात स्पष्ट व अचूक होतात हे व्यक्तीच्या पूर्वानुभावर आधारलेले असते. पुर्वानुभव जितके स्पष्ट तितके अवबोध समृद्ध व सुस्पष्ट होतो.

अवधान ही मानसिक प्रक्रिया कशी घडते हे शोधण्याचा प्रयत्न मानसशास्त्रज्ञांनी केला आहे. त्याबाबत विविध दृष्टिकोन आहेत.

**समष्टीवादी दृष्टिकोन :**

हा संप्रदाय १९०८ साली उदयास आला या संप्रदायाला इंग्रजीमध्ये गेस्टाल्ट स्कूल ऑफ सायकॉलॉजी असे म्हणतात. कुर्ट कोफका, कोहलर व वर्दायमर हे या संप्रदायाचे प्रमुख प्रवर्तक आहेत. समष्टीवादी मानसशास्त्रांच्या मते अवबोध म्हणजे संवेदनांची बेरीज नसून आपल्याला संवेदनाचे ज्ञान वेगवेगळे होत नाही तर समन्वयाने एकसंघ स्वरूपात एकत्रित होते. जेव्हा आपण गुलाबाचे फुल असे म्हणतो तेव्हा आपल्याला पान, कळी, पाकळी, फुल याचे वेगवेगळे बोध आपल्याला होत नाही. तर एकत्रित स्वरूपात आपण त्याचा विचार करतो म्हणजेच अवबोध हा आपल्याला नेहमी पूर्णांशाने होत असतो. भागशः होत नाही. पूर्णांशाने अवबोध होणे म्हणजे वस्तू विषयीच्या सर्व गोष्टी साकल्याने लक्षात येणे होय. विविध भागांचे संघटन होऊन अवबोध होतो.

आपल्याला जाणवणाऱ्या अवबोधात बाह्य अधिपकाचे गट दिसतात. या बाह्य उपिपकाचे वर्गीकरण करताना काही तत्त्वांचा अवलंब केला जातो.

१) **सीमपत्ता किंवा सानिध्य** : संघटन हे सीमपता किंवा निकटत्वामुळे होते. या आकृतीत ८ उभ्या रेषात दिसता निकटत्वामुळे २ २ रेषांच्या ४ जोड्या दिसतात.

२) **साम्य किंवा साधर्म्य** : ज्यांच्या आकरात किंवा रंगात साधर्म्य असेल त्यांचा वेगळेपणा चटकन दिसून येतो. या आकृतीतील व हे त्यांच्या आकराने चटकन लक्षात येतात व त्याचे दोन वेगळे गट पडतात.

३) **अखंडत्त्व किंवा सातत्य** : हे समष्टीवादात महत्त्वाचे तत्त्व आहे. अपुरेपणाकडे दुर्लक्ष होऊन समाकार दिसतो अखंडत्त्व व सातत्याच्या तत्वाने अपुरेपणा भरून निघतो सोबतच्या आकृत्या पूर्ण

त्रिकोण व पूर्ण समजल्या जातात.

**४) पूर्व परिचय** : या आकृतीत तुटक –तुटक रेषा आहेत परंतु पूर्व परिचयामुळे अनुभवावरून आपण छत्री आहे हे जाणतो म्हणजेच आपल्याला पूर्व परिचय किंवा पूर्वानुभवाच्या संदर्भात अवबोध झालेला असतो.

**५) मनाचा कल** : सोबतच्या आकृतीत आपल्याला उघडून ठेवलेल्या पुस्तकाचा बोध होतो हा बोध आपल्या मनाच्या कलावर अवलंबून आहे.

**अवबोधातील आकृती व पार्श्वभूमीचे तत्त्व** : पूर्णाशाच्या तत्त्वानुसार आपल्याला कोणत्याही गोष्टीचा बोध समग्रपणे होत असला तरी विशिष्ट प्रसंगी एखाद्या गोष्टीकडे आपले लक्ष तुलनात्मक दृष्टया कमी अधिक होते. वर्गात शिक्षक शिकवत असताना शिक्षकांची भाषाशैली त्याचे व्यक्तिमत्त्व इकडे जास्त लक्ष असते. काही वेळेस शिक्षकांच्या बोलण्यापेक्षा शैक्षणिक साहित्य अधिक लक्ष वेधून घेते. म्हणजेच वस्तूच्या अवबोध समग्रपणे किंवा पूर्णाशाने होत असताना एक भाग आकृती व दुसरा राहिलेला भाग पार्श्वभूमी ठरतो.

अवबोधावर परिणाम करणारे घटक – सर्वसाधारणपणे अवधानावर परिणाम करणारे घटक अवबोधवर परिणाम करतात.

१) उघीपळाची तीव्रता : रंग, वास, आवाडा, आर्कांळता या बाबतीत उद्यीपन जीतका तीव्र तितके संवेदन चांगले त्यामुळे संवेदनाला अचूक अर्थ प्राप्त होतो म्हणजेच अवबोध चांगला होतो.

२) उघीपळाचा आकार : मोठ्या आकाराच्या उघीपळाचा अवबोध स्पष्ट व अर्थपूर्ण होतो.

३) बदल : नेहमीपेक्षा वेगळ्या स्थितीतील उघीपळ अवधान खेचून घेतात व त्यांचे संवेदन चांगले होते म्हणून अवबोध अचूक होतो.

४) गतिमानता : गतिमान वस्तू अवधान खेचून घेतात त्यामुळे त्यांचा अवबोध चटकन होतो.

५) नावीन्य : कोणीतही नविन गोष्ट सर्वांचे लक्ष वेधून घेते त्यामुळे अवधान खेचले जाते व अवबोध चांगला होतो.

६) पुनरावृत्ती : पुनरावृत्ती मुळे लक्ष वेधले जाते त्यामुळे अवबोध चांगला होण्यास मदत होते.

७) इंद्रियभ्रम : इंद्रियभ्रमामुळे अवबोधात चूक होते. त्यामुळे इंद्रियभ्रमाचा अवबोधावर परिणाम होतो.

**अवबोधातील दोष** : व्यक्ती आपल्या अनुभवावरून संवेदनांना अर्थ लावत असते त्यावरून तीला अवबोध होत असतो परंतु अनुभव जर कमी पडले किंवा पार्श्वभूमी जर बदलली तर अवबोधात दोष निर्माण होत असतात. ते दोन प्रकारचे असतात.

अ) इंद्रियभ्रम  ब) चित्तभ्रम

**अ) इंद्रियभ्रम –** यांत अवबोधाचा चूकीचा अर्थ लावला जातो.

उदा. दोरीला अंधारात साप समजणे या ज्ञानेंद्रियाच्या भ्रमामुळे हा अवबोध दोष निर्माण होतो. इंद्रियभ्रम व्यक्तीनुसार बदलतात इंद्रियभ्रमाचे इंद्रियानुसार प्रकार पडतात. उदा. दृष्टिभ्रम, श्रुतीभ्रम इंद्रियभ्रम पुढील कारणामुळे होतो.

**१) परिचितता** : एखादा स्टिलचा पत्र्याचा तुकडा उन्हात चकाकतो तो चांदीचा समजून आपण उचलतो.

**२) मनःस्थिती** : आपण एखाद्या व्यक्तीची वाट पहात असतो दारात गाडीचा आवाज आला किंवा दारावर टक टक वाजले की ती व्यक्ती आली आहे असे वाटते.

**३) भौतिक परिस्थिती** : रेल्वेत बसल्यावर शेजारच्या रूळावरून चालणाऱ्या गाडीकडे पाहून आपली गाडी सुरू आहे असा भास होतो.

**४) सवयी** : सवयीमुळे आपण परिचित गोष्टीतील चूक दुरूस्त करू शकत नाही त्यामुळे आपले लिखाण चुकीचे असले तरी बरोबर म्हणून वाचले जाते व चूक तशीच राहून जाते.

**५) भावना** : भावनाप्रधान स्थितीमुळे चुकांचा अवबोध होतो आणि इंद्रियभ्रम घडतो घरात एकट्या असलेल्या व्यक्तीला भीतीपोटी वाऱ्याचा आवाज देखील भयानक वाटतो.

**६) ज्ञानेद्रिंयातील दोष** : सदोष ज्ञानेंद्रियामुळे सदोष अवबोध घडतो व इंद्रियभ्रम होतो.

**ब) चित्तभ्रम** : अवबोध प्रकियेतील दुसरा दोष म्हणजे चित्तभ्रम होय. चित्तभ्रमात उघीपक समोर नसताना आपणास भास होत असतो. मनाच्या विशिष्ट प्रकारच्या अवस्थेमुळे चित्तभ्रम निर्माण होतो. भावनाक्षोभ हे चित्तभ्रमाचे प्रमुख कारण आहे. मनाची अतिसंवदेनशील अवस्था विचारापेक्षा भावनेला प्राधान्य देण्याची वृत्ती तसेच अस्वस्थ मनःस्थिती हे चित्तभ्रमाची कारणे आहेत. चित्तभ्रमाला अववस्तुबोध असेही म्हणतात. चित्तभ्रम हा व्यक्तीच्या आंतरिक अवस्थेमुळे संभवतो. तो पूर्णपणे व्यक्तीगत असतो. चित्तभ्रमात वास्तवता नसते पुर्णपणे काल्पनिकता असते.

**शैक्षणिक महत्त्व** : शिक्षणप्रक्रियेत सामान्य बोधाच्या विकासाला अधिक महत्त्व आहे. विद्यार्थ्यांचे अवबोध स्पष्ट झाले तरच ज्ञानाच्या संकल्पना दृढ होतील विविध शैक्षणिक अनुभूतीद्वारे विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व मोठे झाले पाहिजे तरच ज्ञानाच्या संकल्पना विकसित होतील त्यासाठी खालील बाबीकडे लक्ष दिले पाहिजे.

१) विद्यार्थ्याचे अनुभवविश्‍व समृद्ध व विस्तृत करण्याचा प्रयत्न करावा त्यामुळे अवबोध स्पष्ट होण्यास मदत होईल.

२) शैक्षणिक साधनांचा उपयोग करून विविध गुणधर्माचा परिचय करून द्यावा त्यामुळे अवबोध स्पष्ट होईल.

३) ज्ञानेंद्रियामार्फत शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा बर्फाचा थंडपणा, पदार्थाची चव, फुलांचा सुगंध, लोकरीचा मऊपणा याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा म्हणजे त्या संवेदनांचा अर्थबोध चटकन व स्पष्ट होण्यास मदत होईल.

४) कृतीयुक्त शिक्षणावर भर द्यावा, वस्तू हाताळू द्याव्यात त्यामुळे वस्तूबाबतचे अवबोधन चटकन व स्पष्ट होण्यास मदत होईल.

५) पूर्वग्रह, मनातील संभ्रम यामुळे चुकीचा अवबोध होतो त्यामुळे अध्ययनावर अनिष्ट परिणाम होतो म्हणून विद्यार्थ्यांच्या मनात दूषित पूर्वग्रह निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

६) विद्यार्थ्यांना इंद्रिय शिक्षण द्यावे. विविध संवेदनांतील भेदाभेदक्षमता ओळखण्याची सवय वाढवावी संवेदनांना अर्थ लावण्याची क्षमता वाढीस लागावी.

७) अवबोध प्रक्रियेत बाह्य अधिपकांचे वर्गीकरण व संघटन होते. अध्यापनात या तत्त्वांचा उपयोग जरूर तेथे करावा.

८) आकृती व पार्श्वभूमी या दोन्ही गोष्टीवर अवबोध अवलंबून असतो या दोन्ही गोष्टी स्पष्टपणे शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्यासमोर मांडाव्यात. सूत्रे, नियम, विशिष्ट शब्द, चौकटीत मोठ्या अक्षरात वेगळ्या रंगात किंवा अधोरेखित करून दाखवावेत.

९) विविध गोष्टीचा अर्थ पार्श्वभूमीनुसार बदलतो. ऐतिहासिक घटना, भौगोलिक परिस्थिती सांगताना पार्श्वभूमी स्पष्ट करणे जरूर आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

१) संवेदनेला अर्थ प्राप्त झाला की त्याचे रूपांतर कशात होते?

२) अवबोध म्हणजे काय?

३) समष्टीवादाचे प्रमुख प्रवर्तक कोण?

४) अवबोधात कोणत्या तत्त्वांचा अवलंब केला जातो?

५) अवबोधावर परिणाम करणारे घटक कोणते?

### **४.२.२ अवधान –** संकल्पना, प्रकार, अवधानावर परिणाम करणारे घटक, शैक्षणिक महत्त्व

अवधान संकल्पना : एकाच वेळी आपल्या सभोवताली एखादयाच गोष्टीकडे आपले लक्ष असते ज्या गोष्टीकडे आपले लक्ष केंद्रीत झालेले असते तिच्याकडे आपले अवधान आहे असे मानले जाते. अवधान म्हणजे एखादया वस्तूकडे किंवा विषयाकडे वळलेला मनाचा ओघ होय. विद्यार्थ्यांचे अवधान असल्याशिवाय शिकण्याची प्रक्रिया होत नाही. अवधान ही मनाची शक्ती नसून मनोव्यापार आहे. हा मनोव्यापार व्यक्तीच्या जागृत अवस्थेत चालू असतो. अवधानाशिवाय कोणताही मनोव्यापार होत नाही.

अवधान ही निवडपूर्ण अशी प्रक्रिया आहे. एकाच गोष्टीवर दिर्घकाळ अवधान केंद्रीत करता येत नाही. तसेच एकाच वेळी अनेक गोष्टीवर अवधान देता येत नाही. एकाच गोष्टीवर फार वेळ अवधान टिकत नाही मात्र सरावाने अभ्यासाने अवधानाची एकाग्रता वाढविता येते.

**व्याख्या :**

रास : कोणतेही गोष्ट जाणून घेण्यासाठी मनाने केलेली धडपड म्हणजे अवधान होय.

टिचनेर : ''अवधान म्हणजे जाणिवेचे केंद्रीकरण होय.''

**अवधानाची वैशिष्टये :**

१) अवधान हा एक मनोव्यापार आहे.

२) अवधान प्रक्रिया बोधावस्थेत कार्यरत असते.

३) अवधान ही एक निवडक प्रक्रिया आहे.

४) अवधानामुळे ज्ञानग्रहण व आकलन होते.

५) एका वेळी एकाच गोष्टीकडे बरेचदा अवधान देऊ शकतो.

६) एकाच गोष्टीवर फार काळ अवधान टिकून ठेवता येत नाही.

७) अध्ययनासाठी अवधान आवश्यक आहे.

८) अवधान व अभियची यांचा जवळचा संबंध आहे.

अवधानाचे प्रकार - अवधानाचे तीन प्रकार आहेत.

१) ऐच्छिक अवधान

२) अनैच्छिक अवधान

३) अभ्यस्त अवधान

**१) ऐच्छिक अवधान :**

या प्रकारात एखाद्या विषयाकडे प्रयत्नपूर्वक अवधान द्यावे लागते. आपली इच्छाशक्ती वापरावी लागते. या अवधानाला सहेतूक अवधान असेही म्हणतात. हे अवधान आपल्या इच्छेनुसार घडून येते. परीक्षा जवळ आली की विद्यार्थी मनलावून स्वतःच्या इच्छेने अभ्यास करतात. जाणीवपूर्वक प्रयत्न करत अवधान दिले जाते. आपले स्वतःचे हित साधण्याचा प्रयत्न केला जातो.

**२) अनैच्छिक अवधान :**

या प्रकारात आपली इच्छा किंवा हेतू नसताना एखाद्या बाबीकडे आपले लक्ष जाते व तिथे ते केंद्रीत होते त्याला अनैच्छिक अवधान म्हणतात. हेतुपुरस्कर आपण एखाद्या गोष्टीकडे केंद्रीत होत नाही. बाह्य वस्तूतील आकर्षण, चमत्कृतीपूर्ण, भव्य-दिव्य अशा गुणधर्मामुळे आपली इच्छा असो वा नसो त्यांच्याकडे आपले लक्ष जाते या स्थितीत अवधान देण्यासाठी प्रयत्न करावे लागत नाहीत.

उदा. एखादे कर्णमधूर संगीत, गडगडात, मोठा आवाज इ. कडे आपले सहज लक्ष जाते.

**३) अभ्यस्त अवधान :**

सवय किंवा अभ्यासामुळे काही गोष्टीकडे आपले अवधान जाते म्हणून या अवधानाला 'अभ्यस्त

अवधान' म्हणतात. उदा. कलाकार आपल्या कलेची साधना करतात. बाहेरच्या जगाला विसरतात सुरूवातीला एखादी गोष्ट क्रमप्राप्त म्हणून हाती घेतली जाते त्यात यश मिळत गेले की अभिरूची वाढते आनं, समाधान मिळते नंतर त्या गोष्टीकडे अवधान देण्यासाठी सुरूवाती इतके प्रयत्न करावे लागत नाही. अभ्यासातून त्या विषयाची गोडी निर्माण होते पुढे त्या विषयाकडे सहजरित्या अवधान जाते म्हणून त्यास अभ्यस्त अवधान म्हणतात.

अवधानावर परिणाम करणारे घटक : अवधानावर परिणाम करणारे आंतरिक घटक व बाह्य घटक आहेत.

**बाह्यघटक** :

१) **अधिपळाची तीव्रता** : आवाज, रंग, वास इ. बाबतीत अधीपळ वस्तूत जितकी तीव्रता जास्त असेल तितके अवधान त्या वस्तूकडे जाते. उदा. वीजेचा कडकडाट, रातराणीचा सुगंध,.

२) **आकार** : चेतक जितका मोठा तितके तो आपले अवधान जास्त खेचले जाते. अध्यापनात स्थिरचित्रापेक्षा चलचित्रांचा वापर केल्यास विद्यार्थ्यांचे अपघात टिकून राहते.

३) **पुनरावृत्ती** : एखादी गोष्ट पुनः पुन्हा आपल्या ऐकण्यात किंवा पाहण्यात येत असेल तर चटकन तिच्याकडे लक्ष जाते. उदा. वर्गात शिकविताना महत्वाच्या मुद्यांची शिक्षकाकडून पुनरावृत्ती केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे त्याकडे लक्ष जाते.

४) **नावीन्य** : नेहमीच्या वस्तूपेक्षा नवीन असलेल्या वस्तू किंवा गोष्ट अवधान खेचून घेतात. जो शिक्षक आपल्या अध्यापनात नाविन्य निर्माण करू शकतो. त्या शिक्षकाच्या तासाला विद्यार्थ्यांचे अवधान टिकून रहाते.

५) **पुनरावृत्ती** : एखादी गोष्ट पुनःपुन्हा आपल्या ऐकण्यात किंवा पाहण्यात येत असेल तर चटकन तिच्याकडे लक्ष जाते. उदा. वर्गात शिकविताना महत्त्वाच्या मुद्यांची शिक्षकाकडून पुनरावृत्ती केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे त्याकडे लक्ष जाते.

६) **नावीन्य** : नेहमीच्या वस्तूपेक्षा नवीन असलेल्या वस्तू किंवा गोष्ट अवधान खेचून घेतात. जो शिक्षक आपल्या अध्यापनात नाविन्य निमाण करू शकतो. त्या शिक्षकाच्या तासाला विद्यार्थ्यांचे अवधान टिकून रहाते.

७) **सजावट** : वस्तूची व्यवस्थित मांडणी, एखाद्या प्रसंगी केलेली सजावट आपले अवधान आकर्षून घेतात.

८) **वैचित्र्य** : नेहमीपेक्षा वेगळे, चमत्कारिक, अदभूत कही असेल तर लक्ष वेचले जाते. उदा. उंच व बुटकी जोडी, नेहमीपेक्षा वेगळ्या आकाराचे फळ.

९) **विरोध** : विरोधामुळे अवधान खेचले जाते. उदा. काळ्या दगडावर ओढलेली पांढरी रेघ, पांढऱ्या कपड्यावरील लाल रंगाचा डाग.

**आंतरिक घटक :**

१) **नैसर्गिक प्रेरणा** : नैसर्गिक गरजेतून प्रेरणा निर्माण होते. प्रेरणेमुळे अध्यापनाला दिशा प्राप्त होते. प्रेरणा आणि गरजा जेवढ्या तीव्र असतील तेवढे अपघात केंद्रित होते.

२) **तात्कालिन गरजा** : तात्कालीन गरजा आपल्या अवधानाचे विषय ठरवते. आपल्याला जे हवे त्याकडे आपले लक्ष जाते इच्छा नसलेल्या गोष्टीकडे आपण लक्ष देत नाही.

उदा. परीक्षा जवळ आली की विद्यार्थी नोटस् – पुस्तके मिळविण्याचा प्रयत्न करतात परंतु परीक्षा झाली की त्याच्याकडे पहात नाही.

३) **सवय** : एखाद्या गोष्टीची सवयी अंगवळणी पडली की त्याच्याकडे आपोआप अवधान खेचले जाते. उदा. सकाळी व्यायामाची सवय असलेल्या व्यक्तीस उठल्याबरोबर अगोदर व्यायामाची आठवण येते.

४) **मनःस्थिती** : मनःस्थितीचा अवधावर परिणाम होतो. मनःस्थिती चांगली असले तर आशादायी. आनंददायी वातावरण निर्माण होते. इतरांच्या बोलण्याकडे व्यक्ती लक्ष देऊ शकते.

५) **अभिरूची** : अवधान टिकून ठेवणारा महत्त्वाचा घटक म्हणजे अभिरूची होय. अभिरूची, आवड असली की कोणतीही सक्ती न करता अवधान दिसून रहाते.

६) **दृष्टिकोन** : समाजात वावरताना व्यक्तीचे धार्मिक, सामाजिक, राजकिय दृष्टिकोन तयार झालेले असतात. आपला दृष्टिकोन जर दुषित असले तर बाह्य वस्तूच्या चांगल्या गोष्टीकडे आपले लक्ष जात नाही. दुषित दृष्टिकोनामुळे चांगल्या गोष्टीही वाईट दिसतात.

४) **मनःस्थिती** : मनःस्थिती चांगली अवधावर परिणाम होतो. मनःस्थिती चांगली असेल तर आशादायी, आनंददायी वातावरण निर्माण होते. इतरांच्या बोलण्याकडे व्यक्ती लक्ष देऊ शकते.

५) **अभिरूची** : अवधान टिकून ठेवणारा महत्त्वाचा घटक म्हणजे अभिरूची होय अभिरूची, आवड असली की कोणतीही सक्ती न करता अवधान टिकून रहाते.

६) **दृष्टिकोन** : समाजात वावरताना व्यक्तीचे  धार्मिक, सामाजिक, राजकिय दृष्टिकोन तयार झालेले असतात. आपल्या दृष्टिकोन जर दुषित असेल तर बाह्य वस्तूच्या चांगल्या गोष्टीकडे आपले लक्ष जात नाही दुषित दृष्टिकोनामुळे चांगल्या गोष्टीही वाईट दिसतात.

**शैक्षणिक महत्त्व :**

कोणत्याही प्रकारचे कौशल्य किंवा ज्ञान संपादनासाठी अपधानाची गरज आहे. अवधानाशिवाय कोणतीही गोष्ट शिकत येणार नाही. कृतीद्वारा शिक्षण दिल्याने अवधान टिकून रहाते म्हणून अध्यापनात कृतीचा वापर करावा लहान मुले चंचल असतात. लहान मुलात अनैच्छिक अपधान दिसून येते आकार, तीव्रता, पुनरावृत्तीचा वापर करून अवधान खेचून घेता येते.

विद्यार्थ्यांच्या वाढत्या वयाबरोबर अवधान निवडपूर्ण होते. आवडीचे विषय बदलतात त्यामुळे अनैच्छिक

अवधानाकडून ऐच्छिक अवधानाकडे विद्यार्थी वळतील याकडे शिक्षकांनी लक्ष दिले पाहिजे. माध्यमिक शाळेत अभ्यस्त अवधानाचाही उपयोग व्हायला पाहिजे.

एखाद्या विषयात जर विद्यार्थ्याना गोडी निर्माण झाली तर अवधान टिकून राहण्यास मदत होते. त्यासाठी परिश्रम जाणवत नाही, विनासायास कृती होते आवड, अभिरूची हे अवधानाचे रूप आहे. अध्ययनार्थी एखाद्या विषयाच्या अनुशंगाने चर्चा, वाचन, लेखन स्वेच्छेने करू लागला तर त्या विषयात अभिरूची निर्माण झाली असे म्हणता येईल. अध्ययनाबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात अभिरूची निर्माण करणे हे एक उद्दिष्ट आहे.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनात शिकण्याविषयी आवड निर्माण केली पाहिजे त्यासाठी शिक्षकांनी प्रसन्न, हसतमुख असावे. विषयावर आपले प्रभुत्व असावे. आकर्षक पद्धतीने शैक्षणिक साधनांचा वापर करून, विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग वाढवावा त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात अभिरूची निर्माण होईल विद्यार्थ्यांना अध्यापन कंटाळवाणे वाटणार नाही. याबाबत शिक्षकांनी प्रयत्नशील असावे. विद्यार्थ्यांचे अध्ययनाकडे अवधान खेचणे व टिकवून ठेवणे यासाठी शिक्षकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे.

विद्यार्थ्यांचे अवधान विभाजन झाले तर अध्ययन अर्थपूर्ण होत नाही म्हणून अवधानाचे विभाजन होणार नाही याची दक्षता शिक्षकांनी घ्यावी. विद्यार्थ्यांचा शारिरीक थकवा आणि मानसिक थकवा विद्यार्थ्यांच्या अवधानाचे विचलन करतात त्याचा अध्यनावर परिणाम होतो. म्हणून थकवा-कंटाळा घालविण्याचा शिक्षकांनी प्रयत्न करावा.

- **स्वंय अध्ययनासाठी प्रश्न :**

  १) अवधान म्हणजे काय?

  २) अवधानाची कोणतीही दोन वैशिष्टये लिहा.

  ३) अवधानाचे प्रकार किती

  ४) अवधानावर कोणते घटक परिणाम करतात?

**४.२.३ अभिवृत्ती** : संकल्पना, परिणाम करणारे घटक, शैक्षणिक महत्त्व :

**अभिवृत्ती संकल्पना** : वृत्तीला अभिवृत्ती असेही म्हणतात. अभिवृत्ती म्हणजे वस्तू, व्यक्ती आणि प्रक्रिया यांच्या विषयीच्या व्यक्तीच्या मनाचा कल किंवा मनःस्थिती होय. आपल्या अनुभवाला भावनिक अंग असते अनुभवाच्या भावनिक पैलूमधून अभिवृत्ती तयार होतात. अभिवृत्ती या व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण करतात. व्यक्तीच्या चालण्यातून, बोलण्यातून, वागण्यातून तयार झालेल्या अभिवृत्ती डोकावत असतात दिसून येतात. त्यामुळे अभिवृत्ती ही व्यक्तीबद्दल होकारात्मक अभिवृत्ती तयार होते पण एखादी व्यक्ती आपल्याला आवडत नसेल, इतराबद्दल सतत नकारात्मक बोलत असेल तर अशा व्यक्तीला आपण टाळतो म्हणजेच त्या व्यक्तीबद्दल नकारात्मक अभिवृत्ती निर्माण होते. अनुभवाच्या भावनिक पैलूतून अभिवृत्ती तयार होतात.

अभिवृत्तीनुसार घडणारे नवीन वर्तन चांगले अथवा वाईट दोन्ही प्रकारचे असू शकते. अभिवृत्ती ही

मनःस्थिती आहे. प्रसंगानुसार आपल्याकडून वर्तन घडत असते ही मनःस्थिती वर्तन घडण्यापूर्वीच तयार झालेले असते. वृत्तीमुळे वर्तनाला दिशा मिळते पूर्वग्रह, विश्वास मते हे अभिवृत्तीची संबंधित आहेत.

व्यक्तीच्या अभिवृत्ती या बदलतात. ज्ञानाने किंवा अनुभवाने व्यक्तीचा दृष्टिकोन विशाल होतो. पूर्वी घेतलेला एखादा अनुभव नव्याने तपासून पाहिला जातो त्याचा पुनर्विचार होऊन अभिवृत्तीत बदल घडून येतो. अध्ययनार्थीच्या अभिवृत्तीची योग्य प्रकारे जडण घडण करणे हे शिक्षकांचे कार्य आहे. अध्ययनार्थीवर आपली मते लादण्यापेक्षा योग्य वातावरण निर्माण करावे व त्या अनुभवातून त्यांच्या अभिवृत्ती घडू द्याव्यात सामाजिकदृष्टया अनिष्ट वृत्ती निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

अभिवृत्तीच्या काही तज्ञांनी खालीलप्रमाणे व्याख्या केल्या आहेत.

**हेमर्स, रूमेल आणि पेज** : ''अभिवृत्ती ही अनुभवातू तयार झालेली एक विशिष्ट भावनिक प्रवृत्ती असून तिच्याद्वारे व्यक्ती मनोवैज्ञानिक पदार्थ किंवा वस्तुतः नकारात्मक किंवा सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करत असते.''

**सार्जट** : ''एखाद्या विषयाला अनुसरून ठराविक दिशेने वर्तन करण्याची अर्जित स्वरूपाची सुसंगत प्रवृत्ती म्हणजे अभिवृत्ती होय.''

**ऑलपोर्ट जी. डब्ल्यू** : ''अभिवृत्ती म्हणजे व्यक्तीच्या विवक्षित विषयांना, प्रसंगाना अनुसरून केलेल्या प्रतिक्रियांचे संचलन व दिग्दर्शन करणारी आणि अनुभवामधून व्यवस्थापित झालेली मनाची स्थिती होय.''

**फ्रीमन** : ''अभिवृत्ती म्हणजे व्यक्तिची विशिष्ट परिस्थिती, व्यक्ति आणि वस्तुंना अनुलक्षून प्रतिसाद देण्याची सहज तत्परता होय. ही तत्परता शिकली जाते आणि ती त्या व्यक्तीची त्या विशिष्ट परिस्थीतींना अनुलक्षून प्रतिसाद विशिष्ट शैली बनते.''

अभिवृत्तीची काही वैशिष्टये सांगता येतील.

१) अभिवृत्ती जन्मजात नसून संपादित असते व्यक्तीचे अनुभव अभिसंधान समूहप्रभाव यातून त्याची निर्मिती होते.

२) अभिवृत्तीमुळे वर्तनाला विशिष्ट दिशा व वळण लागते.

३) अभिवृत्ती मनुष्यवर्तनाचे दिग्दर्शन करते.

४) अभिवृत्तीमुळे घडणारे वर्तन चांगले अथवा वाईट असू शकते.

५) अभिवृत्तीमुळे व्यक्ती कार्यप्रवण होते. प्रसंग येताच व्यक्ती आपल्या वृत्तीनुसार वर्तन करते.

६) अभिवृत्तीमध्ये बदल घडून येऊ शकतो.

७) अभिवृत्तीच्या बाबतीत व्यक्तिभिन्नता आढळते.

८) अभिवृत्ती ही व्यक्तीच्या वर्तनातून, शब्दातून, भावनांमधून विचारांमधून अभिव्यक्त होत असते.

विविध अनुभवातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकार घेत असते त्यातून अभिवृत्तीची जडणघडण होत असते. घर, शाळा, समाज, जीवनात येणारे अनुभव, आदर्श, माध्यमे या सर्वातून व्यक्तीची अभिवृत्ती घडत असते व बदलत असते. सांस्कृतिक व सामाजिक प्रभावामुळे अभिवृत्तीची निर्मिती होते.

**अभिवृत्तीवर परिणाम करणारे घटक :**

**१) शारीरिक क्षमता** : काही व्यक्ती या शारीरिकदृष्ट्या कमकुवत असतात. त्या समाजात फारश्या मिसळत नाहीत. या उलट जे सशक्त, सदृढ असतात ते धाडसी, आत्मविश्वासू, समाजशील असतात ते इतर व्यक्तीमध्ये पटकन मिसळतात. म्हणजेच शारीरिक क्षमता व्यक्तीच्या अभिवृत्तीवर परिणाम करतात.

**२) कुटुंब** : कुटुंब हा व्यक्तीच्या अभिवृत्तीवर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. व्यक्तीचे सामाजिकरण कुटुंबात होत असते. कुटुंबातील परंपरा, आदर्श मूल्य, उत्सव हे व्यक्तीच्या अभिवृत्तीची जडणघडण करतात.

**३) समाज** : समाजातील वाईट प्रवृत्तीचा व्यक्तीच्या अभिवृत्तीव अनिष्ट परिणाम होतो. उदा. गुन्हेगारी, व्यसनाधीनता, बेकारी इ याउलट समाजातील चांगल्या प्रथा, परंपरा, आदर्श चांगल्या अभिवृत्ती विकसित करतात.

**४) शाळा** : शाळा, महाविद्यालय या शिक्षणाच्या औपचारीक संस्था विद्यार्थ्यांच्या चांगल्या अभिवृत्ती विकसित करण्याचा प्रयत्न करतात. शाळेत सहल, स्पर्धा, प्रश्नमंजुषा, संगीत, स्नेहसंमेलन असे विविध उपक्रम राबविले जातात. त्याचबरोबर शिक्षकांचे मार्गदर्शन असते त्यातून विद्यार्थ्यांच्या चांगल्या अभिवृत्ती विकसित केल्या जातात.

**५) परिपक्वता** : भावना, विचार, क्षमता परिपक्वतेनुसार विकसित होतात. त्याचा परिणाम म्हणून अभिवृत्ती विकसित होतात. परिपक्वता हा घटक जसा अध्ययनावर परिणाम करतो तसा तो अभिवृत्तीच्या विकासावर परिणाम करतो.

**शैक्षणिक महत्त्व :**

१) राष्ट्रीय सण, राष्ट्रीय उत्सव, थोर नेत्याचे आदर्श, मूल्यशिक्षण यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी राष्ट्रप्रेमाची अभिवृत्ती विकसित करावी.

२) विज्ञान मंडळ, विज्ञान जत्रा, विज्ञान प्रदर्शन, विज्ञान सहली, वैज्ञानिकांच्या जयंती, पुण्यतिथी यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ठिकाणी राष्ट्रप्रेमाची अभिवृत्ती विकसित करावी.

३) विद्यार्थ्यांच्या चांगल्या वर्तनासाठी त्यांच्या ठिकाणी चांगल्या अभिवृत्ती विकसित करण्याचा प्रयत्न शिक्षकांनी जाणीवपूर्वक करावा.

४) समाजामध्ये कही असामाजिक अभिवृत्ती समाजात द्वेष, तेड निर्माण करतात म्हणून विद्यार्थी हे या असामाजिक अभिवृत्तीपासून कसे दूर राहतील याची शिक्षकांनी दक्षता घ्यावी.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

  १) अभिवृत्ती म्हणजे काय?

  २) अभिवृत्तीची दोन वैशिष्ट्ये सांगा.

  ३) अभिवृत्तीवर कोणते घटक परिणाम करतात?

## ४.४ सारांश :

अवबोध, अवधान आणि अभिवृत्ती या प्रकरणात आपण अवबोध म्हणजे काय, अवबोधाची संकल्पना, अवबोधनावर परिणाम करणारे घटक आणि अवबोधातील दोष कोणते याचा अभ्यास केला. तसेच अवधान म्हणजे काय, त्यावर परिणाम करणारे बाह्यघटक व आंतरिक घटक तसेच त्यांचे शैक्षणिक महत्त्व पाहिले आणि अभिवृत्ती म्हणजे काय त्यांची संकल्पना तसेच अभिवृत्तीची निर्मिती कशी होते त्यावर कोणते घटक परिणाम करतात याचा सविस्तर अभ्यास केला.

## ४.५ स्वयंअध्ययन प्रश्न उत्तरे :

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न १

**उत्तरे** १) अवबोध

२) ज्या मानसिक प्रक्रियेमुळे एखादी वस्तू किंवा वस्तुस्थिती यांचे संवेदनाद्वारे तात्कालिन आकलन होते तिला अवबोध असे म्हणतात.

३) कुर्ट कोफका, कोहलर, वर्दायमर

४) समीपता, साम्य, अखंडत्त्व, पूर्वपरिचय आणि मनाचा कल.

५) अधिपकाची तीव्रता, अधीपकाचा आकारबदल, गतीमानता, नावीन्य, पुनरावृत्ती इंद्रियभ्रम.

- **स्वयंअध्ययन प्रश्न – २**

**उत्तरे** १) अवधान म्हणजे जाणिवेचे केंद्रीकरण होय.

किंवा

कोणतीही गोष्ट जाणून घेण्यासाठी मनाने केलेली धडपड म्हणजे अवधान होय.

२) १) अवधान हा एक मनोव्यापार आहे.

२) अवधान ही एक निवडक प्रक्रिया आहे.

३) तीन

४) बाह्यघटक आणि आंतरिक घटक

▸ **स्वयंअध्ययन प्रश्न – ३**

**उत्तरे** १) अभिवृत्ती ही अनुभवातून तयार झालेली एक विशिष्ट भावनिक प्रवृत्ती असून तिच्याद्वारे व्यक्ती मनोवैज्ञानिक पदार्थ किंवा वस्तुतः नकारात्मक किंवा सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करत असते.

२) १) अभिव्यक्ती मध्ये बदल घडून येऊ शकतो.

२) अभिवृत्तीमध्ये व्यक्तीभिन्नता आढळते.

३) शारिरीक क्षमता, कुटूंब, समाज, शाळा व परिपक्वता.

## ४.६ सरावासाठी प्रश्न :

१) अवबोधाची संकल्पना स्पष्ट करून अवधानावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

२) अवबोधाचे शैक्षणिक महत्त्व स्पष्ट करा.

३) अवधान म्हणजे काय ते सांगून त्याची वैशिष्ट्ये व प्रकार स्पष्ट करा.

४) अवधानावर परिणाम करणारे बाहय्य घटक व आंतरिक घटक कोणते?

५) अभिवृत्तीची संकल्पना थोडक्यात स्पष्ट करून अभिवृत्तीचे शैक्षणिक महत्त्व सांगा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

करंदीकर सुरेश (जून, २००९), शैक्षणिक मानसशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

भंगाळे, शैलजा (जानेवारी २०१९), अध्ययन-अध्यापन, जळगाव : प्रशांत पब्लिकेशन.

देशमुख, एल. जी. (जुलै २००४), शैक्षणिक मानसशास्त्र व अध्यापनशास्त्र, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

मोरे चंद्रकांत, भिलेगावकर सदानंद, (नोव्हेंबर, २००९), शिक्षक शिक्षण, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

❖❖❖